CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | शनिवार, ६ सप्टेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २९८ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# आईसारखे दुसरे दैवत नाही : प्राचार्य डॉ. गणेश चव्हाण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ५ सप्टेंबर-**
येथील प्राचार्य डॉ. चंद्रकांत शंकर मोरे चॅरिटेबल ट्रस्ट व कॉलेज ऑफ एज्युकेशनच्या संयुक्त विद्यमाने मीनाताई अंकुश चव्हाण यांना 'आदर्श माता पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पुण्याचे प्राचार्य डॉ. गणेश चव्हाण यांनी आईची महती कथन करताना आईसारखे दुसरे दैवत नाही, असे गौरवोद्गगार काढले. सदर पुरस्कार हा आपल्या आईच्या अपार कष्टाचे फळ आहे, अशी भावना व्यक्त केली. प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही.पी. शिखरे यांनी केले. सत्कारमूर्ती व प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. रविराज फुरडे यांनी करुन दिला. पुरस्काराची भूमिका माजी प्राचार्य डॉ. एस एस. गोरे यांनी मांडली. 'खरा तो एकची धर्म' या साने गुरुजींच्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव यांनीही विचार मांडले. आजचा हा पुरस्कार योग्य मातेला दिला गेल्याची भावना व्यक्त केली. विशेष बाब म्हणजे या कार्यक्रमात जिजामाता कन्या प्रशालेला वुशू या क्रीडा प्रकाराचे संपूर्ण आकर्षक किट मोरे ट्रस्टच्यावतीने देण्यात आले. मुख्याध्यापिका राजश्री पाटील यांनी त्याचा स्विकार केला. आदर्श माता पुरस्कार मानपत्राचे वाचन ट्रस्टचे सचिव अजय मोरे यांनी केले. प्राचार्य डॉ. दीपक गुंड यांनी आभार मानले. संस्थेचे जनरल सेक्रेटरी पी टी पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, व्ही.एस. पाटील, महेश चव्हाण, जोधपूरचे एस.पी. दिनेश चव्हाण, जगदाळे सर, प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. एल. आय. राठोड यांनी केले. प्राचार्य डॉ.मोरे ट्रस्टचे सर्व पदाधिकारी, डॉ. रविराज फुरडे, अजय मोरे, संजय मोरे, प्राचार्य डॉ. एस एस गोरे, निलिमा मोरे, दीपा मोरे, प्रतिक्षा स्वप्निल मोरे, गिरीश सोनार, शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयातील प्राध्यापक, प्रशिक्षणार्थी यांचे योगदान महत्त्वपूर्ण होते.

# गणपती मिरवणूकीत डीजेचा वापर; सांगोल्यात १० जणांविरुद्ध गुन्हा

■ जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची अवहेलना

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.५ सप्टेंबर -**
सोलापूर जिल्हाधिकारी यांच्या आदेशाची अवहेलना केल्याबद्दल सांगोला पोलीस ठाणे येथे १० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी, जिल्हाधिकारी आदेशानुसार सार्वजनिक गणेश उत्सव मिरवणुकीमध्ये डॉल्बी सिस्टम व लेझर लाईटचा शो यांचा वापर करणेस दि.२७ ऑगस्ट ते दि.६ सप्टेंबर पर्यंत सोलापूर ग्रामीण जिल्ह्यामध्ये प्रतिबंध आहा.

तरी सुद्धा गुरुवार दि.४ सप्टेंबर रोजी विनापरवाना गणेशोत्सवाची मिरवणुक काढून डॉल्बी सिस्टीम व लेजर लाईटचा शो वापरुन जिल्हाधिकारी यांचे आदेशाचे अवहेलना केली म्हणून सांगोला पोलीस ठाणे येथे अमोल दामाजी पाटील (रा. कुंभारी, ता.जत, जि.सांगली), संकेत ढवळे (रा.मंगळवेढा), सौरभ खामकर (रा.नारायणगाव ता.शिरुर, जि.पुणे), विशाल निळे (रा.पारे, ता.सांगोला), राजु बोत्रे, आप्पा ऐवळे (दोघे रा.सांगोला), समाधान शिवाजी मंडले (रा.करगणी, ता.आटपाडी, जि.सांगली), अतुल गौतम माने, विजय विलास लोकरे, कुमार गणपत शिनगारे (तिघे रा.वाढेगाव ता.सांगोला) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई सांगोला पोलीस निरीक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली रवींद्र साबळे, अमोल वाडकर, विलास बनसोडे यांनी केली. पुढील तपास सांगोला पोलीस करत आहेत.

# अभिनेत्री शिल्पा शेट्टी व राज कुंद्रा यांच्यावर लूकआऊट नोटीस

■ फसवणूक प्रकरणी कारवाई

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. ५ सप्टेंबर-**
विविध वादग्रस्त बाबींमुळे नेहमी चर्चेत राहणारी बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी आणि तिचा व्यावसायिक पती राज कुंद्रा यांच्या अडचणीत आता आणखी वाढणार आहेत.६० कोटीच्या फसवणूक प्रकरणात मुंबई पोलिसांनी त्यांच्याविरुद्ध लूक आउट नोटीस जारी केली आहे. त्यांच्यावर कधीही अटकेची कारवाई होऊ शकते.

मॅचफ़िक्सिग, प्रोनोग्राफीचे गुन्हे दाखल असल्यामुळे राज कुंद्रा गेल्या काही वर्षांपासून तपास यंत्रणेच्या रडारवर आहे. याबाबत शिल्पा शेट्टी हिलाही चौकशीला सामोरे जावे लागले आहे. त्यानंतर कर्ज-गुंतवणूक करारात एका व्यावसायिकाला सुमारे ६० कोटीची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली १४ ऑगस्ट जुहू पोलीस ठाण्यात अभिनेत्री आणि तिच्या पतीविरुद्ध गुन्हा दाखल आहे. त्यानंतर शिल्पा शेट्टीने आपले लोकप्रिय रेस्टॉरंट बंद करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे पोलीस यंत्रणाही सतर्क झाली आहे. दोघेही जण वारंवार आंतरराष्ट्रीय दौरे करत असल्याम ुळे मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने लूकआऊट सर्क्युलर जारी केले आहे. असे पोलीस अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले.

### लूकआऊट नोटीस म्हणजे काय?

लूकआऊट नोटीस किंवा लूकआऊट सर्क्युलर ) ही एक कायदेशीर प्रक्रिया आहे, जी एखाद्या व्यक्तीला देश सोडण्यापासून रोखण्यासाठी किंवा त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी वापरली जाते. कोणत्याही आरोपीनं देशाबाहेर पळ काढू नये,म्हणून विमानतळ आणि बंदर अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले जातात.

# मंगळवेढा शहरातून कॉलेजकुमारची मोटरसायकल चोरट्यांनी पळविली

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि.५ सप्टेंबर-**
शहरातील यशवंतनगर येथे घरासमोर पार्क केलेली होंडा कंपनीची शाईन मोटर सायकल ३० हजार रुपये किंमतीची चोरट्याने मोटर सायकल पळविण्याचा प्रकार घडला असून या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी हिमालय हिवर्डे (रा.यशवंतनगर,मंगळवेढा) याने मोटर सायकल क्रमांक एम.एच.२० ई.ए.४९६३ ही ३० हजार रुपये किंमतीची मोटर सायकल दि.१ सप्टेंबर रोजी रात्री १०.३० वाजता घरासमोर पार्क केली होती. दि.२ रोजी यातील फिर्यादी सकाळी ९ वाजता कॉलेजला जाण्यासाठी घराबाहेर आला तेव्हा लावलेल्या ठिकाणी सदरची मोटर सायकल दिसून आली नाही. म्हणून फिर्यादीचे मित्र संकेत शिवाजी गोडसे,धनाजी गुंडाप्पा जाधव असे मिळून मोटर सायकलचा आजूबाजूला सर्वांनी शोध घेतला मात्र ती कोठेही मि ळून आली नाही. फिर्यादीची खात्री पटली की अज्ञात चोरट्याने मोटर सायकल संमती शिवाय चोरुन नेली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# गणेशोत्सवानिमित्त बँक कॉलनीत महाप्रसादाचे झाले वाटप

■ कार्यकर्ते व महिलांचा उत्स्फूर्त सहभाग; 300 जणांनी घेतला लाभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.५ सप्टेंबर-**
येथील जुळे सोलापूर परिसरातील ज्ञानेश्वर नगर जवळील बँक कॉलनीत गणेशोत्सवानिमित्त विघ्नहर्ता बालगणेश मंडळातर्फे महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यामध्ये ३०० जणांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

गेल्या दहा दिवसापासून सुरू असलेल्या येथील गणेशोत्सवात कॉलनीतील घराघरातील प्रत्येकाकडून गणरायाची उपासना केली गेली. दररोज प्रत्येकाकडून महारती करण्यात आली. यावेळी दररोज प्रसादासाठी प्रत्येकाने विवध पदार्थांचे वाटप केले. प्रभाग २६ च्या माजी नगरसेविका राजश्री चव्हाण व अनिल चव्हाण यांच्या प्रयत्नातून येथील परिसराची जेसीबीच्या सहाय्याने स्वच्छता करण्यात आली. सर्वच कार्यकर्त्यांनी विशेष मेहनत घेतली. गणेशोत्सवानिमित्त आज दि. ५ सप्टेंबर रोजी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सुमारे ३०० जणांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यासाठी मंडळाचे अध्यक्ष अमोल अमोने, रोहन पाटील, समर्थ जाधव, समीर देव, विनय वाळवेकर, श्रीपाद अरोळे, उमाकांत कुलकर्णी, मोहन पाटील, रूद्रय्या स्वामी, नरेंद्र सरवदे, रोहीत वाळवेकर, श्याम मुडके, डॉ. विरभद्र दंडे, विजय सुतार, प्रदिप कोळी, उमेश चांडोले, विश्वास कारंडे, नंदकुमार तुळजापूरकर, प्रतिक चांडोले, सुनंदा देव, सुजाता मुडके, रूपनिहार पार्लरच्या संचालिका अश्विनी जोशी, रेश्मा अमोने, सुनंदा स्वामी, जयश्री पाटील, वंदना वाळवेकर, शशीकला जाधव, उर्मिला कुलकर्णी, शर्मिला सुर्वे, भाग्यश्री कुलकर्णी, संजीविनी अरोळे, रश्मी कांबळे, राहुल कांबळे, डॉ. संतोष कुलकर्णी, विशाल क्षिरसागर यांचे विशेष सहकार्य लाभले. उद्या शनिवारी दि. ६ सप्टेबर रोजी सांयकाळी विसर्जन मिरवणूक निघणार असल्याचे अध्यक्ष श्री. अमोने यांनी सांगितले.

# 'विठ्ठलराव शिंदे' चा गळीत हंगाम १५ ऑक्टोबरपासून

■ वार्षिक सभा खेळीमेळीत
■ दिवाळीसाठी शंभर रुपये ऊस बिल हप्ता
■ कामगारांना एक महिन्याचा पगार बोनस देणार



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.५ सप्टेंबर-**
विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचा यंदाचा गळीत हंगाम १५ ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. शेतकऱ्यांना मागील हंगामात ऊसाला आतापर्यंत २ हजार ८०० रूपये प्रति टन बिल दिले. दिवाळीनिमित्त शंभर रुपये हप्ता देण्यात येणार असून कामगारांना एक महिन्याचा बोनस देण्यात येईल तसेच दिवाळी सणासाठी ३० रुपये किलो दराने ऊस पुरवठादार व सभासद शेतकऱ्यांना घरपोच साखर देण्यात येणार असल्याची माहीती उपाध्यक्ष वामनराव उबाळे यांनी दिली.

विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याच्या २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष स्थानावरून ते बोलत होते. कारखान्याचे संस्थापक अध्यक्ष बबनदादा शिंदे हे हृदय प्रत्यारोपणाच्या यशस्वी शस्त्रक्रियेनंतर अमेरिकेत सेंट लुईस येथील सी जे बी हॉस्पिटलमध्ये उपचार घेत आहेत, त्यामुळे म ागील पंचवीस वर्षाच्या कारकिर्दीत पहिल्यांदाच वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थापक अध्यक्ष बबन दादा शिंदे यांच्या अनुपस्थितीत शांतपणे आणि उत्साहाने पार पडली.

प्रारंभी स्वर्गीय विठ्ठलभाऊ शिंदे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यकारी संचालक संतोष डिग्रजे यांनी प्रास्ताविक करून अहवालाचे वाचन केले. यावेळी संचालक पोपटराव गायकवाड, अमोल चव्हाण, लक्ष्मण खूपसे, सुरेश बागल, नीलकंठ देशमुख, रमेश येवले पाटील, सचिन देशमुख, बापूसाहेब डोके, विष्णू हुंबे, कामगार प्रतिनिधी अनिल वीर ,नाना मोरे, हनुमंत घाडगे, पांडुरंग गाडगे यांचेसह शिवाजीराव पाटील, मार्केट कमिटीचे व्हाईस चेअरमन सुहास पाटील जामगावकर, संचालक दिलीपराव भोसले तसेच कारखान्याचे जनरल मॅनेजर पोपटराव येलपल्ले, संभाजी थीटे ऊस विकासाअधिकारी नारायण लगड, विभाग प्रमुख पीव्ही बागल ,तसेच लेखापरीक्षक व्ही.बी. गुंड, प्रशासनाचे शशिकांत पवार आदी मान्यवरांसहित सभासद कर्मचारी व गावोगावचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन राजेंद्र जाधव यांनी तर आभार प्रदर्शन संचालक सुरेश बागल यांनी केले.

याप्रसंगी अमेरिकेमध्ये बबन दादांच्यावर हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया करणारे डॉक्टर अमित पावले यांचे अभिनंदन करणारा ठराव टाळ्यांच्या गजरात मंजूर करण्यात आला.

कार्यक्रमात कारखान्यामार्फत घेण्यात आलेल्या विठ्ठल ऊस पिक स्पर्धेमध्ये' आडसाली, पूर्व हंगामी व सुरू उसाचे लागण व खोडवा पिकाचे विक्रमी उत्पादन घेणाऱ्या वीस शेतकऱ्यांचा प्रशस्तीपत्रक, सन्मान चिन्ह व रोख रक्कम देऊन मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

# माझ्याकडे रागाने का बघतोस असे म्हणून एकाला डोक्यात दगड घालून केले जखमी

■ दोघांविरुध्द गुन्हा दाखल....

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा दि.५ सप्टेंबर-**
तू येथे का आलास व माझ्याकडे रागाने का बघतोस? असे म्हणून एका २८ वर्षीय चालकाच्या डोक्यात दगड मारुन जखमी केल्याप्रकरणी तात्या सुरेश मस्के,रतिलाल सुरेश म स्के या दोघा विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी तथा जखमी औदुंबर मस्के (रा. ढवळस) हे चालक असून दि.५ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता पाटील पंपा शेजारी कोकरे गॅरेज येथे सदर फिर्यादी इरटीका गाडी रिपेरिंग करिता आणलेली होती. दुपारी ४.१५ वाजता वरील आरोपींनी येथे येवून तू येथे का आलास? माझ्याकडे रागाने का बघतो ? असे म्हणून शिवीगाळी करीत दगड उचलून डोक्यात मारुन जखमी केले. ही भांडणे सोडविण्यास मध्यस्थी येणारा फिर्यादीचा भाऊ रघुनाथ व मिस्त्री कोकरे या दोघांनाही शिवीगाळी करुन जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

# जीवनात नाही म्हणायला शिका, तेव्हाच खरी शांती मिळेल

■ उद्योग बँक बौद्धिक व्याख्यानमालेत मानसोपचार तज्ज्ञ डॉ. वैजयंती पटवर्धन यांचे मत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि.५ सप्टेंबर**
जीवनात प्रत्येकाला खूश करण्यासाठी सतत होकार देत राहिल्यास म ानसिक व शारीरिक आरोग्यावर परिणाम होतो. आग्रहांना नाही म्हणण्याची कला अवगत केल्यास व्यक्ती, कुटुंब आणि समाजात समतोल राहतो.



जीवनात नाही म्हणायला शिका, तेव्हाच खरी शांती मिळेल व यश मिळवता येईल, असे मत पुणे येथील मानसोपचार तज्ज्ञ डॉ. वैजयंती पटवर्धन यांनी व्यक्त केले. उद्योग बँक माजी सेवक सांस्कृतिक मंडळ व रोटरी क्लब सोलापूर एम आयडीसी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित गणेशोत्सव बौद्धिक व्याख्यानमालेत त्या बोलत होत्या. ''कार्य आणि नात्यांचा समतोल... एक कला'' या विषयावर त्यांनी विचार मांडले. डॉ. पटवर्धन पुढे म्हणाल्या, आजचे जीवन म्हणजे तारेवरची कसरत आहे. पूर्वी केवळ बॅलन्सिंग आवश्यक होते, पण आता त्रिव्हिंग म्हणजे जगणे, समतोल राखणे आणि प्रगती करणे आवश्यक झाले आहे. नातेसंबंधातील बदलत्या अपेक्षा लक्षात घेता सम तोल ढासळल्यास मानसिक व शारीरिक विकार उद्भवतात.

घरातील अशांततेमुळे लोक आभासी जगाकडे वळतात, यावर उपाय म्हणून पहाटे चालणे, नियमित फिरणे, योगाभ्यास व प्राणायाम या साध्या सवयी अंगीकारण्याचा सल्ला त्यांनी दिला. आयुष्यातील सर्वात मोठा शत्रू म्हणजे मोबाईल. त्याच्या अतिरेकी वापरामुळे नाती कमकुवत होतात, संवाद कमी होतो आणि व्यक्ती तणावग्रस्त होते. मोबाईलवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष संवाद, कुटुंबास वेळ देणे आणि सकारात्मक सवयींना प्राधान्य द्यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमास व्याख्यानम ाला समितीचे अध्यक्ष श्रीनिवास बिंगी, रोटरी अध्यक्ष रमेश कमटम, सचिव काशीनाथ कुंटला, डॉ. संजय मंठाळे, सुधीर सोमा यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रा. विठ्ठल वंगा यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ज्योती चिडगुपकर यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला.

# मिळकतकर थकीत असलेल्या 13 मालमत्तांचा होणार ई-लिलाव

■ महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**
महानगरपालिकेचा मिळकतकर थकीत असलेल्या १३ मालमत्तांचा ई-लिलाव करण्यात येणार आहे.

या मिळकतदारांनी महापालिकेचा लाखो रुपयांचा मिळकतकर थकीत ठेवला आहे. अशा मिळकतदारांना यापूर्वीच नोटीसा बजावण्यात आल्या होत्या, अशी माहिती महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिली आहे.

खुल्या जागासंदर्भात ज्यांना कराची बिले मिळाले नाहीत अशांना मालमत्ता कर विभागाशी संपर्क साधून थकीत रक्कम भरण्याबाबत वेळोवेळी जाहीर आवाहन करण्यात आले होते. तरीदेखील मिळकतदारांनी प्रतिसाद न दिल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड प्रकरण ८ मधील नियम ४२ अन्वये मि ळकतदारांना मिळकत जप्तीची नोटीस जाहीर प्रसिध्दीकरणाव्दारे देण्यात आली होती.

तसेच थकबाकीदारांना अधिनियमातील तरतुदीनुसार नमुना आय मध्ये ५ दिवसाच्या आत थकबाकी भरण्याबाबत स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरप्रसिध्दीकरणाव्दारे दि. २८ जुलै२०२५ अन्वये नोटीस बजावण्यात आली होती. तरीही १३ मिळकतधारकांनी थकित कर भरला नाही तसेच कोणतीही हरकतही घेतली नाही. यामुळे या १३ मिळकतदारांच्या मालमत्तांचा जाहीर ई-लिलावव्दारे विक्री करून मिळकत कर वसूल करण्यात येणार आहे.सदर ई-लिलाव प्रक्रिया ही सर्वांसाठी खुली असून, नागरीक, विविध आस्थापना, इस्टेट एजंट इ. सर्वजण यामध्ये भाग घेऊ शकतील. यादीमधील मिळकतदारांनी लिलाव प्रक्रियेच्या अंतिम तारखेच्या आत जर थकवाकीची संपूर्ण रक्कम रोखीने अथवा ऑनलाईन भरली तर त्या मि ळकतीचा लिलाव थांबविण्यात येईल. असे महापालिकेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. लिलावाची माहिती www.cauction.gov.in या संकेत स्थळावर दि. ४ सप्टेंबर २०२५ पासून उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ई-लिलावामध्ये भाग घेणेची अंतिम मुदत ९ सप्टेंबर २०२५ अशी आहे, असेही या प्रसिद्धीपत्रकात महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी स्पष्ट केले आहे.

# आठवणी पंढरीतील जुन्या काळातील गणेशोत्सवाच्या

■ काळाच्या ओघात हरवला पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा उत्सवातील उत्साह...

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.५ सप्टेंबर -**
साधारण चार दशकापूर्वी केवळ चार यात्रांवर जगणारे गाव, अशी ओळख असणारे पंढरपूर शहर गणेशोत्सव साजरा करण्यात मात्र सदैव उत्साही असायचे. मात्र अलिकडच्या काळात टिव्ही,मोबाईल आणि इंटरनेटच्या युगात हा उत्साह गायब झालेला दिसून येत आहे. सार्वजनिक मंडळाचे पदाधिकारी,कार्यकर्ते त्यावेळी प्रमाणे गणेश मंडपात ( केवळ स्नान आणि जेवणासाठी सोडून इतर ) ठाण मांडून दहा दिवस मुक्कामी बसलेले दिसून येत नाहीत. तसेच आता पूर्वीसारखे लायटिंग माळा किंवा ऐतिहासिक आणि पौराणिक देखावे देखील सावर्जनिक गणेशोत्सव मंडळे सादर करीत नाहीत ही खरी खंत तो काळ अनुभवलेल्या मंडळींना आज मनाला हुरहूर लावुन जाते.

**महालक्ष्मीचा सण झाल्यावर गर्दी व्हायची**

१९८० ते ९० च्या काळात पंढरपूर येथील गणेशोत्सव म्हणजे धमाल असायची, गावात शेकडो गणेशमंडळे असायची, विसर्जन मि रवणूक दुसऱ्या दिवशी सकाळी आठ वाजेपर्यंत सुरू असायची, महालक्ष्मी सण झाला की देखावे पाहण्यासाठी हजारो स्थानिक नागरिक रात्री एक, दोन वाजेपर्यंत प्रत्येक मंडळाना भेटी देत फिरत असत, अनेक कुटुंबवत्सल लोक फॅमिली सोबत एन्जॉय करीत असत, एखाद्या यात्रेसारखी तोबा गर्दी गणपतीचे देखावे पाहण्यासाठी त्याकाळी होत असे.

**चित्रपट दाखविण्याचा होते प्रस्थ**

मात्र काळाच्या ओघात आज असे चित्र दिसत नाही, मनोरंजनाची साधने वाढली आहेत, पुर्वी असे नव्हते, अनेक मंडळ १६ एम एम प्रिंट आणून मिनी प्रोजेक्टर वर गाजलेले मराठी, हिंदी चित्रपट दाखवत असत. विशेषतः गाताडे प्लॉट, मनीषानगर, रेल्वे कॉलनी, सांस्कृतिक भवन, उजनी वसाहत या ठिकाणी गणपतीच्या शेवटच्या दिवसात त्या काळात नावाजलेले सिनेमे दाखविले जात असे. फ ुकट चित्रपट पहायला लोक गर्दी करत, तेव्हा गणेश मंडळे आपसातील स्पर्धेने आपआपल्या मंडळांचा नावलौकीक वाढावा या ईर्षेने मंडळा मध्ये विविध कार्यक्रम आयोजित करीत असत.

**मंडळांची नावे देखील असायची भन्नाट**

त्या वेळची मंडळांची नावे पण लय भारी असत. संतपेठेतील एका मंडळाचे अचानक तरुण गणेशोत्सव मंडळ, तर शहरातील दुसऱ्या एका मंडळाचे नाव एकाएकी तरुण मंडळ, काळामारुती परिसरातील मंडळाचे नाव स्वारगेट कॉर्नर एकापेक्षा एक भन्नाट अशी होती. विशेष म्हणजे आज ही सर्व मंडळे गणेशोत्सव साजरा करीत आहेत.

**चित्रपटातील दृश्ये सादर करण्यावर असायचा भर**

शहरातील अनेक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळातून महाभारत, रामायण मधील देखावे बरोबरच चक्क हिंदी सिनेमातील दृश्य होत, गांधी रोड येथील मंडळाने गोविंदाच्या हत्या सिनेमातील थरकाप उडविणारे दृश्य साकारले होते, घोंगडे गल्ली येथील मंडळाने अंकुश,प्रतिघात या सारख्या चित्रपटातील दृश्ये सादर केलेली होती. अमिताभ बच्चन यांचा याराना हा चित्रपट गाजला होता त्यावेळी शहरातील एका तरुणाने चक्क लाईटच्या माळा असणारा ड्रेस परिधान करुन, सारा जमाना, हसिनो का दिवाना, हे डिस्को गीत सादर केले होते, तेव्हा ते पाहण्यासाठी तोबा गर्दी होत असे, पोलिसांना बोलावून गर्दी काही मंडळांना गर्दी नियंत्रित करावी लागे.



पंढरीतील नाथ चौक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सादर करण्यात आले होते. १९८३ साली जॅकी श्रॉफ, म ीनाक्षी शेषाद्री यांचा त्याकाळी सुपर हिट ठरलेल्या हिरो या चित्रपटात प्यार करनेवाले कभी डरते नहीं, हे गीत होते, याचा देखावा सादर केलेला होता. विशेष म्हणजे यावेळी शम्मी कपूर यांची भूमिका साकारणारा येथील स्थानिक कलाकार अगदी हुबेहूब दिसत होता, त्याच्या अभिनयाने हे दृश्य गाजले होते. या बरोबरच गांधीरोडवरील बेलापूरकर मठा जवळील गणेशोत्सव मंडळांच्या गणेश मुर्ती देखील पाहण्या सारख्या असत. कोल्हापूरातील पुरेकर बुवा हे कलाकार या मंडळांच्या मुर्ती तयार करीत असत. मुर्ती अतिशय लहान असत मात्र त्या सुबक, आकर्षक आणि वेगळ्या धाटणीच्या असून पाहताक्षणी नजरेत भरणाऱ्या असत. या बरोबरच इंदिरा गांधी भाजी मंडई म धील गणेशोत्सव मंडळाचा देखील गणेशोत्सव पाहण्यासाठी आवर्जून लोकांची गर्दी होत असत. दरम्यान आज चाळीशी, पन्नाशी पार केलेल्या अनेकांना पूर्वीचे उत्साही वातावरणात आठवत आहे. मात्र या सगळ्या मंडळींना खंत आहे ती तेव्हाचा उत्साह, चैतन्यमय वातावरण आज मात्र कुठेही दिसून येत नाही याचीच.

**एसटी स्थानकावरील छोट्या लालपरीचे आकर्षण**

पंढरपूर येथील जुन्या एस टी स्टँड म ध्ये गणपती बसवत असत, तेव्हा बॅटरीवर धावणारी छोटी लाल बस लहानग्यां बरोबरच मोठ्यांचे देखील आकर्षण ठरत असत. या बरोबरच एस.टी.स्थानकावर कारंजे तसेच उजनी धरणाचा केलेला देखावा आज देखील लक्षातून जात नाही. एसटीस्थानकावरील गणेशोत्सवाचा सोहळा पाहण्यासाठी दहा दिवस मोठी गर्दी होत असे.

**वेताळाच्या पालखींमुळे उडायची घाबरगुंडी**


गणेशोत्सवा मध्ये येथील नरवीर तानाजी चौक गणेशोत्सव मंडळांकडून महालक्ष्मी सणा नंतर दररोज वेगवेगळी पौराणिक, त्या त्यावेळच्या सामाजिक स्थितीवर संदेश देणारी सजीव दृश्ये सादर होत असत. या मंडळाचे खास वैशिष्ठ म्हणजे या मंडळांकडून अनंतचतुर्थीच्या आदल्या दिवशी खास वेताळाची पालखी हा सजीव देखावा सादर केला जायचा.

या देखाव्या मध्ये अनेक शाळांमध्ये असलेल्या प्रयोगशाळेतील हाडाचे सापळे खास मागून आणले जायचे. मंडळातील लहानग्यां पासून ते मोठ्या पर्यंत अनेकांना आक्राळविक्राळ मेकअप करुन भयभयीत होणारे संगीत वाजवून हा देखावा सादर केला जात असत. त्यावेळी हाडाच्या कवठ्या, हाडे प्रत्येक सहभागी कलाकारांच्या हाता मध्ये असत. त्यावेळी कुटुंबातील मोठ्या मंडळींबरोबर असलेले लहानगे हा देखावा पाहून घाबरुन जात असत, रडत असत. मात्र या मंडळाचा देखावा पाहिल्याशिवाय शहरातील नागरिकांचा गणेशोत्सव पुर्ण होत नसे.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



## विचारपुष्प



शरीराच्या एकेका अंगाचा आकार, नाव आणि कार्य वेगवेगळे असले, तरी त्या सर्वांचे मिळून एकच जिवंत शरीर असते. शरीराच्या अंगांमध्ये उच्च-नीचतेचा भेद नाही. याचप्रमाणे आपण सारे एकाच हिंदू समाजाचे अंग आहोत. समान आहोत. आपल्यात कोणीही अस्पृश्य नाही.

**हो. वे. शेषाद्री**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह

## आज अनंत चतुर्दशी



### तरुण भारत — उद्या अंक नाही!

शनिवार दि. ६ सप्टेंबर २०२५ रोजी अनंत चतुर्दशीनिमित्त दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालयाला सुट्टी आहे. त्यामुळे रविवार दि. ७ सप्टेंबर २०२५ रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. तसेच रविवारची आसमंत पुरवणी आजच्या अंकासोबत देत आहोत. याची वाचक, विक्रेते आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी.

**- व्यवस्थापक**

## ‘मार्क झुकरबर्ग’चा ‘मेटा’विरुद्ध खटला

**न्यूयॉर्क :** अमेरिकेतील एका वकिलाने फेसबुकची मूळ कंपनी मेटाच्या विरोधात खटला दाखल केला आहे. आता खटला दाखल करण्याचे कारणही खूप मनोरंजक आहे, कारण त्या वकिलाचे नाव मार्क झुकरबर्ग आहे. ते म्हणतात की, फेसबुक वारंवार त्यांचे खाते निलंबित करीत आहे. ज्यामुळे त्यांना व्यवसायात हजारो डॉलर्सचे नुकसान झाले आहे. प्रकरण न्यायालयात पोहोचल्यानंतर कंपनीने माफी मागितली आहे. विशेष म्हणजे, फेसबुकच्या संस्थापकाचे नावही मार्क झुकरबर्ग आहे. वकील झुकरबर्ग म्हणतात की, कंपनीने त्यांचे खाते चुकीच्या कारणांमुळे ब्लॉक केले आहे. ते ३८ वर्षांपासून कायदेशीर व्यवसायात आहेत. मेटाने ११ हजार डॉलर्सच्या जाहिराती काढून टाकून कराराचे उल्लंघन केले.

# भारत-रशियाला आम्ही गमावले

## डोनाल्ड ट्रम्प यांचा सूर नरमला ● एससीओ शिखर परिषदेचे छायाचित्र केले पोस्ट

◆ **वॉशिंग्टन, ५ सप्टेंबर**

भारत आणि रशियासारख्या देशांना आम्ही गमावले आणि वसाहतवादी चीनशी जवळीक साधण्यात भाग पाडल्याचे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले असून, त्यांचा सूर आता नरमला आहे. समाज माध्यमावर केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी हा नरमाईचा सूर घेतला. भारत आणि रशियाला दीर्घ आणि समृद्ध भविष्य मिळो, अशा शुभेच्छा देतो असेही त्यांनी म्हटले आहे.

भारताविरोधात ५० टक्के टॅरिफ लादून द्विपक्षीय संबंधात तणाव निर्माण करणाऱ्या ट्रम्प यांनी चीनमधील तियानजिन येथे झालेल्या शांघाय सहकार्य संघटना अर्थात् एससीओ शिखर परिषदेतील पंतप्रधान मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचे एकत्र छायाचित्र पोस्ट केले. आपल्या निर्णयांवर पश्चात्ताप करताना त्यांनी पोस्टमध्ये म्हटले की, या छायाचित्रावरून मला असे दिसते की, आपण भारत आणि रशियाला चीनसारख्या वसाहतवादी राष्ट्राशी जवळीक साधण्यास भाग पाडले.

अमेरिकेने भारतासारखा विश्वासू आणि मजबूत संबंध असलेला मित्र गमावला. देव त्यांना दीर्घ आणि समृद्ध भविष्य देवो अशी प्रार्थना मी करतो. हा प्रकार टाळण्याचा मी खूप प्रयत्न केला, मात्र देशाची सुरक्षा, महसुलातील तूट आणि युक्रेनविरोधातील संघर्ष टाळण्यासाठी काही कठोर निर्णय घ्यावे लागले. मित्र राष्ट्रांनी आमच्यापासून दूर जावे असा हेतू यामागे नव्हता. भारताने सावध राहायला हवे, असा सल्ला ट्रम्प यांनी दिला. ◀(वृत्तसंस्था)



### सेमीकंडक्टरवर शंभर टक्के टॅरिफ लावणार

ट्रम्प यांनी समाज माध्यमावरील पोस्टमध्ये सेमीकंडक्टरच्या आयातीवर शंभर टक्के टॅरिफ लावणार असल्याची घोषणा केली. या क्षेत्रातील कंपन्यांनी अमेरिकेत प्रकल्प सुरू करावे हा टॅरिफचा उद्देश आहे. ज्या कंपन्या अमेरिकेत नाहीत, त्यांच्याकडून आयात केल्या जाणाऱ्या सेमीकंडक्टरच्या सुट्या भागांवरदेखील टॅरिफ लागू असेल.एखादी कंपनी अमेरिकेत कारखाना उभारण्यास तयार असेल, तर त्यांना शुल्कातून सूट मिळेल. ■

### अधिकृत माहिती नाही : रणधीर जयस्वाल



साप्ताहिक पत्रकार परिषदेत ट्रम्प यांच्या पोस्टबद्दल विचारले असता, परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल म्हणाले, भारतासंदर्भात त्यांनी केलेल्या पोस्टची मला कुठलीही अधिकृत माहिती नाही. यावेळी त्यांनी ट्रम्प यांचे सल्लागार पीटर नवारो यांनी भारताविरोधात केलेल्या टिप्पणीला प्रत्युत्तर देताना म्हटले की, त्यांनी ब्राह्मण समाजासंदर्भातील केलेले भाष्य आक्षेपार्ह आणि दिशाभूल करणारे आहे आणि आम्ही त्याचा निषेध करतो. अमेरिकेसोबतचे संबंध सरकारसाठी खूप महत्त्वाचे आहेत. ■

# शिक्षकांच्या योगदानाने देश होईल ‘सुपर पॉवर’

## राज्यातील सहा शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार



डॉ. राधाकृष्णन् यांना अभिवादन करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे प्रतिपादन

◆ **नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते शिक्षक दिनी महाराष्ट्रातील सहा शिक्षकांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी बोलताना राष्ट्रपतींनी शिक्षकांचे योगदानच भारताला ‘सुपर पॉवर’ अर्थात् महासत्ता बनवेल, असे मत व्यक्त केले.

द्रौपदी मुर्मू यांनी येथील विज्ञान भवनात आयोजित एका शानदार कार्यक्रात ४५ शालेय शिक्षक, २१ उच्च शिक्षण १६ कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मान केला. प्रमाणपत्र, रौप्य पदक व रोख ५० हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

महाराष्ट्रातील ६ शिक्षकांनाही हा पुरस्कार मिळाला. त्यात नांदेडच्या अर्धापूर येथील जिल्हा परिषदेचे शिक्षक डॉ. शेख मोहम्मद वकिउद्दीन शेख हमीदोद्दीन, मुंबई स्थित एटॉमिक एनर्जी सेंट्रल स्कूल नं. २ च्या शिक्षिका सोनिया विकास कपूर, लातूरच्या दयानंद कॉलेज ऑफ आर्ट्स महाविद्यालयाचे शिक्षक डॉ. संदीपन गुरुनाथ जगदाळे, मुंबई स्थित शाह ॲण्ड अँकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या डॉ. नीलाक्षी जैन, बारामतीच्या एस व्ही पी एम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड इंजिनीअरिंगचे प्रा. पुरुषोत्तम पवार यांचा समावेश आहे. ◀(वृत्तसंस्था)

### नागपुरातील अनिल जिभकाटे यांचाही गौरव

संत जगनाडे महाराज शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प निदेशक अनिल जिभकाटे यांना यंदाचा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत येणाऱ्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेमधील वेल्डर व्यवसायातून कौशल्याचार्य, शिक्षक पुरस्कार अनिल रामदास जिभकाटे यांना मिळाला. महाराष्ट्राला व नागपूर विभागाला या गटातील हा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार पहिल्यांदाच मिळाला.

# टॅरिफमधून मिळणार व्यावसायिकांना दिलासा

◆ **नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

केंद्र सरकार आता नवीन अमेरिकन टॅरिफमुळे त्रस्त निर्यातदारांसाठी दिलासा जाहीर करण्याची तयारी करीत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या ५० टक्के टॅरिफमुळे प्रभावित झालेल्या कापड, रत्ने आणि दागिने यासारख्या क्षेत्रांना मदत करण्यासाठी लवकरच अनेक योजना सुरू केल्या जाणार आहेत. या पॅकेजमुळे लहान निर्यातदारांच्या अडचणी कमी होतील, नोकऱ्या वाचतील आणि नवीन बाजारपेठा शोधण्यास मदत होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार कोरोना दरम्यान लहान, लघु आणि मध्यम उद्योग यांना देण्यात आलेल्या मदतीच्या धर्तीवर हे मदत पॅकेज तयार करीत आहे. यासोबतच अर्थसंकल्पात जाहीर केलेल्या निर्यात प्रोत्साहन मोहिमेची अंमलबजावणी जलद करण्यासाठी देखील प्रयत्न केले जात आहेत, जेणेकरून भारताचा जागतिक व्यापार अधिक मजबूत होणार आहे.

**या क्षेत्रांना दिलासा मिळेल?**

अमेरिकेने अलीकडेच भारतीय वस्तूंवर ५० टक्के कर लादला आहे, यापैकी २५ टक्के कर रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल दंड आहे. या कर आकारणीमुळे कापड, रत्ने आणि दागिने, चामडे, पादत्राणे, रसायने, अभियांत्रिकी वस्तू, कृषी आणि सागरी उत्पादने यासारख्या क्षेत्रांवर परिणाम झाला आहे. या उद्योगांमधील निर्यातदारांना त्यांची स्पर्धात्मकता टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. सरकारचे लक्ष लहान निर्यातदारांच्या रोख रकमेच्या तुटवड्यावर मात करणे, भांडवलाच्या समस्या कमी करणे आणि नोकऱ्या वाचवणे यावर असणार आहे. याशिवाय, नवीन बाजारपेठांचा शोध घेण्यासाठी आणि अडचणी न येता उत्पादन चालविण्यासाठी योजना आखल्या जात आहेत. ◀(वृत्तसंस्था)



मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश श्री चंद्रशेखर यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी राजभवनात गोपनीयतेची शपथ दिल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पगुच्छ देत त्यांना शुभेच्छा दिल्या

# हैदराबादमध्ये छापा; पाच हजार कोटींचे एमडी जप्त

◆ **मुंबई, ५ सप्टेंबर**

मीरा भाईंदर पोलिसांच्या गुन्हे शाखेने शुक्रवारी हैदराबादपासून २० किमी अंतरावरील रचकोंडा येथील चेरलापल्ली एमआयडीसीमधील एका कारखान्यावर छापा टाकून पाच हजार कोटींचे एमडी जप्त केले. कारवाईत मादक पदार्थ बनविण्यासाठी वापरण्यात येणारे उपकरणे आणि साहित्य जप्त करण्यात आले. कारखाना मालकाला पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिस अधिकाऱ्याने सांगितले की, काही दिवसांपूर्वी मादकपदार्थाची तस्करी करणाऱ्या टोळीला अटक करण्यात आली होती. आरोपींनी हैदराबाद येथील एका कारखान्यातून मादकपदार्थ आणल्याचे सांगितले होते. या माहितीच्या आधारे केलेल्या तपासानंतर एक पथक हैदराबादला गेले. त्यांनी कारखान्यावर पाळत ठेवली होती.

या कारखान्यातून एमडी पाठविला जात असल्याची पुष्टी झाल्यानंतर धाड टाकण्यात आली. गुन्हे शाखेच्या पथकाने कारखान्यातून पाच हजार कोटींचे एमडी आणि साहित्य जप्त केले. एमडी बनवणाऱ्या कारखाना मालकास पोलिसांनी अटक केली आहे. ◀(वृत्तसंस्था)

# राज्यातील ‘सीसीएमपी’ डॉक्टरांची ‘एमएमसी‘ मध्ये नोंद होणार

**मुंबई, ५ सप्टेंबर**

राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांसाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेत, राज्य सरकारने सीसीएमपी (सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्न फॉर्मकॉलॉजी) कोर्स पूर्ण केलेल्या डॉक्टरांची नोंद महाराष्ट्र वैद्यक परिषदेच्या (एमएमसी) स्वतंत्र नोंदवहीत करण्याचे आदेश जारी केले आहेत.



या निर्णयामुळे राज्यातील सुमारे एक लाख होमिओपॅथी डॉक्टरांना मोठा दिलासा मिळाला असून, त्यांना मर्यादित स्वरूपात आधुनिक औषधोपचार करण्याचा अधिकार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाने २०१४ साली होमिओपॅथी डॉक्टरांसाठी आधुनिक औषधशास्त्रावर आधारित प्रमाणपत्र अभ्यासक्रम म्हणजेच सीसीएमपी कोर्स सुरू केला होता. यामागचा उद्देश म्हणजे ग्रामीण व दुर्गम भागात प्राथमिक आरोग्य सेवा सक्षम करणे आहे. या कोर्ससंदर्भात सरकारने ३० जून २०२५ रोजी आदेश काढून, कोर्स पूर्ण करणाऱ्या डॉक्टरांची नोंद महाराष्ट्र वैद्यक परिषदेकडे करण्याचे निर्देश दिले होते.

# ४०० किलो आरडीएक्ससह १४ दहशतवादी भारतात शिरले

## मुंबई पोलिसांना आत्मघातकी हल्ल्याची धमकी देणारा मेसेज

**मुंबई, ५ सप्टेंबर**

राज्यात गणेशोत्सवाचा उत्साह असताना सार्वजनिक गणपती विसर्जनापूर्वी मुंबई पोलिसांना धमकीचा मेसेज आला आहे. मुंबई वाहतूक पोलिसांच्या व्हॉट्सअपवर आत्मघातकी हल्ल्याची धमकी आल्याने खळबळ माजली आहे.

मुंबई शहरात ३४ वाहनांमध्ये जवळपास ४०० किलो आरडीएक्स पेरले असून, एक कोटीहून अधिक लोकांना मारण्याची ही योजना असल्याचे मेसेजमध्ये उल्लेख आहे. या मेसेजनुसार, लष्कर-ए-जिहादीचे १४ पाकिस्तानी दहशतवादी भारतात घुसले आहेत, असा दावा करण्यात आला आहे.



पाकिस्तानी दहशतवादी संघटनेचा सदस्य असल्याचा मेसेज पाठवणाऱ्या व्यक्तीने दावा केला आहे. सप्टेंबर ३ तारखेला संध्याकाळी मुंबई वाहतूक पोलिसांच्या सोशल मीडिया व्हॉट्सअप नंबरवर हा मेसेज आला होता. या मेसेजची तात्काळ दखल घेत मुंबई पोलिसांच्या नियंत्रण कक्षाला ही बाब कळवली. त्यानंतर सुरक्षा यंत्रणांनी मेसेज पाठवणाऱ्याची चौकशी सुरू केली आहे. या धमकीमुळे पोलिस सतर्क झाले आहेत. ठिकठिकाणी नाका तपासणी आणि कडेकोट बंदोबस्त लावण्यात आला आहे. ऑगस्टमध्येही अशाच प्रकारे वरळीतील एका हॉटेलमध्ये बॉम्ब ठेवल्याचा ई-मेल नियंत्रण कक्षाला प्राप्त झाला होता.

# रशियाविरुद्ध २६ युरोपियन देश एकवटले

## इमॅन्युएल मॅक्राँ यांची घोषणा ● युक्रेनला सुरक्षा हमी ● सीमेवर सैन्य तैनात करण्यास मान्यता

◆ **पॅरिस, ५ सप्टेंबर**

युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आणि युरोपियन नेत्यांनी गुरुवारी पॅरिसमध्ये अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ यांच्याशी बैठक घेतली. यामध्ये युद्धग्रस्त युक्रेनसाठी सुरक्षा हमींवर चर्चा झाली. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी सुरक्षा हमी आणि २६ देशांचे सैन्य युक्रेनच्या सीमेवर तैनात करणार असल्याची घोषणा केल्याने रशियाविरोधात युरोपियन देशांनी दंड थोपटल्याचे स्पष्ट झाले आहे.

मॅक्राँ यांनी सांगितले की, बैठकीला युरोपियन युनियनसह ३५ देशांचे नेते उपस्थित होते. युक्रेनमध्ये आंतरराष्ट्रीय सैन्य तैनात करण्यावर २६ देशांचे एकमत झाले आहे. भविष्यात रशियाकडून होणारा हल्ला रोखण्यासाठी यामुळे मदत होईल. काही देश युक्रेनच्या सीमेवर सैन्य तैनात करणार आहे. युक्रेनियन सैन्याला प्रशिक्षण देणे आणि शस्त्रास्त्रे पुरवणे यावरदेखील एकमत झाले. सुरक्षा हमीमध्ये किती सैन्य सहभागी असेल याची माहिती त्यांनी दिलेली नाही. जर्मनीसारखे काही देश अजूनही निर्णय प्रक्रियेत असल्याने मदत देणाऱ्या देशांची संख्या वाढू शकते आणि अमेरिकेच्या सहभागाबाबत अंतिम निर्णय पुढील काही दिवसांत अपेक्षित असल्याचे मॅक्राँ म्हणाले.



**शांतता अजूनही दूरचे स्वप्न**

युक्रेनमध्ये शांतता अजूनही दूरचे स्वप्न दिसते, परंतु युद्ध संपल्यानंतरही त्यांना कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीसाठी तयार राहायचे आहे. या प्रयत्नातून आम्ही युक्रेनला पाठिंब्याची खात्री देऊ शकतो. कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि जपानदेखील बैठकीत सहभागी झाला. त्यांनी अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. ◀(वृत्तसंस्था)

### धडा शिकविण्याची हीच वेळ : झेलेन्स्की

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जियो मेलोनी यांनी युक्रेनमध्ये सैन्य पाठवणार नसल्याचे स्पष्ट केले. तथापि, त्यांनी सांगितले की इटली युद्धबंदीचे निरीक्षण करण्यास आणि देशाबाहेर युक्रेनियन सैन्याला प्रशिक्षण देण्यास तयार आहे. झेलेन्स्की यांनी या निर्णयाचे वर्णन ऐतिहासिक असल्याचे सांगितले. ते म्हणाले की, युक्रेनच्या सुरक्षेसाठी हा उपक्रम खूप महत्वाचा आहे. सध्या रशियाकडून युद्ध संपवण्याचे कोणतेही संकेत दिसत नाही, त्यामुळे एकत्रितपणे त्यांना धडा शिकविण्याची वेळ आली आहे. ■

# संघर्ष थांबवा, युद्धाचा काळ नाही

## भारताची संयुक्त राष्ट्र संघात भूमिका ● निष्पापांची जीवितहानी अस्वीकारार्ह

◆ **न्यू यॉर्क, ५ सप्टेंबर**

युक्रेन संघर्ष संपवण्यासाठी राजनैतिक प्रयत्नांना पाठिंबा देण्यास भारत तयार आहे. शाश्वत शांततेसाठी सर्व भागधारकांचा पूर्ण सहभाग आणि वचनबद्धता खूप महत्त्वाची आहे. भारत या दिशेने अलिकडच्या सकारात्मक घडामोडींचे स्वागत करतो. रशिया-युक्रेनमध्ये सुरू असलेला संघर्ष थांबविण्यासाठी संवादातून तोडगा काढायला हवा, हा युद्धाचा काळ नाही आणि निष्पापांची जीवितहानी आम्हाला नाही, अशी भूमिका संयुक्त राष्ट्र संघातील भारताचे राजदूत पार्वतनेनी हरीश यांनी गुरुवारी मांडली.

रशिया-युक्रेन संघर्षावर संयुक्त राष्ट्रांत आयोजित चर्चेत बोलताना हरीश म्हणाले, संघर्ष थांबावा आणि प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याच्या बाजूने भारताची भूमिका आहे. भारत युक्रेनमधील परिस्थितीबद्दल चिंतित आहे. निष्पाप नागरिकांचा मृत्यू आम्हाला अस्वीकारार्ह आहे. संघर्ष संपवण्यासाठी संवाद आणि राजनयिकता हाच एकमेव मार्ग आहे यावर भारताने सातत्याने भर दिला,



हा मार्ग कितीही गुंतागुंतीचा किंवा कठीण वाटत असला तरी, त्याचा स्वीकार करावाच लागेल. परस्पर हिताच्या मुद्यांवर आणि युक्रेनमधील संघर्ष संपवण्याच्या प्रयत्नांवर भर द्यायला हवा. चिरस्थायी शांततेसाठी सर्व भागधारकांचा पूर्ण सहभाग आणि वचनबद्धता खूप महत्वाची आहे. भारत या दिशेने अलिकडच्या सकारात्मक घडामोडींचे स्वागत करतो.

**अलास्कामधील बैठकीचे स्वागत**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात अलास्कामध्ये झालेल्या बैठकीचे स्वागत करतो. चर्चेतूनच संघर्षावर तोडगा निघणार आहे. पंतप्रधान मोदी सध्याच्या परिस्थितीवर राष्ट्राध्यक्ष पुतिन, राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की आणि युरोपीय नेतृत्वाच्या संपर्कात आहेत. आम्हाला विश्वास आहे की हे सर्व राजनैतिक प्रयत्न युक्रेनमध्ये सुरू असलेला संघर्ष संपवण्यास मदत करतील आणि कायमस्वरूपी शांततेच्या शक्यता निर्माण करतील.

**राजनैतिक प्रयत्नांना पाठिंबा**

संघर्षाचे इतर परिणाम जगभरातील देशांवर आणि विशेषतः दक्षिणेतील देशांवर परिणाम करत आहे. संघर्षाच्या परिणामांमध्ये इंधनाच्या वाढत्या किमतींचाही समावेश आहे. युक्रेन संघर्षाकडे भारताचा दृष्टिकोन लोककेंद्रित आहे, युक्रेनला मानवतावादी मदत देणाऱ्या भागीदारांचे आम्ही स्वागत करतो. युक्रेनमधील संघर्ष लवकर संपवणे हे सर्वांच्या हिताचे आहे. भारत संघर्ष लवकर संपवण्यासाठी राजनैतिक प्रयत्नांना पाठिंबा देण्यास तयार आहे. ◀(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# संतुलितच असावा विकास

विकास आणि विनाश यातील सीमारेषा खूप अस्पष्ट आणि पुसट आहे. विकास कुठे संपतो आणि विनाश कुठे सुरू होतो, हे सांगणे अवघड आहे. महत्त्वाचे म्हणजे यासाठी विकासाची निश्चित व्याख्या आम्हाला करावी लागेल. विकास कोणासाठी आणि कशासाठी करायचा हे विचारपूर्वक ठरवावे लागेल. त्यानंतर विकासाची गरज अधोरेखित करून त्या दिशेनेच विकासाची गाडी हळुवारपणे आणि योग्य मार्गावरून न्यावी लागेल. विकासाची गाडी भरधाव सोडली की होत्याचे नव्हते व्हायला वेळ लागत नाही. अतिरेकी आणि अनियंत्रित विकासामुळे पर्यावरणाची अपरिमित आणि कधीच भरून न निघणारी हानी होत आहे. विकासाचा हा भस्मासुर पर्यावरणासोबत आणि मानवी जीवनाचीही राखरांगोळी करत आहे. याचा अर्थ विकास हा करायचा नाही, विकासाची गरज नाही, असे नाही. पण विकास हा मानवाच्या भल्यासाठी, त्याचे जीवनमान उंचावण्यासाठी असला पाहिजे; त्याचा नाश करणारा नसावा. विकास हा नेहमीच संतुलित आणि मानवकेंद्रित असला पाहिजे. असंतुलित आणि मानवाचा नाश करणारा विकास हा एखाद्या नरभक्षकासारखा असतो. तो तुम्हाला कधी गिळंकृत करून टाकेल, याचा नेम नसतो. याचा अनुभव सध्या संपूर्ण उत्तर भारत घेत आहे. उत्तर भारतातील जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, राजस्थान, पंजाब आणि हरयाणा या राज्यात जी नैसर्गिक आपत्ती आली आहे, त्याचे मूळ या दिशाहीन आणि पर्यावरणाची हानी करणाऱ्या आत्मघातकी विकासात दडले आहे. पर्यावरणाचा बळी देऊन होणारा विकास समस्त मानवजातीच्या मुळावर येत असतो.

विकासात पहिला बळी झाडांचा जात असतो. झाडे कापल्यानंतर अपरिहार्यपणे पर्यावरणाचा नाश होत असतो. त्यामुळेच सर्वोच्च न्यायालयालाही त्याची दखल घ्यावी लागली. बेकायदेशीरपणे झाडे तोडल्यामुळे निसर्ग कोपला, असे ताशेरे सर्वोच्च न्यायालयाने ओढले आहेत. झाडे तोडल्यामुळेच जम्मू-काश्मीर, उत्तराखंड, पंजाब व हिमाचल प्रदेशमध्ये गंभीर पूरस्थिती उद्भवल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणाच्या मुद्यावर सरकारची कानउघाडणी करण्याची ही पहिली वेळ नाही. याआधी दोन-तीन वेळाही सरकारचे कान उपटले आहेत. पण हा प्रश्न फक्त केंद्र सरकारचा नाही तर राज्य सरकारचाही आहे. यासाठी केंद्र आणि राज्य सरकारला एकत्रित प्रयत्न करावे लागतील. डोंगरावरील बेकायदेशीर वृक्षतोड हे या नैसर्गिक आपत्तीचे प्रमुख कारण आहे; खरं म्हणजे याला वृक्षतोड म्हणणेही योग्य नाही, तर ही वृक्षांची कत्तल म्हणायला पाहिजे. वृक्षांची बेकायदेशीर कत्तल होत असल्यामुळे निसर्ग सूड घेत असल्याचे अतिशय महत्त्वपूर्ण निरीक्षण न्यायालयाने नोंदविले आहे. आतातरी सगळ्यांचे डोळे उघडले पाहिजे. आताही आमचे डोळे उघडत नसतील तर आमचे डोळे कायमस्वरूपी बंद व्हायला वेळ लागणार नाही. ही आपत्ती नैसर्गिक नाही तर मानवनिर्मिती म्हटली पाहिजे.

ग्लोबल वॉर्मिंगची चर्चा गेल्या काही वर्षांत सुरू झाली आहे. पृथ्वीचे तापमान वाढत आहे. त्यामुळे हिमालयातील बर्फांचे पर्वत म्हणजे ग्लेशियर वितळू लागले आहे. याला आपण दैवी आणि नैसर्गिक आपत्ती म्हणू शकत नाही, तर ही मानवनिर्मित आपत्ती म्हणायला पाहिजे. उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशमध्ये दरड कोसळण्याच्या घटना वाढल्या आहेत. नद्यांना अचानक पूर येऊ लागला आहे. ढगफुटीच्या घटनाही गेल्या काही वर्षांत वाढल्या आहेत. आम्ही जर निसर्गाची काळजी घेतली, पर्यावरणाचे रक्षण केले तर निसर्गही आमचे रक्षण करायला तयार आहे. निसर्गाने आपली सीमा आणि मर्यादा कधीच ओलांडली नाही. मात्र मानवाने लाजलज्जेसोबत मर्यादा सोडली आहे. त्याचे परिणाम वा दुष्परिणाम दरड कोसळण्याच्या घटना आणि गंभीर अशा पूरस्थितीतून जाणवत आहे. यामागचे खरं कारण वृक्षतोड हे आहे. हे एकमेव कारण नसले तरी एक कारण नक्की आहे. झाडांची मुळं ही जमिनीतील माती धरून ठेवतात, त्यामुळे दरड कोसळण्याच्या घटनांना आळा बसतो. पण मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी अनियंत्रित वृक्षतोड सुरू केली. काही वर्षांपूर्वी चंदन तस्कर वीरप्पनच्या नावाची खूप चर्चा होती. काही दशकं तो जंगलातील मौल्यवान अशी चंदनाची झाडे तोडत होता, त्याची तस्करी करत होतो. एक संघटित असे जाळे त्याने तयार केले होते. पोलिस, प्रशासन आणि राजकारण्यांची प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष साथ असल्याशिवाय कोणीही एवढ्या दीर्घकाळ चंदनाची तस्करीच काय, कोणताही गुन्हा करू शकत नाही, हे शेंबड्या पोरालाही समजते. विशेष म्हणजे वीरप्पन एका नाही तर तीन-चार राज्यातील पोलिसांना हुलकावणी देत होतो, असे म्हणण्यापेक्षा हप्ते देत असावा, असे म्हणायला हरकत नाही. गेल्या काही वर्षांत उन्हाळा अतिशय तापू लागला आहे. तापमान ५० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचू लागले आहे. त्यामुळे वातानुकूलित यंत्राची म्हणजे एसीची मागणी वाढत आहे. एसीमध्ये जो गॅस वापरला जातो, त्याने पर्यावरणाची हानी होत असते. याला कारण म्हणजे खरे जंगल कमी होत आहे. शहरात सिमेंटचे जंगल वाढत आहे. हा कोणा एका देशासाठी नाही तर संपूर्ण जगासाठी आणि पर्यायाने मानवजातीसाठी धोक्याचा इशारा आहे. २० ते २५ वर्षांपूर्वी जसे पर्यावरण होते, तसे आता राहिले नाही. उन्हाळ्यात कोणत्याही शहरात सायंकाळी वा रात्री थंड वारे वाहात होते. आज थंड हवेची म्हणून जी ठिकाणे आहे, तेथील हवा गरम होऊ लागली आहे. यावर्षी संपूर्ण देशात अतिवृष्टी झाली, सगळ्या राज्यात पूरस्थिती होती आणि अजूनही आहे. विशेष म्हणजे पुरामुळे प्राणहानी आणि वित्तहानी मोठ्या प्रमाणात होत असते. राजधानी दिल्लीही यातून सुटली नाही. राजधानी दिल्लीत यमुना नदी धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचली आहे. उत्तरेकडील राज्यातून पाणी सोडावे लागल्यामुळे राजधानी दिल्लीत यमुना नदी धोक्याच्या पातळीपर्यंत पोहोचली आहे. राजधानी दिल्लीत तासभरही मुसळधार पाऊस झाला तर रस्त्यावर पाणी साचून वाहतुकीची कोंडी होते. याला कारण आहे, नियोजनशून्य विकास. सिमेंटचे रस्ते आणि मोठमोठे उड्डाणपूल बांधले म्हणजे विकास झाला असे नसते. देशाच्या एका भागात पूरस्थिती असते, तर दुसऱ्या भागात कोरडा दुष्काळ. यावर नदी जोड प्रकल्पाचा पर्याय समोर आला होता. एका पट्ट्यातील नद्या एकमेकांना जोडायच्या. म्हणजे ज्या नदीतील पाण्याची पातळी वाढली, त्यातील पाणी ज्या नदीत पाणी कमी आहे, तेथे सोडायचे. मात्र या प्रकल्पाचा खर्च अमर्याद आहे. त्यामुळे तो प्रस्ताव बारगळला.

एखाद्या व्यक्तीचा एखादा पाय सुजला म्हणजे ती व्यक्ती शारीरिकदृष्ट्या तंदुरुस्त झाली असे म्हणता येणार नाही. असा एक पाय सुजणे हे हत्तीरोगाचे लक्षण म्हटले पाहिजे. दोन्ही हात आणि दोन्ही पायांसोबत संपूर्ण शरीर विकसित झाले तर तो शारीरिकदृष्ट्या सक्षम आहे, असे म्हणता येऊ शकेल. विकासाचेही तसेच आहे. ग्लोबल वॉर्मिंगबाबत जागतिक स्तरावर अनेक परिषदा होतात, पण या परिषदात प्रस्ताव पारित करण्याशिवाय आणि उपस्थित नेत्यांचे सुहास्य मुद्रेतील छायाचित्र काढण्याशिवाय कोणतेही ठोस निर्णय होत नाही. आवश्यक उपाययोजना केल्या जात नाहीत. आज अनेक शहरात डोंगर कापून बिल्डर लोक मनमानी पद्धतीने बहुमजली इमारती बांधत आहेत. लोकांना सुविधा पुरविण्याच्या नावावर चारधाम यात्रेच्या मार्गावर सिमेंट काँक्रिटचे रस्ते बांधले जाते आहेत. विद्युत प्रकल्प उभारले जात आहे. हे करताना तेथील भौगालिक रचनेकडे आपण सोयीस्कर दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालय सरकारची कानउघाडणी करत आहे. सरकारने आता तरी शहाणे झाले पाहिजे. विकासाच्या नावावर सुरू केलेल्या माकडचेष्टा थांबवल्या पाहिजे. विकास हा संतुलित आणि गरजेनुसार असला पाहिजे. पर्यावरणानुकूल जीवनशैलीचा अवलंब करण्याची आज खरी गरज आहे. कारण पर्यावरण टिकले तर मानवी जीवन राहणार आहे, पर्यावरणाचा नाश झाला तर मानवी जीवनाचा नाश व्हायला वेळ लागणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निर्णयाचा हा शोध आणि बोध म्हटला पाहिजे.


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# लोकां सांगे ब्रह्मज्ञान...

भुवनेश्वरच्या खंदागिरीबारी परिसरात सुभद्रा आणि विश्वजित नावाचे नवविवाहित जोडपे राहत होते. सुभद्रा बँकेत नोकरी करायची, तर विश्वजित एका छोट्या फार्मसीचा मालक. त्यांचे आयुष्य साधे आणि शांत होते. पण एके दिवशी त्यांच्या आयुष्यात असा प्रसंग घडला ज्याने त्यांना धक्का बसला. विश्वजित दुपारी घरी परतले तेव्हा त्यांना मुख्य दाराचा उघडा दिसला आणि बेडरूममधील कपाटाचे टाळे तुटलेले आढळले. घरात चोरी झाली होती. ३०० ग्रॅम सोन्याचे दागिने आणि ५ लाख रुपये रोख चोरून नेले. नवविवाहित संसाराला नुकतीच सुरुवात केलेली. अशा परिस्थितीत घरात इतकी मोठी चोरी झाल्याने दोघंही खचून गेले. त्यांनी भारतपूर पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपास सुरू केला. काही दिवसांतच त्यांना संशयित सापडला. पोलिसांनी त्याच्या हालचालींवर सुमारे एक आठवडा पाळत ठेवली आणि अखेरीस त्याला खंदागिरीबारी येथून अटक केली. त्याच्याकडून २०० ग्रॅम सोन्याचे दागिने, १ लाख रुपये रोख, चोरीसाठी वापरलेली मोटरसायकल आणि लोखंडी रॉड जप्त करण्यात आला. तपासात असे समोर आले की, त्याने केलेल्या ३०० ग्रॅम सोन्यापैकी ८२ ग्रॅम नयागड येथील आर्थिक संस्थेत ४.७३ लाख रुपये कर्ज घेण्यासाठी गहाण ठेवले होते. उर्वरित १०० ग्रॅम सोने आणि रोख रक्कम त्याच्याकडून जप्त करण्यात आली. पोलिसांनी सर्व चोरीचे सामान तक्रारदाराला परत केले.

आता तुम्हाला प्रश्न पडला असेल कोण होता तो चोर? तो होता मनोजकुमार सिंग, ४२ वर्षांचा यूट्यूबर, जो त्याच्या चॅनेलवर प्रेरणादायी व्हिडीओ बनवायचा. त्याच्या व्हिडीओमध्ये तो प्रामाणिकपणा आणि गुन्हेगारीपासून दूर राहण्याचा सल्ला देत असे. लोक त्याला प्रेरक वक्ता म्हणून ओळखत होते. मनोजवर यापूर्वीही भुवनेश्वर आणि नयागड येथे अनेक चोरीचे गुन्हे दाखल होते. तो रात्री बंद घरे शोधून, लोखंडी रॉडने दार तोडायचा आणि काही मिनिटांत चोरी करून पसार व्हायचा. त्याच्या यूट्यूब चॅनेलमुळे लोकांना वाटायचे की तो सुधारला आहे; खरे तर तो आपल्या गुन्ह्यांना यूट्यूबच्या आड लपवत होता. अटकेनंतर त्याच्या मुलीने त्याचे चॅनेल डिलीट केले. पोलिसांनी मनोजला न्यायालयात हजर केले, जिथे त्याला कोठडी सुनावण्यात आली. या घटनेने परिसरात खळबळ माजली. कारण एका प्रेरक वक्त्यामागचा खरा चोराचा चेहरा समोर आला होता. पोलिसांनी लोकांना सावध राहण्याचा आणि ऑनलाईन व्यक्तींच्या दाव्यांची पडताळणी करण्याचा सल्ला दिला.




पोलिस आयुक्त एस. देव दत्ता सिंग यांनी सांगितले की, मनोज हा एक सराईत चोर आहे, जो विशेषतः बंद घरे आणि स्वतंत्रपणे उभी असलेली घरे लक्ष्य करत असे. त्याच्यावर भुवनेश्वर आणि नयागड येथील विविध पोलिस स्टेशनांमध्ये १० हून अधिक चोरीच्या गुन्ह्यांची नोंद आहे. २०११ पासून त्याचा गुन्हेगारी इतिहास आहे आणि यापूर्वीही त्याला १० वेळा अटक झाली होती. या प्रकरणात तो जामिनावर बाहेर होता. मनोजची मॉडस ऑपरेंडी अशी होती की, तो मोटरसायकलवर लोखंडी रॉड घेऊन बंद घर शोधत असे. मुख्य दार आणि कपाट तोडून १० मिनिटांत चोरी करून पसार होत असे. त्याच्या यूट्यूब चॅनेलच्या माध्यमातून तो आपल्या गुन्हेगारी कारवायांपासून पोलिसांचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न करत होता, असे पोलिसांचे म्हणणे आहे. म्हणजे काय तर 'लोकां सांगे ब्रह्मज्ञान, स्वतः मात्र कोरडे पाषाण' किंवा हिंदीत 'चोर मचाएं शोर' असेही म्हणता येईल. आता आपण जरा राजकारणाकडे वळुया. राहुल गांधी यांनी अलिकडेच निवडणुकीत 'मत चोरी' झाल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यासाठी त्यांनी आंदोलनही केले. राहुल गांधी यांच्यावर आणि काँग्रेस पक्षावर भ्रष्टाचाराचे अनेक आरोप झाले आहेत. यापैकी सर्वात चर्चित आहे नॅशनल हेराल्ड प्रकरण. या प्रकरणात राहुल गांधी आणि त्यांच्या मातोश्री सोनिया गांधी यांच्यावर नॅशनल हेराल्ड या वृत्तपत्राशी संबंधित कंपनीच्या मालमत्तेचा गैरवापर केल्याचा आरोप आहे. २०१२ मध्ये सुब्रह्मण्यम स्वामी यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, काँग्रेस पक्षाने नॅशनल हेराल्डशी संबंधित असोसिएटेड जर्नल्स लिमिटेडला मोठ्या प्रमाणात कर्ज दिले; जे नंतर यंग इंडियन प्रायव्हेट लिमिटेड नावाच्या कंपनीद्वारे हस्तांतरित करण्यात आले. या कंपनीत राहुल आणि सोनिया गांधी यांचा मोठा हिस्सा आहे.

या प्रकरणात कथित आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉन्ड्रिंगचे आरोप असून प्रवर्तन संचालनालय (ईडी) याची चौकशी करत आहे. राहुल गांधी यांना या प्रकरणात अनेकदा समन्स बजावण्यात आले आहेत; तरीही ते स्वतःला निवडणूक प्रक्रियेचे रक्षक म्हणून पुढे करतात. राहुल गांधी यांच्यावरील आणखी एक गंभीर प्रकरण म्हणजे सात्यकी सावरकर यांनी दाखल केलेली बदनामीची केस.

काँग्रेस पक्षाचा भ्रष्टाचाराचा इतिहास नवीन नाही. १९७५ मध्ये इंदिरा गांधी यांना अलाहाबाद उच्च न्यायालयाने १९७१ च्या निवडणुकीत गैरप्रकार केल्याबद्दल दोषी ठरवले होते. यामुळे त्यांना सहा वर्षांसाठी राजकारणातून बंदी घालण्यात आली होती, ज्याला प्रत्युत्तर म्हणून त्यांनी देशात आणिबाणी लागू केली, असे म्हटले जाते. हा भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील सर्वात काळा कालखंड मानला जातो. म्हणजे 'मत चोरी' हा आरोप राहुल गांधी इतरांवर लावत असले, तरी अशा गोष्टी त्यांच्यासाठी नवीन नाहीत. याशिवाय, बोफोर्स घोटाळा हा राजीव गांधी यांच्या काळातील एक मोठा भ्रष्टाचाराचा मुद्दा होता, ज्यामध्ये स्वीडिश कंपनी बोफोर्सकडून तोफा खरेदीच्या व्यवहारात लाचखोरीचे आरोप झाले. या प्रकरणाने काँग्रेस पक्षाची प्रतिमा डागाळली आणि १९८९ च्या निवडणुकीत त्यांना सत्तेतून बाहेर पडावे लागले.

काँग्रेसच्या इतर नेत्यांवरही भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप झाले आहेत. उदाहरणार्थ, २जी स्पेक्ट्रम घोटाळा, कोळसा घोटाळा आणि कॉमनवेल्थ गेम्स घोटाळ्यामध्ये काँग्रेसचे अनेक नेते अडकले होते, ज्यामुळे काहींना तुरुंगवासही भोगावा लागला. अशा पृष्ठभूमीवर राहुल गांधी यांचे 'मत चोरी'चे आरोप हास्यास्पद वाटतात. तुम्हाला काय वाटते? बरं, आता वरील मनोजकुमार सिंह या चोराचं, लोकांना चोरी करू नका, हे सांगणं आणि 'मत चोरी' या दोन्ही गोष्टींची तुम्ही सांगड घालत असाल तर तर ही तुमची जबाबदारी!

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# पोलिसांचे कार्यक्षेत्र रुंदावतेय

'पोलिसांचा पूर्वी जनतेमध्ये दरारा होता; आजही आहे. कोणाच्या घरी जर पोलिस आले तर त्याची वेटाळातच नव्हे, तर गावभर चर्चा व्हायची. पोलिस गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठीच एखाद्याच्या घरी जातात, असा त्याकाळी समज होता. एखाद्या चौकात वाहतूक नियंत्रक पोलिस कर्तव्यावर असेल तर त्या चौकापासून २०० ते ३०० मीटर दूर सायकलवरून डबलसिट जाणाऱ्यांपैकी दुसऱ्या व्यक्ती उतरून पायी तो चौक पार करून पुढे १००-२०० मीटर गेल्यावर सायकलवर डबलसिट बसत असे. एवढा दरारा पोलिसांचा होता. आमचे घर पोलिस ठाण्याला लागूनच असल्याने गुन्हेगारांची धुलाई आम्ही नित्य पाहायचो. चोर, दरोडेखोर, खिसेकापू, दारूची अवैध विक्री करणारे, जुगार खेळणारे व खेळविणारे यांना पकडणे, शहरात शांतता व सुव्यवस्था कायम ठेवणे, सण-उत्सव काळात निघणाऱ्या मिरवणुका, जाहीरसभा, यात्रा, महोत्सवादरम्यान चोख बंदोबस्त ठेवून वरील सर्व आयोजन शांततेत पार पाडण्याची जबाबदारी पोलिसांची आहे, हे आपल्याला माहीत आहे. मात्र, यात आता बदल होऊन पोलिसांच्या कार्यकक्षा रुंदावत आहेत. पूर्वी पोलिस गुन्हेगार किंवा दोषी व्यक्तीला शोधून त्याला कठोर शिक्षा कशी होईल, याकडे लक्ष देत होते. म्हणजे झालेल्या आजारावर उपचार करीत होते. तर, आता ज्याप्रमाणे एखादा आजार होऊ नये म्हणून आपण लसीकरण करवून घेतो, त्याप्रमाणे पोलिस गुन्हे आणि गुन्हेगार निर्माण होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना करताना दिसत आहेत. त्याचे उदाहरणच पाहायचे म्हटल्यास आमच्या बुलढाणा जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नीलेश तांबे यांनी 'मिशन परिवर्तन' या उपक्रमांतर्गत संपूर्ण जिल्ह्यात विविध सामाजिक उपक्रम हाती घेतले आहेत. त्यात व्यसनमुक्ती, रक्तदान शिबिर, वृक्षारोपण इत्यादी कार्यक्रमांचा समावेश आहे. आजची तरुण पिढी धूम्रपान, तंबाखू, गुटखा सेवनाकडे आकृष्ट झाल्याचे दिसून येते. तर, मोठ्या शहरांमध्ये ड्रग्स, चरस, अफिम, गांजा, ब्राऊन शुगर इत्यादी अमली पदार्थाच्या आहारी युवक गेल्याचे दिसून येते. ड्रग्जचे व्यसन एवढे भयंकर आहे की, ते एकदा जडले की त्यातून बाहेर पडणे कठीण होते. ड्रग्जचा अंमल संपला की ठरावीक वेळेनंतर तो ड्रगिस्ट अस्वस्थ होतो. त्याचे हातपाय थरथर कापू लागतात. त्याला काहीच सुचत नाही. त्याला कोणत्याही परिस्थितीत ड्रग्ज हवे असते. त्यासाठी तो कोणतीही किंमत मोजायला तयार असतो. त्यातूनच मग गुन्हेगारी आणि गुन्हेगार जन्माला येतो. असे गुन्हेगार निर्माण होऊ नये म्हणून जिल्हा पोलिस अधीक्षकांनी व्यसनमुक्ती जनजागृती अभियानाच्या माध्यमातून व्यसनांना आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायांचे पाऊल उचलले आहे. त्याचप्रमाणे रक्तदान शिबिरांचे आयोजन करून शासकीय रुग्णालयांची रक्तांची मागणी पूर्ण केली जात आहे. विज्ञानाच्या सहाय्याने मानवाने मोठी प्रगती केली असली, तरी पाणी आणि रक्त या दोन गोष्टी अजूनही मानवाला कृत्रिमरीत्या तयार करता आलेल्या नाहीत. बुलढाणा जिल्हा पोलिसांनी रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना आवाहन करून शासकीय रुग्णालयातील रक्तपेढींमधील रक्तांची मागणी पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. वृक्षारोपणाच्या माध्यमातून पर्यावरणाचा ढासळलेला समतोल राखण्याचा प्रयत्न पोलिस करीत आहेत. त्याचबरोबर कौटुंबिक हिंसाचारांच्या प्रकरणात पोलिस समुपदेशन केंद्रांच्या माध्यमातून अनेक मोडलेले संसार पुन्हा सुरळीत करण्याचे काम पोलिस करीत आहेत. यापूर्वी एखाद्या विवाहितेने पोलिसांकडे तक्रार केल्यास तिच्या सासरच्या मंडळीविरुद्ध शारीरिक छळवणूक, हुंडा प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हे दाखल करून त्यांना कोठडीत डांबण्याचे काम करीत होते. पण, आता केवळ गुन्हेच दाखल करीत नाहीत तर तक्रारकर्ती, तिचा पती, तिच्या सासरच्या मंडळीला समुपदेशन केंद्रात बोलावून त्यांचे समुपदेशन केले जाते. दोन्हीकडील लोकांना समजावून सांगितले जाते. समजूत काढल्यावर त्यांचा संसार पुन्हा सुरळीत करून देण्याचे प्रयत्न पोलिस करीत आहेत. तसेच, गुन्हे आणि गुन्हेगारांचे बदललेले स्वरूप हे पोलिसांसमोरील नवे आव्हान आहे. एखाद्या घरात चोरी झाली तर, त्यातील आरोपींचा शोध लागू शकतो. 'सायबर क्राईम' या नावाचा नवीन गुन्हेगारी प्रकार आता सुरू झाला आहे. शेकडो कि.मी. लांब बसून इंटरनेटच्या साहाय्याने एखाद्याच्या बँक खात्यातील पैसे परस्पर काढून दुसऱ्याच्या खात्यात वळते केले जातात. यातील गुन्हेगार शोधणे ही जटिल समस्या पोलिसांसमोर उभी ठाकली आहे. त्याचे आव्हानही पोलिसांनी स्वीकारले असून सायबर गुन्ह्यांची उकल पोलिस करीत आहेत. 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' असे पोलिसांचे ब्रीद आहे. पूर्वी खलनिग्रहण होत होते. पण, आता खलनिग्रहणायसोबतच सद्रक्षणाय व सदनिर्माणाचे कार्यदेखील पोलिस करीत आहेत. त्यावरून पोलिसांचे कार्यक्षेत्र रुंदावत असल्याचे दिसून येते.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# अखेर राज्यानेच दिले आरक्षण

मराठा आरक्षणाचा लढा हा गेल्या दोन-चार दिवसातला नाही; तो १९८१ पासून चालला आहे. मात्र, गेल्या दोन वर्षांपासून मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाचे आंदोलन चालविले आहे. २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांनी मराठा समाजाला आरक्षण दिले होते. कालांतराने नव्हे, दुर्दैवाने २०१९ ला तोंडाशी आलेला घास हिरावून घेत दगाबाजीने, गद्दारीने उद्धव ठाकरेंनी राजकीय दुश्मनांशी हातमिळवणी करून, स्वतः मुख्यमंत्री होण्याचे कटकारस्थान रचले. या कारस्थानाने आलेल्या कारस्थानी सरकारच्या काळात सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाविषयी राज्य सरकारच्या वतीने पाहिजे तसे प्रयत्न केले गेले नाहीत. त्यामुळे फडणवीसांनी दिलेले आरक्षण उद्धव ठाकरेंच्या सरकारने घालवले. घालविल्यानंतर मविआ सरकारने आरक्षण देणे राज्य सरकारच्या हाती नाही ते केंद्र सरकारच्या हाती असल्याची बोंब उठवली. आरक्षण केंद्र सरकारच देऊ शकतो, आमच्या हाती काही नाही, असे म्हणत मराठा आरक्षणाबाबत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, मविआचे सर्वेसर्वा शरद पवार आणि मविआ सरकारने हात वर केले होते. मात्र, त्यानंतर मुख्यमंत्री झालेल्या एकनाथ शिंदे यांच्या मदतीने फडणवीसांनी पुन्हा मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिले. तर, उर्वरित मागण्यांनादेखील न्याय राज्य सरकारच्या पातळीवरच त्यांनी दिला. केंद्र सरकारकडे बोट दाखवून आपली जबाबदारी झटकणाऱ्या उद्धव ठाकरे आणि शरद पवारांना दाखवून दिले की, हा विषय केंद्राच्या नव्हे, तर राज्य पातळीवरचा होता आणि तुम्ही तुमच्या सरकारच्या काळात हाताळू शकले नाही; नव्हे तर शरद पवारांनी आपल्या अख्ख्या राजकीय कारकीर्दीत मराठा समाजाला न्याय दिला नाही. मात्र, तोच न्याय मराठा समाजाच्या नेहमी टीकेचा धनी राहिलेल्या व्यक्तीने दिला, हे विशेष.

ओबीसी समाजाच्या बाबतीतदेखील मविआ सरकारची आणि त्यांच्या नेत्यांची भूमिका अशीच उदासीन राहिली आहे. न्यायालयाने 'ट्रिपल टेस्ट' करण्याचे आणि इम्पिरियल डेटा आणण्याचे सुचविल्यानंतर इम्पिरियल डेटा देणे राज्य सरकारचं काम नाही; ते केंद्र सरकारचं आहे, असे सांगून ओबीसी आरक्षणाचा विषयदेखील असाच चिघळवला. तेदेखील घालवले. मविआने ओबीसी आरक्षणात डबल-ट्रिपल ढोलकी वाजविण्याचे काम केले.




मराठा असो किंवा ओबीसी दोन्ही समाजासाठी कुठलीही ठोस भूमिका यांनी घेतली नाही आणि घेणार नाही. मुंबईत एवढे मराठे एकवटले, मुंबई कधी थांबणार नाहीची घोषणा नेहमी ऐकायला मिळते. पण यावेळी मुंबई थांबलेली आणि हतबल झालेली दिसली. मुंबई ही ठाकरेंची आहेची वल्गना करणारे यावेळी कुठे होते कळलेच नाही. सर्वसामान्य मुंबईकरांचे हाल होत होते. कामाला जाणं बंद, लोकल प्रवास कठीण, खाजगी उद्योग धंदे बंद, सरकारी नोकर, चाकरमान्यांचे हाल आणि ऐन गणेशोत्सवात बाजारपेठा बंद, एक, दीड, तीन, पाच दिवसांच्या गणपती विसर्जनाची गैरसोय, हे सगळं मुंबईकर सोसत होते. पण मुंबईच्या कैवाऱ्यांनी मोर्चेकऱ्यांची बाजू घेताना, मुंबईकरांना त्रास होईल असे वागू नका. रस्त्यावर नाचू नका, दळणवळणाला बाधा आणू नका, असे साधे आवाहन मोर्चेकऱ्यांना केले नाही. एरवी तर, लगेच मुंबई आणि मुंबईकर म्हणजे यांचीच मक्तेदारी असल्यागत अंगावर धावून येणाऱ्या या तथाकथित मुंबईवाद्यांची बोबडी यावेळी का वळली होती, असा प्रश्न आता सामान्य मुंबईकर विचारत आहेत. म्हणजे आरक्षणच नव्हे, तर मुंबईकरांच्या हिताच्या विषयातदेखील हे यांचा स्वार्थ बघतात, हे या आंदोलनाच्या माध्यमातून सिद्ध झाले. मुंबई मराठी माणसांची नाही का? मग मराठी माणूस आंदोलन कुठं करेल, असा प्रश्न विचारणाऱ्यांना आता लवकरच मुंबईकर उत्तर देतील तेव्हा मिळतील या प्रश्नांची उत्तरं, सोयीच्या भूमिका घेणाऱ्या डबल ढोलकी वादकांना.

### मुंबईकरांची बाजू घेणाऱ्या देवरांवरच उडाले

खासदार असले, तरी सामान्य व्यक्तीप्रमाणे मिलिंद देवरांसारख्या व्यक्तीने राजकारण बाजूला सारत मुंबईकरांचे झालेले हाल बघता यावर काही निर्बंध असले पाहिजे, अशी ठोस भूमिका मांडली. तर, त्यांना लक्ष्य करण्यासाठी हे लबाड लांडगे चवताळून उठले. त्यांना धनिकांचे प्रतिनिधी म्हणून हिणवू लागले. मुळात देवरा यांनी मांडलेला मुद्दा या संधिसाधू लोकांसारखा अदानी-अंबानीचा नव्हता, तर तो हातावर आणून पानावर खाणाऱ्या सर्वसामान्य, गोरगरीब मुंबईकरांचा होता. आणि हो, यात उच्च न्यायालयाचे आदेशदेखील आहेत. आझाद मैदानावर आंदोलन करण्याची पाच हजारांची मर्यादा न्यायालयाने घालून दिली आहे. रात्री आंदोलन करता येणार नसल्याचं म्हटलं आहे. रस्त्यावर आंदोलन करण्याचा तर प्रयत्नच उद्भवत नाही. अशा परिस्थितीत एखाद्याने न्यायालयात याचिका दाखल केली तर तो घटनेला आणि न्यायालयाचा सन्मान करीत असल्याचे म्हणण्याऐवजी त्यालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करणं आणि जे कायदा, न्यायालयाचे निर्देश पायदळी तुडवत आहेत, त्यांच्या चुकीच्या कृत्याला समर्थन देण्याच्या प्रकाराला काय म्हणावे? तसेही संविधान-संविधान बचाव म्हणून छाती बडवणारी ही जमात नेहमी संवैधानिक संस्थांवर शरसंधान साधताना दिसते. यांना हवे तसे वागले तर ठीक अन्यथा सर्व आरोपीच्या पिंजऱ्यात असतात. यांनी याआधी अनेकदा आरोपीच्या पिंजऱ्यात न्यायालयाला उभं केलं असल्याचा इतिहास आहे. न्यायालयाचे निर्देश पाळण्याचा, घटनेनुरूप वागण्याचा यांचा दुरान्वये संबंध नाही. त्यामुळे यांच्याकडून न्यायिक वर्तणुकीची अपेक्षा करणेच मूर्खपणाचे आहे.

### टीकेचे धनी फडणवीसच!

बरं, एवढं करूनदेखील देणाऱ्याच्या वाटेला काय आलं, तर मराठा आंदोलन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिलेल्या शब्दानुसार महिनाभरात सातारा गॅझेट लागू करावे, अन्यथा येत्या निवडणुकांत सरकारचा धुरळा उडवू आणि राज्यभरात एकाही नेत्याला रस्त्यावर फिरू देणार नसल्याची धमकी... म्हणजे ज्यांची दिशाभूल केली, न्याय दिला नाही, दिलेलं आरक्षणं घालवलं, आरक्षण देणं तर दूरच; साधं आम्ही समाधान करू, आरक्षण देण्याचे प्रयत्न करू देखील न म्हणणारे नामानिराळे राहिलेत, भले ठरलेत; आणि ज्यांनी आरक्षण दिले, देण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, त्यांचे धन्यवाद मानायचे तर सोडा; वाटेला काय तर शिव्याशाप...

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### प्रतिष्ठापना आणि विसर्जन

नुकत्याच श्री महालक्ष्मी सण आटोपून निरोप घेऊन गेलेल्या. महालक्ष्म्यांना निरोप असो की गणेश विसर्जन अशा वेळी लहान-मोठ्या साऱ्यांच्याच मनात असे भाव दाटून येतात. मनाच्या तारा जुळल्या की, मनातलं न बोलताच आपल्या प्रिय व्यक्तीला आपल्या मनातील भाव आपोआपच कळतात. जरी त्या दूर अंतरावर असतील तरीही अतींद्रिय शक्तीच्या आधारे ती जाणीव होते. असा अनुभवी अनेकांना आलेला असेलच. आजकाल या मनाच्या तारा जुळो न जुळो, पण मोबाईल आणि विशेषतः सोशल नेटवर्किंग साईट्सच्या तारा आपल्या मनाशी इतक्या जुळल्या आहेत की, या आंतरजालाच्या (नव्हे मायाजालाच्या) अतींद्रिय शक्तीचा प्रत्यय पदोपदी येत असतो. फेसबुक उघडले अन् समोरच एक पोस्ट दिसली... सावरकरांचे वाक्य म्हणून शेअर केलेली ती पोस्ट होती... 'खरं तर तो कुठेच जात नाही; इथेच असतो. प्रतिष्ठापना, विसर्जन हे आपल्या मनाचे खेळ. अनादी, अनंत आणि असीम अशा काळावर अधिराज्य गाजवणाऱ्यांना आपण काय बसवणार आणि विसर्जित करणार? विसर्जन माणसांचं असतं, तत्त्वं चिरंतन असतात..!' या चराचराला व्यापणाऱ्या ज्या निर्गुण निराकार तत्त्वांचं आपण विविध देवी-देवतांच्या रुपात पूजन करतो त्या मूळ तत्त्वांचं विसर्जन होतच नसतं... ही चिरंतन आहेत. बदलत्या काळानुसार प्रत्येकवेळी वेगवेगळी रूपं पालटून ही तत्त्वं आपल्या अस्तित्वाची जाणीव करून असतात. मग दरवर्षीचं हे प्राणप्रतिष्ठापना आणि विसर्जन कशासाठी? एका कवीने महालक्ष्मी निरोप घेतेवेळी होणारी मनाची अवस्था अगदी नेमक्या शब्दात व्यक्त केली आहे. तो म्हणतो,

**गौराईचे वास्तव्य, चैतन्याची झळाळी...**
**दिस हा शुभंकर, सकाळ सोनसळी...**
**आली निरोपाची वेळ, जिवा हुरहूर दाटे...**
**ये ग पुन्हा तू माउली, माझ्या घरकुला वाटे..!!**

**प्रसाद दत्तात्रेय पोफळी**/९८२२५६९६४८

### ऋषितुल्य भाऊ...

ऋषिपंचमीला आपण संत श्री गजानन महाराजांची पुण्यतिथी साजरी केली आणि याच दिवशी अशाच एका ऋषितुल्य महानुभावाची शतकोत्तर रोप्य (१२५ वी) जयंतीसुद्धा होती; ती म्हणजे प.पू. भाऊंची. भाऊ म्हणजे प.पू प्रल्हाद महाराजांचे कनिष्ठ बंधू. साखरखेर्ड्याचे वे.शा.सं. पुरुषोत्तम मुकुंद काळे आपल्या मामांनाच दत्तक दिल्यामुळे ते पुरुषोत्तम त्र्यंबक किंबहुने झाले. प.पू. प्रल्हाद महाराज व आमचे भाऊ म्हणजे अगदी श्रीराम-लक्ष्मणाचीच जोडी होती. जगप्रसिद्ध मेहकरच्या श्री शारंगधराची पुजारी म्हणून नव्हे तर खऱ्या अर्थाने अर्चक म्हणून त्यांनी सुमारे पाच दशक सेवा केली. भाऊंनी मंदिरात संपूर्ण श्रावण महिन्यात श्री विष्णुसहस्रनाम पठनाचा सुरू केलेला उपक्रम आजही सुरू आहे तसेच जन्माष्टमीला श्रीमद्भगवद्गीतेच्या ११ व्या अध्यायाचे पठन त्यांनी सुरू केले, ते सुद्धा सुरू आहे. अखंड परमेश्वराच्या चिंतनात राहणे हा एकच ध्यास त्यांना होता. मार्गशीर्षातील उत्सवात दहा दिवस डोळ्याचे पारणे फिटणारा वाराप्रमाणे पोषाख करावा तो भाऊंनीच. भाऊंचे प्रस्थान त्रैयीचे वैदिक शिक्षण इंदूरला झाले होते. आम्हा बालगोपाळांवर त्यांनी केलेले संस्कार अजूनही आम्ही विसरलेलो नाही. आमचे भाऊ प्रखर राष्ट्रभक्त होते. ते उत्कृष्ट कवी होते. त्यांनी श्री बालाजीवर अनेक पदे, आरत्या, अष्टके केल्या आहेत. सात्त्विक आचरणाने समाजात त्यांच्याविषयी आदरयुक्त भीती होती. सामाजिक कार्यात ते अग्रेसर असत. त्यांचं घर म्हणजे जुन्या काळातील गुरुकुलच! प.पू. महाराजांचे ते उजवे हात होते. कोणतेही मोठे कार्य महाराज भाऊंवर सोपवित. आश्विन महिना हा या काळे कुटुंबाला घात महिना ठरला. याच महिन्यात महाराजांचे वडील, भाऊ आणि भाऊंच्या सौभाग्यवती श्रीराम चरणी लीन झाल्यात. अशा या १२५ वर्षांपूर्वी जन्मलेल्या ऋषींना विनम्र अभिवादन.

**अशोक पत्की**/९८८१३०१३३१

### चारचाकी वाहनांचा अतिरेक

भारतात शैक्षणिक कर्जावरील व्याज दर हे चारचाकी गाडीच्या व्याज दरापेक्षा अधिक असून यातून राज्यकर्ते-सरकारमधील लोकांची बौद्धिक दिवाळखोरी प्रदर्शित होते. सगळीकडे चारचाकी गाड्यांचा सुळसुळाट असून ९० टक्के कार मालकांकडे पार्किंगची जागा नाही. चारचाकीही गरज नसून चैनीची वस्तू आहे. पण सरकारला ही बाब कळू नये? शिवाय आता जीएसटी २८ वरून १८ टक्के केल्यामुळे या मूर्खपणात अजून भर घातली आहे. यामुळे चारचाकींची संख्या वाढून वाहतूक कोंडी अजून भीषण होणार आहे, हे नक्की.

**अनिल वाटवे** /९०११२९८०९९

### प्रथा आणि परंपरा

भारतीयांची स्वतःची एक जीवन पद्धती आहे. जीवन तर सगळेच जगताच, पण त्याला धर्म आणि कर्तव्याची जोड हवी. धर्म आम्हाला जगण्यासाठी प्रेरित करतो. आहार पोषण देतो. धर्म आणि आहार यांचा स्वर्ण मध्य साधून आम्ही जगण्याचे बीज मनमनांत पेरत असतो. अंगणात तुळस आणि शिखरावर कळस हीच आपल्या संस्कृतीची ओळख. कपाळी कुंकू आणि डोक्यावर पदर ही सौभाग्याची ओळख. माणसात जपतो माणुसकी आणि नात्यात जपतो नाती. हीच आमच्या भारताची ओळख! आपल्या पूर्वजांनी सण आणि उत्सव यांची धार्मिक कार्याशी सांगड घालून भारतीय संस्कृतीला अनमोल अशी भेट प्रदान केली आहे. त्यामध्ये धार्मिक कार्याला विज्ञानाची सांगडसुद्धा पाहायला मिळते. असा हा भारत महान संस्कृती असलेला देश आहे.

**प्रा. वर्षा विलास कावरे** / ९०२१६७३१७८

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच कुठलाही लेख पाठवायचा असल्यास ९५५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# आश्लेषा, मघाच्या पावसाने बळीराजा बेजार!

## ■ पूर्वाच्या पावसाने घेतली विश्रांती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

आश्लेषा, मघा नक्षत्राच्या पावसाने गेल्या १५ ते २० दिवसांत अक्षरशः धुमाकूळ घातला आणि सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टी झाल्याने जिल्ह्यातील ९ तालुक्यातील अनेक गावात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. दरम्यान, आता पूर्वा नक्षत्रातील पावसाने सुरुवातीला थोडी उसंद दिल्याने बळीराजाला शेतीची कामे करता येवू लागली आहेत.

सध्या अनेक शेतकऱ्यांची उडीद, सोयाबीन पिके पाण्यात आहेत. आता पावसाने उघडीप दिल्याने उडीद पिके काढून



घेताना शेतकरीवर्ग दिसून येत आहे. अनेक शेतकऱ्यांची ही पिके पाण्यात गेल्याने जागेवर कुजून गेली आहेत. यामुळे जिल्हा प्रशासनाकडून पंचनामेही करण्यात आले आहेत. या केलेल्या पंचनाम्यामध्ये जिल्ह्यातील ५९ हजार ११० शेतकऱ्यांचे ५६ हजार ९६१ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे. तर यासाठी ५९ कोटी ७९ लाख १६ हजार १२५ इतका अपेक्षित निधी लागणार असल्याचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे. ही मदत डिबीटीमार्फत थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग होणार आहे.

आता पूर्वा नक्षत्राच्या पावसाने उघडीप दिल्याने जी पिके चांगली राहिली आहेत; ती काढण्यासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. अजून पुन्हा हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने सोयाबीन पिकाला फटका बसतो की काय? अशी भीती शेतकऱ्यांना वाटत आहे.

### पावसामुळे उजनीसह सर्व मध्यम प्रकल्प ओव्हरफ्लो

यंदा मे महिन्यातच २३० मिलीमीटर पाऊस झाल्याने उजनीसह इतर मध्यम आणि लघु प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाणी आले होते. यानंतर जूनपासून आजतागायत ३२५ मिलीमीटरपेक्षा जास्त पाऊस झाल्याने उजनी धरण, जिल्ह्यातील मध्यम आणि लघु प्रकल्प ओव्हरप्लो झाले आहेत. यामुळे आगामी वर्षात जनावरांचा चारा-पाणी, शेतीच्या सिंचनासाठीचा प्रश्नही मिटला आहे. उजनी धरण ओव्हरफ्लो झाल्याने सोलापूर शहरासह जिल्ह्यातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मिटला आहे. विहिरी, तलाव ओसंडून वाहू लागल्याने आता उन्हाळी पिकेही चांगल्या प्रमाणात साधणार असल्याची माहिती काही जाणकार शेतकऱ्यांनी दिली.



## प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर यांची करुणा आणि न्यायाची शिकवण काळाची गरज

### ■ फैय्याज शेख यांचे प्रतिपादन

**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

इस्लाम धर्माचे आदर्श प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर (स्व.) हे आहेत. त्यांनी दिलेली शिकवण ही समाजासाठी कायमस्वरूपी आदर्श घेण्याजोगी आहे. त्यांनी इस्लाम धर्मामध्ये मुलींचे शिक्षण हे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. करुणा आणि न्याय यांचे शिकवण त्यांनी दिली आहे. ती आजच्या काळाची गरज आहे, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा वृत्तपत्र लेखक मंचाचे अध्यक्ष फैय्याज शेख यांनी केले.

महानगरपालिका मुलींची उर्दू शाळा कॅम्प, लष्कर येथे आयोजित ईद ए मिलादुन्नबीनिमित्त चित्रकला वही वाटप कार्यक्रमाच्या वेळी ते बोलत होते. यावेळी पाचवी, सहावी व सातवीच्या सर्व मुलांना चित्रकला वह्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी शहाजहा नदाफ व मोहम्मदी कुरेशी या मुलींनी आपले विचार व्यक्त केले. प्रास्ताविक यास्मिन शेख यांनी केले.

सिद्दिका शेख यांनी सूत्रसंचालन केले. नाजनीन कोरबु यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षिका उम्मेसलमा पठाण, शहनाज बेगम सय्यद, वाजेदा शेख, हनिफा गुंता यांनी परिश्रम घेतले.

## महत्वाचे...



### सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनमध्ये शिक्षक दिन साजरा

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर -**

समाज सेवा मंडळ संचलित श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन सोलापूर महाविद्यालयात शिक्षक दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रम पार पाडण्यात आला.



### डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या शिक्षक दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीजन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, भगवान मुंडे, सुरेश कासार, रजनी राऊळ, अबरार डोंगरी, तुकाराम भोसले, अमोल गायकवाड, दत्ता सोनवणे, भालचंद्र साखरे, नाशिर खान आदी उपस्थित होते.



### वालचंद महाविद्यालयात पर्युषण महापर्व व्याख्यानमाला व वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, सोलापूर येथे पर्युषण महापर्वानिमित्त व्याख्यानमाला व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दि. २८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत सहा सत्रांमध्ये व्याख्यानमाला पार पडली. उत्तम क्षमा, उत्तम मार्दव, उत्तम आर्जव, उत्तम शौच, उत्तम सत्य, उत्तम संयम, उत्तम तप, उत्तम त्याग, उत्तम आकिंचन्य व उत्तम ब्रह्मचर्य या दशधर्म विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. डॉ. महावीर शास्त्री, नेमचंद आग्रे, प्रा. ए. जी. देवसाळे, पं. विजय काळेगोरे, डॉ. महावीर साबळे व अरुण धुमाळ या मान्यवर वक्त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन प्रमाणपत्रे व आकर्षक बक्षिसे प्रदान करण्यात आली. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून प्रा. व्ही. व्ही. गांधी, प्रा. सी. ए. तुपकर, डॉ. एम. एम. शास्त्री, डॉ. मिनल पांढरे, प्रा. एन. जी. भिडे व प्रा. एम. पी. जैन यांनी कार्य केले. व्याख्यानमालेचे आयोजन प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे व पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन प्रा. रवींद्र काळे, प्रा. चेतन तुपकर व प्रा. संदेश बोराळकर यांनी केले.

### पगार मागितल्याने कामगाराला मारहाण

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

काम केलेल्याचा पगार मागितल्याने कामगाराला लोखंडी रॉडने मारहाण केली. हा प्रकार गुरुवारी रात्री अकराच्या सुमारास होटगी



येथील सिमेंट कंपनीच्या गेटवर घडला. हुसेन गुलाब शेख (वय ४४, रा. नई जिंदगी, सोलापूर) असे मारहाण झालेल्या कामगाराचे नाव आहे. हुसेन याने गुरुवारी दिवसभर काम केल्यानंतर रात्री अकराच्या सुमारास पगार मागितला. त्यावर चिडलेल्या दयानंद बंडगर व पिंट्या शिंदे या दोघांनी लोखंडी रॉडने मारहाण केली. यात डाव्या हाताला व पायाला मार लागल्याने शुक्रवारी सकाळी अकराच्या सुमारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## रेशीम विभाग आपल्या दारी... शेतकऱ्यांना रेशीम उद्योगासाठी शासन देणार अर्थसाहाय्य

### ■ तुती लागवडीसाठी शासनाकडून पुन्हा विशेष मोहीम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

जिल्हा रेशीम कार्यालय, सोलापूर यांच्यावतीने रेशीम विभाग आपल्या दारी ही विशेष मोहीम दि. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ दरम्यान राबविण्यात येत आहे. दोन वर्षांपूर्वी रेशीम योजनेसाठी नोंदणी केलेल्या, परंतु तुती लागवड न करणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरी जाऊन रेशीम उद्योगाची माहिती देणे, उद्योग सुरू करण्याचे आवाहन करणे आणि तुती लागवड न करण्यामागील कारणांचा अभिप्राय घेणे, हा या मोहिमेचा उद्देश आहे, अशी माहिती जिल्हा रेशीम अधिकारी विनीत पवार यांनी दिली आहे.

रेशीम विकास योजना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतून राबविण्यात येत असून, अल्पभूधारक शेतकऱ्यांना सहभागी करून घेतले जाते. एका गावातील किमान ५ शेतकऱ्यांनी ग्रामसभेच्या संमतीने ग्राम रोजगार सेवकांच्या मार्गदर्शनाखाली अर्ज करावा लागतो.

#### बहुभूधारक शेतकऱ्यांसाठी सिल्क समग्र २ योजना

- तुती लागवड: ४५,०००
- सिंचन व्यवस्था: ४५,०००
- संगोपनगृह बांधकाम: २,४३,७५०
- संगोपन साहित्य: ३७,५००
- निर्जंतुकीकरण औषधे: ३,७५०

काम पूर्ण झाल्यानंतर अनुदान मंजूर

#### मनरेगा अंतर्गत लाभ

- तुती लागवड व जोपासना: २,१२,७८४ (तीन वर्षांत मजुरी)
- किटक संगोपनगृह बांधकाम: ६६,४५६ (मजुरी)
- साहित्य खर्च: १,५३,०००
- एकूण लाभ: ४,३२,२४० (तीन वर्षांत)

#### तुती लागवडीचे राज्यस्तरीय उद्दिष्ट:

मुख्यमंत्री यांनी पावसाळ्यात १० कोटी तुती वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट जाहीर केले असून, रेशीम संचालनालयाला ४ कोटींचा लक्षांक देण्यात आला आहे. त्यापैकी २४ लाख वृक्ष (४०० एकर) लागवडीचे उद्दिष्ट सोलापूर जिल्ह्यासाठी निश्चित करण्यात आले आहे. शेतकरी बांधवांनी पर्यावरणपूरक आणि शेतीपूरक रेशीम उद्योग सुरू करून रेशीम कोष निर्मितीच्या माध्यमातून उत्पन्नवाढ साधावी, असे आवाहन जिल्हा रेशीम कार्यालय, रेशीम पार्क, गट नं. ४२३/२, मौजे हिरज, ता. उत्तर सोलापूर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

## मंगळवेढेकर कॉलेजच्या सेमिनारमध्ये पाच महाविद्यालयाचा सहभाग



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

पी.के. मंगळवेढेकर व्यवस्थापन विकास व संशोधन संस्था येथे अमेझॉन वेब सर्व्हिसेस आणि मायक्रोसॉफ्ट या विषयावर एक दिवसीय सेमिनार यशस्वीपणे पार पडला. या सेमिनारला शहरातील पाच महाविद्यालयांतील १५० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

या सेमिनारला अमोल निखते (नागारो सर्व्हिसेस, पुणे) आणि शशांक देशपांडे (लेमोनेड सॉफ्टवेअर सर्विसेस) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. सुहास कुलकर्णी यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली व प्रा. संतोष कुलकर्णी यांनी स्वागत केले. या सेमिनारमध्ये तांत्रिक पैलूंवर चर्चा झाली. ज्यामध्ये क्लाउड कम्प्युटिंगचे फायदे, स्केलेबिलिटी, सुरक्षा आणि नवीन तंत्रज्ञानाच्या संधी यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना या क्षेत्रातील करिअरच्या संधी आणि कौशल्य विकासाबाबतही मार्गदर्शन मिळाले. या सेमिनारमुळे विद्यार्थ्यांना क्लाउड कम्प्युटिंगच्या गतिशील विश्वाची ओळख झाली आणि त्यांच्या तांत्रिक ज्ञानात भर पडली. संस्थेचे संचालक डॉ. ओमप्रकाश अष्टनकर यांनीही मार्गदर्शन केले.

## राष्ट्र विकास संस्थेतर्फे शिक्षकांचा सन्मान

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ बाळे, इंदिरा ज्ञानवर्धिनी सोलापूर संचलित व राष्ट्र विकास संस्था सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमानाने माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिवसानिमित्त शिक्षक दिनाचे औचित्य साधून शिक्षकांचा सन्मान सोहळा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरणाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सचिन ठोकळ, राज्याचे गुप्तवार्ता विभागाचे सहा. आयुक्त नागनाथ गायकवाड, डॉ. सोनाली घोंगडे, महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव शिल्पा ठोकळ, संचालक किशोर पाटील, इंदिरा ज्ञानवर्धिनीचे सचिव भिकाजी गाजरे, यांचे



प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व प्रतिमा पूजन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विविध शाळेतून ज्ञानदानाचे कार्य करणाऱ्या शिक्षक-शिक्षिका यांना आदर्श शिक्षक, शिक्षकेतर पुरस्कार २०२५- २६ ने सन्मानित करण्यात आले. यामध्ये. मुकुंद माळी सहशिक्षक- ज. रा. चंडक प्रशाला बाळे, रेणुका डोमनाळे सहशिक्षिका राजीव प्राथ. शाळा, बाळे, युसूफ शेख, सहशिक्षक निर्मलाताई ठोकळ प्रशाला, व रुपाली गोयल, लिपिक-इंदिरा प्रशाला नवीपेठ यांना गौरवण्यात आले. मनाचा शाल,वस्त्र,सन्मानपत्र, सन्मान चिन्ह, तुळशीचे रोप असे सन्मानाचे स्वरूप होते. यावेळी ठोकळ प्रशालेतील विद्यार्थिनी नारायणी शेडगे हिने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सचिन ठोकळ, शिल्पा ठोकळ, प्राचार्य डी डी गाजरे यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन पी.एच.चव्हाण यांनी केले. यु. एस.पवार यांनी आभार मानले.

## खाटावरून पडल्याने तरुणीची शुध्द हरपली

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

झोपेत असताना खाटावरून पडल्याने डोक्याला मार लागून तरुणी बेशुध्द झाली. हा प्रकार शुक्रवारी पहाटे पाचच्या सुमारस माळशिरस तालुक्यातील श्रीपूर येथे घडला. अनिता अशोक मिस्कर (वय २८) असे तरुणीचे नाव आहे. अनिता ही तिच्या राहत्या घरातील खाटावर गुरुवारी रात्री झोपी गेली होती. शुक्रवारी पहाटे पाचच्या सुमारास ती खाटावरून झोपेत असताना खाली पडली. यात डोक्याला आणि चेह-याच्या डाव्या बाजूला मार लागल्याने खासगी रुग्णालयात उपचार केले.

## रेशन दुकानदार संघटनेच्या तालुकाध्यक्षपदी निलकंठ माशाळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

सोलापूर जिल्हा रास्त भाव धान्य दुकानदार संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा संघटनेच्या अंतर्गत असलेल्या दक्षिण तालुका पदाधिकारी निवडी प्रसंगी प्रथमतः सभेचे अध्यक्ष म्हणून संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनिल पेंटर यांची एकमताने निवड करून सभेला सुरुवात करण्यात आली.

सभेच्या ठरावात दुकानदारांना दैनंदिन रेशन प्रणालीत येणाऱ्या अडचणी बाबतीत जिल्हाध्यक्ष सुनिल पेंटर व जिल्हा पदाधिकारी ह्यांच्या समोर मांडण्यात आल्या. मांडलेल्या अडचणीवर मार्गदर्शन करताना जिल्हा संघटना ही आज कालची नसून, स्वातंत्र्य काळापासून आहे. संबंधित तहसील कार्यालय, जिल्हा पुरवठा कार्यालय व मंत्रालय अशा



वरिष्ठ स्तरावर दुकानदाराच्या अडचणी निवेदनातून वेळोवेळी मांडत आहोत आणि राहू, तसेच संघटनेचे आजपर्यंतचे सर्वच प्रलंबित मागण्या पूर्ण झाल्याचे कळविले. भविष्यात दुकानदारांना कोणतीही अडचण आल्यास जिल्हा संघटनेशी संपर्क साधावा असे आवाहन सभेचे अध्यक्ष व जिल्हाध्यक्ष सुनिल पेंटर यांनी केले. यानंतर दक्षिण सोलापूर संघटनेच्या नूतन तालुकाध्यक्षपदी निलकंठ माशाळे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी तालुका उपाध्यक्षपदी सुरेश तेली, सचिव स्वाती बगले, खजिनदार संगम पाटील, सहसचिव विजयालक्ष्मी विधाते तर सदस्य म्हणून संतोष धायगुडे, दामू राठोड, भीमराव बनसोडे, विश्वजीत मेरू, आर. बी. बावी, चन्नवीर हिरेमठ तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून नागनाथ विधाते व शिवय्या स्वामी यांची एकमताने निवड करण्यात आली. यावेळी जिल्हा कार्यकारिणीतील पदाधिकारी उपस्थित होते.

SWAMI VIVEKANAND PRATISHTHAN'S
**SWAMI VIVEKANAND INSTITUTE OF TECHNOLOGY, SOLAPUR**
Gat No. 16/2, Khed, Barshi-Solapur Road, North-Solapur Dist.:- Solapur (Maharashtra) **Mob. No.- 9545553888**
(Approved by AICTE, New Delhi and Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur)
**Email:svitp1214@gmail.com**

**ADMISSIONS: 2025-26**
For admission to various branches of **F. Y. M.B.A.(General)** in our Institute against-
**Institute Level Seats & Vacancies if any, after CAP ROUNDS**
Interested & eligible candidates (as per Govt. norms) seeking admission shall contact to office along with necessary documents. For details of courses, seats available and schedule, please visit to our website and institute notice board, from time to time.

(Dr. U. S. Sutar)
**PRINCIPAL**
**Date: 05/09/2025**

**(Dr. B. P. Ronge)**
**PRESIDENT, SVP**
**Solapur**

**सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि.,**
शंकरनगर-अकलूज ता. माळशिरस, जि. सोलापूर
जा.नं.-प्रशासन/वार्षिक स. सभा/२४२१/२०२५-२०२६ दिनांक : ०५/०९/२०२५

**अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
**(फक्त सभासदांकरिता)**

आपले सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि.,शंकरनगर-अकलूज या संस्थेची सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाची ६५ वी मा. अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २३/०९/२०२५ रोजी दुपारी ३:०० वाजता सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना फॅक्टरी बिल्डिंगमध्ये खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी, सदर सभेस सभासदांनी उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

**- सभेपुढील विषय -**

विषय नं. १ : मागील दि.२६/०९/२०२४ रोजी भरलेल्या मा. अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.
विषय नं. २ : दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ अखेर संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा संस्थेच्या कार्याचा मा. संचालक मंडळाकडून आलेला वार्षिक अहवाल स्विकारणे व त्याची नोंद घेणे.
विषय नं. ३ : दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ अखेर वैधानिक लेखापरिक्षक एम. जी. बी. एम. अॅन्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस, बार्शी यांनी तपासलेली व मंजूर केलेली हिशोबाची पत्रके आणि बोनस इत्यादी तरतुदी असलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
विषय नं. ४ : दिनांक १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ अखेर संपणाऱ्या आर्थिक वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षक एम. जी. बी.एम, अॅन्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस, बार्शी यांचेकडून आलेला हिशोब तपासणी अहवाल (ऑडीट रिपोर्ट) बाबत तिचार विनिमय करणे.
विषय नं. ५ : सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षांकरिता मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची (बजेट) नोंद घेणे आणि सन २०२४-२०२५ वा आर्थिक वर्षामध्ये मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी/जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
विषय नं. ६ : पोटनियन नं. ४ अन्वये मा. संचालक मंडळास भांडवल उभारणेचा अधिकार देणेबाबत विचार करणे.
निषय नं. ७ : सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षामध्ये ''ई ऑक्शनद्वारे'' विक्री केलेल्या स्कॅप मालाची माहिती घेऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणे.
विषय नं. ८ : सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षासाठी टॅक्स ऑडिटर सल्लागार यांचे केलेल्या नेमणूकीस मंजूरी देणे व सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षाकरिता टॅक्स ऑडिटर व सल्लागार यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणेबाबत विचार करणे.
विषय नं. ९ : सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी शासनमान्य लेखापरिक्षकांच्या नामतालिकेमधून वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व लेखापरिक्षण शुल्क ठरविणेबाबत निर्णय घेणे.
विषय नं.१० : डिस्टीलरी विभाग प्रकल्प प्रतिदिन उत्पादन क्षमता वाढ व स्पेंटवॉश प्रक्रिया मशिनरी खरेदी करीता डीपीआर नुसार वाढीव खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
विषय नं.११ : मा. साखर आयुक्तसो. महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.०५ एप्रिल २०१७ चे परिपत्रकाअन्वये सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात मा. संचालक मंडळाच्या पुर्व मंजूरीचे यंत्र सामुग्री खरेदी व स्थापत्य बांधकाम विषयक केलेल्या भांडवली कामाची माहिती घेऊन त्यास कार्योत्तर मान्यता देणे.
विषय नं.१२ : डिस्टीलरी विभागाकडे कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सी.बी.जी.) प्लॅन्ट उभारणीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.
विषय नं.१३ : कारखाना पुरस्कृत स्थापन झालेल्या शंकरराव मोहिते-पाटील चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट व सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील शेतकरी कल्याण निधी ट्रस्ट या विश्वस्त संस्थांकडील सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात झालेल्या कामकाजाची व हिशोब पत्रकांची माहिती घेवून मंजूरी देणे व निधी कपातीबाबत विचार करणे.
मा. अध्यक्षांचे पूर्व परवानगीने योग्यरितीने सभेपुढे येणाऱ्या विषयांचा विचार करणे.
कळावे,

**आपला विश्वासू**
**मा. संचालक मंडळाचे आदेशावरून**
**सही/-**
**(आर.के. चौगुले)**
**कार्यकारी संचालक**

**- विशेष सुचना -**
१) सहकारी संस्था सभासदातर्फे मा. अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहणे, कामकाजात भाग घेणे, मतदान करणे इ. बाबत आपल्या प्रतिनिधीस अधिकार दिल्याबद्दल सोसायटी पंचकमिटीच्या ठरावाची खरी नक्कल दि. १७/०९/२०२५ पर्यंत कारखाना कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत पोहोचल्या पाहिजेत.
२) ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाच्या नकला सभासदांचे अवलोकनार्थ विभागीय कार्यालय व प्रशासकीय कार्यालयाचे नोटीस बोर्डवर लावलेले आहेत.
३) गणपूर्ती (कोरम) अभावी सभा तहकूब झालेस ती सभा कारखान्याच्या पोटनियम क्र.२३ ला अधिन राहून पार पाडली जाईल.
४) मा. सभासदांना कारखान्याच्या कामकाजासंबंधी काही माहिती हवी असल्यास ती दि. १८/०९/२०२५ पर्यंत कारखाना कार्यालयात ऑफिस वेळेमध्ये मागणी करणेत यावी.
५) कारखान्याचे थकबाकीदार सभासदांनी थकबाकी भरणा करावी.
६) कारखान्याचे सर्व सभासदांनी त्यांचेकडील संपूर्ण उपलब्ध ऊस सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याकडे गळीतासाठी द्यावा.
७) सभासदांनी त्यांचे भागाचे (शेअर्स) अपूर्ण रक्कम पूर्ण करावी.
८) सभासदांनी त्यांचे भागाचे (शेअर्स) संदर्भात वारस नोंद संस्थेकडे द्यावी.
९) सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याकडील उपलब्ध सेवांचा लाभ घ्यावा. ऊसाची नोंदणी करावी, उपलब्ध ऊस गाळपास द्यावा तसेच सभासदास लागू असलेल्या सर्व नियमांची पुर्तता करावी.
१०) सदर नोटीस संस्थेच्या शेतकी विभागातील कर्मचारी यांचे मार्फत पोहोच करण्यात आली आहे.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### भारताला अंतिम फेरीत स्थान मिळविण्याची आशा

**राजगीर** : येथे सुरु असलेल्या आशिया चषक पुरुष हॉकी स्पर्धेत पाच सामने शिल्लक असताना व विश्वचषकात स्थान निश्चित करण्यासाठी दोन सामने शिल्लक असताना भारतीय पुरुष हॉकी संघ अखेर आशिया चषक सुरू होण्यापूर्वी अपेक्षित असलेल्या फ्री-फ्लोइंग मशीनसारखा दिसू लागला आहे. शनिवारी भारतीय संघ आपल्या शेवटच्या सुपर फोर सामन्यात चीनविरुद्धच्या लयीत कायम राहण्याचा प्रयत्न करतील. विजय मिळवल्याने भारताला केवळ अंतिम स्थान मिळवण्यास मदत होणार नाही तर आतापर्यंतच्या त्यांच्या कष्टाळू कामगिरीबद्दल चिंतेत असलेल्यांना काही इतर गोष्टी सिद्ध होतील. पहिल्या सामन्यात त्याच प्रतिस्पर्ध्याविरुद्धचा विजय पात्र होता, त्यांनी कठीण खेळण्याच्या परिस्थितीशी चांगल्या प्रकारे जुळवून घेतले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, स्पर्धेत पुढे जाण्यासाठी इतर निकालांवर अवलंबून राहू नये. बरोबरी पुरेशी असू शकते, परंतु ते प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी पुरेशी ठरणार नाही. गुरुवारी झालेल्या शेवटच्या सामन्यात मलेशियाविरुद्धच्या भारताच्या विजयामुळे खेळाडूंवरील दबाव कमी झाला. प्रशिक्षक क्रेग फुल्टन यांनी संघात कोणताही बदल केलेला नाही. खेळाडूंच्या रचनेवर आणि कामगिरीवर लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता असल्याचे फुल्टन यांनी सांगितले.

### विश्व तिरंदाजी स्पर्धेसाठी दीपिका, ज्योती सज्ज

**ग्वांगजू** : शनिवारपासून कोरियातील ग्वांगजू येथे सुरू होणाऱ्या जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत अनुभवी तिरंदाज दीपिका कुमारी आणि वेरन्नम ज्योती सुरेखा आपल्या अनुभवाच्या संपत्तीचा वापर करून भारतीय तिरंदाजी संघाचे नेतृत्व करणार आहे. दोन वर्षांपूर्वी बर्लिनमध्ये झालेल्या मागील आवृत्तीत भारताने पुरुष आणि महिला वैयक्तिक मुकुट आणि महिला सांघिक विजेतेपदासह तीन सुवर्णपदके आणि कम्पाऊंडमध्ये कांस्यपदक जिंकून पदकतालिकेत अव्वल स्थान पटकावले होते. वैयक्तिक गतविजेत्या अदिती स्वामी आणि ओजस देवताळे आपल्या डळमळीत फॉर्म आणि कठोर घरगुती स्पर्धेमुळे यावेळी हुकले. बर्लिनमध्ये आदितीसोबत सुवर्णपदक विजेत्या संघाचा भाग असलेल्या ज्योती आणि प्रणीत कौर, जागतिक युवा रौप्यपदक विजेत्या प्रितिका प्रदीपसह, महिला संघात एक मजबूत फॉर्म बनवतात.

### यु मुम्बाचा बंगळुरू बुल्सवर सहज विजय

**विशाखापट्टणम्** : बाराव्या प्रो-कबड्डी लीग हंगामाच्या दुसऱ्या आठवड्याला सुरुवात करताना शुक्रवारी विशाखापट्टणम् येथील विश्वनाथ स्पोर्ट्स क्लबमध्ये यु मुम्बाने बंगळुरू बुल्सवर ४८-२८ असा दमदार विजय मिळवला. अजित चौहान दुसऱ्या सत्रात सुरुवातीलाच मॅटवरून लंगडा पडला असला तरी, तो १३ गुणांसह यु मुम्बाचा सर्वाधिक गुण नोंदविणारा खेळाडू ठरला, यात सहा गुणांचा समावेश होता. बंगळुरू बुल्ससाठी आशिष मलिक आणि अलिरेझा मिर्झायनने प्रत्येकी सहा गुण मिळवले, पण बंगळुरू संघ पुन्हा एकदा हंगामात आपले खाते उघडू शकला नाही आणि आता ते गुणतालिकेत तळाशी घसरले आहेत. दुसरीकडे, यु मुम्बाने मोहिमेतील तिसरा विजय नोंदवत दुसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. आता, युपी योद्धासचा सामना हरयाणा स्टीलर्सशी होत असून मध्यंतरात युपीने १०-४ अशी आघाडी घेतली होती.

### सुमित, नीरजची विजयी सुरुवात

**लिव्हरपूल** : येथे सुरु असलेल्या जागतिक मुष्टियुद्ध स्पर्धेत शुक्रवारी भारताच्या सुमित कुंडू आणि नीरज फोगटने दुसऱ्या दिवसाची सुरुवात चमकदार पद्धतीने केली आणि उप-उपांत्यपूर्व फेरीत स्थान मिळविले. सुमितने जॉर्डनच्या मोहम्मद अलहुसेनचा ५-० असा पराभव केला, तर नीरजने अंतिम ३२ च्या फेरीमध्ये क्रिस्टा कोव्हलाईनेनचा ३-२ असा पराभव केला. दोन वर्षांनंतर अव्वल दर्जाच्या स्पर्धेत खेळणाऱ्या सुमितने आपल्या खेळाचे चांगले प्रदर्शन केले.

# दानिश मालेवार, शुभमचे अर्धशतक

### दुलीप करंडक क्रिकेट मध्य विभागाचे जोरदार प्रत्युत्तर



**◆ बंगळुरू, ५ सप्टेंबर**

दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेत दानिश मालेवार, शुभम शर्माचे दमदार अर्धशतक व कर्णधार रजत पाटीदारच्या नाबाद ४७ धावांच्या बळावर मध्य विभागाने पश्चिम विभागाला दुसऱ्या दिवशी जोरदार प्रत्युत्तर दिले. पश्चिम विभागाच्या ४३८ धावांच्या प्रत्युत्तरात मध्य विभागाने दिवस अखेर पहिल्या डावांत २ बाद २२९ धावांपर्यंत मजल मारली. खेळ थांबला तेव्हा शुभम नाबाद ६० धावांवर, तर कर्णधार रजत पाटीदार नाबाद ४७ धावांवर खेळत होते. मध्य विभाग अजून २०९ धावांनी पिछाडीवर आहे.

सकाळच्या सत्रात पश्चिम विभागाने ६ बाद ३६३ धावांवरून पुढे दुसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली. त्यांनी शेवटचे चार फलंदाज केवळ २७ धावांत गमावल्यानंतर आणि त्यांचा पहिला डाव १०८ षटकांत सर्वबाद ४३८ धावांवर आटोपला. मध्य विभागाकडून सारांश जैन व हर्ष दुबेने प्रत्येकी ३ बळी, खलील अहमदने २ बळी व दीपक चहरने एक बळी टिपला.

प्रत्युत्तर देताना मध्य विभागाच्या सलामीवीरांनी स्थिर सुरुवात केली. आयुष पांडे (४०) व दानिश मालेवारने पहिल्या गड्यासाठी ६७ धावा जोडल्या आणि त्यानंतर शुभम शर्मा व मालेवारने दुसऱ्या गड्यासाठी ९३ धावांची भागीदारी केली. मालेवार जडेजाच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. मालेवारने १३६ चेंडूंत १२ चौकार व एका षट्कारासह ७६ धावांची खेळी केली. शुभम शर्माने १४८ चेंडूंचा सामना करत ५ चौकारांच्या मदतीने नाबाद ६० धावांची खेळी केली, तर पाटीदारने ५९ चेंडूंत ८ चौकारांसह नाबाद ४७ धावा केल्या.

पश्चिम विभागाच्या गोलंदाजांना फारशी प्रभावी कामगिरी करता आली नाही. शार्दुल ठाकूरने प्रति षटक ४.६७ धावा दिल्या आणि तुषार देशपांडेने प्रति षटक ५.१० धावा वाटल्या. तनुष कोटियन आणि जडेजाने काही वेळा फलंदाजांना अडचणीत आणले, परंतु गोलंदाजी पश्चिम विभागाला हवी तितकी सुसंगत नव्हती. (वृत्तसंस्था)

# दक्षिण विभागाचा ५३६ धावांचा डोंगर

### जगदीशनचे द्विशतक थोडक्यात हुकले
### रिक्की भुई, तनय त्यागराजनची अर्धशतके

**◆ बंगळुरू, ५ सप्टेंबर**

नारायण जगदीशन्च्या शानदार शतकापाठोपाठ देवदत्त पडिक्कल (५७), रिक्की भुई (५४), तनय त्यागराजन् (५८) यांच्या अर्धशतकाच्या बळावर दक्षिण विभागाने दुलीप करंडक क्रिकेट स्पर्धेतील उत्तर विभागाविरुद्धच्या उपांत्य सामन्यात दुसऱ्या दिवशी पहिल्या डावांत १६९.२ षटकांत सर्वबाद ५३६ धावांचा डोंगर रचला. मात्र जगदिशनचे द्विशतक थोडक्यात हुकले.

दक्षिण विभागाने ३ बाद २९७ धावांवरून पुढे दुसऱ्या दिवसाच्या खेळाला सुरुवात केली आणि दिवसअखेरपर्यंत पहिल्या डावांत ५३६ धावा उभारल्या. कालचा नाबादवीर जगदीशन्ने कर्णधार मोहम्मद अझरुद्दीन व रिक्की भोईच्या साथीने संघाला साडे तिनशे धावांचा टप्पा ओलांडून दिला.



निशांत सिंधूचे ५ बळी



रिक्की भुईचे अर्धशतक

**जगदीशन्चे द्विशतक हुकले**

जगदीशन्ने अझरुद्दीनसोबत चौथ्या गड्यासाठी ३८ धावांची, तर रिक्कीसोबत पाचव्या गड्यासाठी ८७ धावांची भागीदारी केली. नारायण जगदीशन् द्विशतकाच्या उंबरठ्यावर असताना धावबाद झाला. सिंधूने त्याला धावबाद केले. जगदीशन्ने ३५२ चेंडूंचा सामना करत १६ चौकार व २ षट्कारांसह १९७ धावा केल्या. पुढे रिक्की भोई, तनय त्यागराजन्ने संघाची धावसंख्या वाढविली. रिक्की भोईने १३१ चेंडूंत ३ चौकार व २ षट्कारांसह ५४ धावांची, तर त्यागराजनने ११६ चेंडूंत ४ चौकारांच्या मदतने ५८ धावांची खेळी केली.

**निशांत सिंधूचे ५ बळी**

उत्तर विभागाकडून डावखुरा फिरकीपटू निशांत सिंधूने १२५ धावांच्या मोबदल्यात ५ बळी टिपले.अंशुल कम्बोजने २ बळी, तर मयंक डागर व साहील लोत्राने प्रत्येकी १ बळी टिपला. (वृत्तसंस्था)

# बीसीसीआयने वाढवले जर्सीच्या प्रायोजकत्वाचे दर

**◆ नवी दिल्ली, ५ सप्टेंबर**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) भारतीय क्रिकेट संघाच्या जर्सी प्रायोजकत्वाचे दर वाढवले आहेत. नवीन दरांनुसार, द्विपक्षीय मालिकांसाठी बोर्ड प्रति सामना ३.५ कोटी रुपये आकारेल. तर बहुपक्षीय स्पर्धांसाठी प्रति सामना १.५ कोटी रुपये आकारेल. पूर्वी हे दर अनुक्रमे ३.१७ आणि १.१२ कोटी रुपये होते.

नवीन दर आशिया कपनंतर लागू होतील. यामुळे बीसीसीआयला ४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त उत्पन्न मिळू शकते, जरी अंतिम रक्कम बोलीच्या निकालांवर अवलंबून असेल. ड्रीम-११ ने जर्सी प्रायोजकत्वातून माघार घेतल्यानंतर बीसीसीआयने हा निर्णय घेतला आहे. सरकारचा ऑनलाइन गेमिंग कायदा, २०२५ लागू झाल्यानंतर बीसीसीआयने ड्रीम११ सोबतचा करार रद्द केला.

जर्सी प्रायोजकत्त्व निविदा जारी

बीसीसीआयने तीन दिवसांपूर्वी मंगळवारी जर्सी प्रायोजकत्त्वासाठी निविदा जारी केल्या होत्या. त्यानुसार, अल्कोहोल, तंबाखू, सट्टेबाजी, रिअल मनी गेमिंग (फँटसी स्पोर्ट्स गेमिंग वगळता), क्रिप्टोकरन्सी आणि पोर्नोग्राफीशी संबंधित ब्रॅण्ड किंवा सार्वजनिक नैतिकतेला धक्का पोहोचवणाऱ्या कंपन्यांचा या बोलीत समावेश केला जाणार नाही. बीसीसीआयने त्यांच्या अधिकृत ट्विटरवर ट्विट करून ही माहिती दिली आहे. (वृत्तसंस्था)

# गुकेशने जिंकला पहिला सामना

### ग्रॅण्ड स्विस बुद्धिबळ
### प्रज्ञानंद बरोबरीत, दिव्याचा पराभव

**◆ समरकंद, ५ सप्टेंबर**

उझबेकिस्तानच्या समरकंद येथे शुक्रवारपासून प्रारंभ झालेल्या ग्रॅण्ड स्विस बुद्धिबळ २०२५ स्पर्धेला सुरुवात झाली असून पहिल्या फेरीत भारतीय खेळाडूंनी संमिश्र यश संपादन केले. गतविजेत्या डी. गुकेशने पहिल्या फेरीतच फ्रान्सचा अनुभवी बुद्धिबळपटू एटिएन बाक्रोला हरवून धमाकेदार सुरुवात केली.

गुकेशने काळ्या तुकड्यांसह खेळताना कॅरो-कान बचावाचा अवलंब केला आणि मधल्या सामन्यात आश्चर्यकारक गुंतागुंत निर्माण केली. बाक्रोने बरोबरीत राहण्याचा प्रयत्न केला, परंतु भारतीय ग्रॅण्डमास्टरने एक शानदार एक्सचेंज बलिदान देऊन निर्णायक आघाडी घेतली आणि सामना जिंकला. गुकेश पुढील सामन्यात पांढऱ्या तुकड्यांसह खेळेल.

दुसरीकडे, अव्वल मानांकित आर. प्रज्ञानंदाला अमेरिकेच्या जेफ्री जेओंगने बरोबरीत रोखले. फ्रेंच बचावात खेळल्या गेलेल्या या सामन्यात जिओंगने सतत प्यादे बदलले व थोडासा दबाव आणला, परंतु अखेर सामना अनिर्णीत राहिला.

महिला विश्वचषक विजेती व ग्रॅण्डमास्टर नागपूरच्या दिव्या देशमुखला मात्र पराभव पत्करावा लागला. तिने



खुल्या गटात अभिमन्यू पुराणिककडून पराभव पत्करून सुरुवात केली.

इतर भारतीय खेळाडूंमध्ये विदित गुजरातीने जर्मनीच्या ॲलेक्झांडर डोन्चेन्कोचा पराभव केला, तर पी. हरिकृष्णा स्लोव्हेनियाच्या ॲन्टोन डान्चेन्कोव्हकडून पराभूत झाला. निहाल सरीनने जर्मनीच्या रासमुस श्वेनसोबत बरोबरी राखली. महिला गटात, आर. वैशालीने उझबेकिस्तानच्या गुलरुखबेगिम तोखिरझोनोव्हाला हरवून विजयाने मोहिमेची सुरुवात केली. वंतिका अग्रवालने युक्रेनच्या युलिया ओस्माकचा पराभव केला. भारताच्या डी. हरिकाचा सामना इस्रायलच्या मार्सेल एफोरिम्स्कीसोबत बरोबरीत सुटला. (वृत्तसंस्था)

# ऊरुग्वे, कोलंबिया, पॅराग्वे विश्वचषकासाठी पात्र

**◆ मोंटेव्हिडिओ, ५ सप्टेंबर**

ऊरुग्वे, कोलंबिया आणि पॅराग्वे संघांनी दक्षिण अमेरिकन पात्रता फेरीच्या लढतीत यश संपादन करून २०२६ च्या विश्वचषकात स्थान निश्चित केले.

ऊरुग्वे आणि कोलंबिया संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांवर ३-० असा विजय मिळवला आणि पॅराग्वे संघाने आधीच पात्र ठरलेल्या अर्जेंटिना, ब्राझील आणि इक्वेडोरसह जागतिक स्पर्धेत प्रवेश करताना प्रतिस्पर्धी संघाविरुद्धच्या सामन्यात गोलरहित बरोबरी साधली.

पात्रता मिळवण्याचा हा एक चांगला मार्ग आहे. संघाचा आक्रमक खेळ मजबूत होता. खेळाडूंनी वैयक्तिक कामगिरीमध्येही अनेक वेळा लक्षवेधक खेळ केली, असे ऊरुग्वेचे प्रशिक्षक मार्सेलो बिएल्सा म्हणाले.

शेवटच्या दोन फेऱ्यांमध्ये पुढे जाण्यासाठी आवश्यक असलेला पेरू आता उरुग्वेविरुद्धच्या पराभवानंतर स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

हारणे दुखावते, खेळाडूंनी केलेल्या प्रयत्नांमुळे ते दुखावते, परंतु आज प्रतिस्पर्ध्याने आम्हाला मागे टाकले, असे पेरूचे प्रशिक्षक ऑस्कर इबानेझ म्हणाले.

कोलंबियासाठी ३१ व्या मिनिटाला जेम्स रॉड्रिग्जने गोल करून सुरुवात केली, तर जॉन कॉर्डोबा आणि जुआन फर्नांडो क्विंटेरोने उत्तरार्धात बोलिव्हियावर विजय मिळवला.

२०२२ च्या कतार विश्वचषकात खेळू न शकलेल्या कोलंबियन संघाचे विश्वचषकात पुनरागमन झाले. कोलंबियन संघाचा हा विश्वचषकात सातवा सहभाग असेल. १९६२ मध्ये चिलीमध्ये पदार्पण केल्यानंतर कोलंबियाने १९९० ते १९९८ दरम्यान सलग तीन सामने खेळले. (वृत्तसंस्था)

# पूर्व विभाग मध्यवर्तीच्या राज्य जलद बुद्धिबळ स्पर्धेस सुरुवात

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**



पूर्व विभाग मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळ व पी. आर. चेस वर्ल्डच्या राज्य १५ वर्षांखालील जलदगती बुद्धिबळ स्पर्धेस सुरवात झाली.

ही स्पर्धा फिडेच्या स्विस लीग नियमानुसार खेळाडूंच्या संख्येनुसार पाच ते सात फेऱ्यांमध्ये करण्यात आली. प्रत्येक खेळाडूला दहा मिनिटांचा वेळ दिला गेला व प्रत्येक चालीला दोन सेकंद अतिरिक्त असा वेळ देण्यात आला होता. या स्पर्धेसाठी ३६ हजाराची १00हून अधिक पारितोषिके त्यामध्ये २१ पारितोषिके रोख रक्कम, ५0 चषके आणि ५0 पदके या स्वरूपात देण्यात येणार आहेत. तसेच प्रत्येक खेळाडूला सहभागी प्रशस्तीपत्रक देण्यात आले. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय पंच पवन राठी, वरिष्ठ राष्ट्रीय पंच रोहिणी तुम्मा, सहमुख्यपंच जयश्री कोंडा, सहाय्यकार्बेटर प्रज्वल कोरे, दिलीप तुम्मा यांनी काम पाहिले. याप्रसंगी पूर्व विभाग मध्यवर्ती सार्वजनिक गणेशोत्सव महामंडळाचे विश्वस्त प्रा. अजय दासरी, पांडुरंग दिड्डी, व्यंकटेश आकेन, महामंडळाचे प्रेसिडेंट विनोद केंजरला,



अध्यक्ष लोकेश नंदाल, उपाध्यक्ष प्रवीण जिल्ला, शुभम एक्कलदेवी, सचिव विजय निली, खजिनदार मनोज पिस्के, गिरीश गोसकी, श्रीनिवास आडम, निखिल चेन्नूर, संतोष क्यातम, कृष्णा बुर्ला आदी उपस्थित होते.

# भारताची थायलंडविरुद्ध विजयी सलामी

### महिला आशिया चषक हॉकी

**◆ हॅण्गझोऊ, ५ सप्टेंबर**

शुक्रवारी हॅण्गझोऊ येथे झालेल्या महिला आशिया चषक हॉकी स्पर्धेत उदिता दुहान व ब्युटी डुंग डुंगने नोंदविलेल्या प्रत्येकी दोन गोलच्या बळावर भारताने थायलंडचा ११-० असा पराभव करून मोहीम सुरू केली.

उदिताने ३० व्या आणि ५२ व्या मिनिटाला पेनॉल्टी कॉर्नरवरून गोल केले, तर डुंग डुंगने ४५ व्या व ५४ व्या मिनिटाला गोल केले.

भारताच्या इतर गोल करणाऱ्या खेळाडूंमध्ये मुमताज खान (७ व्या मिनिटाला), संगीता कुमारी (१० व्या), नवनीत कौर (१६ व्या), लालरेमसियामी (१८ व्या), थौदम सुमन देवी (४९ व्या), शर्मिला देवी (५७ व्या मिनिटाला) आणि रुताजा दादासो पिसाल (६० व्या मिनिटाला) यांचा समावेश होता.

सध्या जगात नवव्या क्रमांकावर असलेल्या भारताने ३० व्या क्रमांकाच्या थायलंडविरुद्धच्या गट ब सामन्यात मध्यंतरात ५-० अशी आघाडी घेतली. ५२ व्या मिनिटाला



विजयाचा आनंद साजरा करताना भारतीय महिला हॉकीपटू

पेनॉल्टी कॉर्नरवरून गोल झाला, तर ४५ व्या आणि ५४ व्या मिनिटाला डुंग डुंगने गोल केला.

या स्पर्धेत आठ संघांचा समावेश आहे आणि दोन्ही गटातील प्रत्येकी दोन संघ सुपर फोर फेऱ्यासाठी पात्र ठरतील. सुपर फोर फेऱ्यांमधील अव्वल दोन संघ १४ सप्टेंबर रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात खेळतील.

भारतीय संघ अनुभवी गोलरक्षक सविता पुनिया आणि ड्रॅग-फ्लिकर दीपिका या जखमी जोडीशिवाय स्पर्धेत उतरला आहे.

आशिया चषक विजेता संघ २०२६ च्या महिला विश्वचषकासाठी पात्र ठरणार असून विश्वचषक स्पर्धा बेल्जियम आणि नेदरलॅण्डसमध्ये होणार आहे. थायलंडनंतर, भारत शनिवारी जपानशी लढेल आणि त्यानंतर ८ सप्टेंबर रोजी सिंगापूरविरुद्ध अंतिम पूल सामना खेळेल. (वृत्तसंस्था)

# सोलापुरात बुधवारपासून राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचा सुवर्ण महोत्सवाचे औचित्य साधून तेरा वर्षांखालील मुले व मुलींच्या आंतर जिल्हा राज्य अजिंक्यपद बास्केटबॉल स्पर्धा बुधवार १० सप्टेंबरपासून येथे आयोजित केल्याची माहिती सोलापूर शहर व जिल्हा बास्केटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष के. डी. पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सिंहगड पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज केगाव व पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सोलापूर विद्यापीठ येथे ही स्पर्धा १५ सप्टेंबरपर्यंत आयोजित केली आहे. या स्पर्धेत राज्यातील मुले व मुलींचे ६0 संघ सहभागी होणार आहेत. या स्पर्धेसाठी मुली व मुले ७00 खेळाडू, ऑफिशियल कोचेस व महाराष्ट्र असोसिएशनचे पदाधिकारी सहभागी होणार आहेत. या स्पर्धेमधून महाराष्ट्राचा मुले व मुलींचा संघ निवडण्यात येणार आहे. हा संघ उत्तराखंड येथे ४ ते १० ऑक्टोबर २०२५ होणाऱ्या राष्ट्रीय बास्केटबॉल स्पर्धेसाठी सहभागी होणार आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन खासदार प्रणिती शिंदे, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार प्रकाश यलगुलवार व जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. या स्पर्धेच्या उद्घाटनानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सव ते राज्याभिषेक त्याचबरोबर महाराष्ट्रातील लोकधारा हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

या पत्रकार परिषदेस जिल्हा बास्केटबॉल संघटनेचे सचिव साकीब शेख, दिनेश सारंगी, मुकीम खान, तबिश जमाल, सीमा यलगुलवार, नावेद मुनशी आदी उपस्थित होते.

# निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमी विजेता

### दिवंगत शिवाजीराव शेंडे चषक क्रिकेट स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

निलेश गायकवाड क्रिकेट ॲकॅडमीने दिवंगत शिवाजीराव शेंडे चषक १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले.

मेडशिंगी (ता. सांगोला) येथे दिव्यांग शिवाजीराव शेंडे जिमखाना येथे झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी पंढरपूरच्या रविंद्र निंबाळकर क्रिकेट अकॅडमीचा ५३ धावांनी पराभव केला.



**वैयक्तिक पारितोषिके विजेते :**

**अंतिम सामन्यातील :** अनुज वाल्मिकी (सामनावीर), विहान मुसळे (फलंदाज), अनुज वाल्मिकी (गोलंदाज).

**स्पर्धेतील :** आनंद शेंडे (फलंदाज), अनुज वाल्मिकी (गोलंदाज), अनिश बिरोळी (क्षेत्ररक्षक), हर्ष राऊत (यष्टीरक्षक).

पारितोषिके मिस टिन इंडिया सोफीस्टीकेटेड २०२५ अनन्या शेंडे यांच्या हस्ते देण्यात आली. यावेळी अंजली शेंडे, डॉ. अमरसिंग शेंडे, सांगोलाची कोच प्रशांत काशीद, रणजीत गवळी, आरएनसीएचे कोच रवींद्र निंबाळकर, श्रीकांत खोत, विनोद पाटील, राहुल म्हेत्रे, वाल्मीक कीर्तीकर, आनंद पाटील, दीपक सुरवसे, विष्णू गायकवाड आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन विष्णू गायकवाड यांनी केले

**संक्षिप्त धावफलक :** निलेश गायकवाड क्रिकेट अकॅडमी : ५0 षटकात ८ बाद २२३ (रणवीर सिंग बोमरा ३२, ऋग्वेद पाटील ३३, आनंद शेंडे ३७, सुजल गायकवाड १७, आर्यन हांगे २७, अनुज वाल्मिकी नाबाद १९, नितिकेश गज्जम १४, वेदांत गोंजारी २५/३, चिराग सुतार, समर्थ रंगे, रुद्र चौगुले, विहान मुसळे प्रत्येकी एक बळी) वि. वि. रविंद्र निंबाळकर क्रिकेट अकॅडमी : ५0 षटकात ९ बाद १७0 ( विहान मुसळे नाबाद ७६, रुद्र चौगुले २१, वेदांत कोळेकर १६, वीर कोळेकर नाबाद ९, अनुज वाल्मिकी २४/ ४, अनिश बिरोळी ५/३, ऋग्वेद पाटील, आर्यन हांगे प्रत्येकी एक बळी).

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



## वागदरीतील सर्व रोग निदान शिबिरात १५० जणांची तपासणी

**अक्कलकोट, दि. ५ सप्टेंबर-**

तालुक्यातील वागदरी येथील श्री हनुमान मंदिर चावडी येथे आयोजित सर्व रोग शिबिरात१५० जणांचे आरोग्य तपासणी करण्यात आले. येथे विविध आजारावर मोफत आरोग्य तपासणी करण्यात आले असून अनेकांनी रक्तदान केले. मुख्यमंत्री सहाय्यता निधी तथा धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष अनुयामी लोकराज्य महाअभियान यांच्या समन्वयाने मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री गणेशा आरोग्य अभियान -२०२५ नुसार वागदरी येथे विविध आजारावर मोफत आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी शेळके प्रशाला चेअरमन मल्लिनाथ शेळके, भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रदीप जगताप, गोगांवचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, शाणप्पा मगाणे, धोंडाप्पा यमाजी, वागदरीचे सरपंच शिवानंद घोळसगाव,घालया मठपती, तंटा मुक्त समिती अध्यक्ष लक्ष्मण सलगरे, महादेव सोनकवडे, श्याम बाबर, हनीफ मुल्ला, असलम मुल्ला किरनाळी, डॉ. खलील सय्यद, डॉ. लिगराज नडगेरी, डॉ. प्रदीप पोमाजी यांच्या प्रमुख उपस्थित उदघाटन करण्यात आले. यावेळी जिल्हा समन्वयक पांडुरंग शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी जमादार, सरसंबे, परीट, वागदरी सर्व आशा वर्कर, समर्थ ठोंबरे, प्रदीप कनमुसे, सचिन मठपती, बसवराज मठपती, सचिन स्वामी, ओंकार ठोंबरे, अमर मठपती, प्रतीक आगरखेड, शशांक वरनाळे, समर्थ सुरवसे, अमोल माने, विरेश मठपती, सचिन पोमाजी, सिद्धा मठपती, श्रीशैल पटणे, प्रकाश पोमाजी, सुनील सावंत, महेश हजगी यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन महादेव सोनकवडे यांनी केले आभार प्रदीप पोमाजी यांनी मानले.




## मोहोळ येथे 'सिद्धेश्वर'चा थांबा हे खासदार प्रणिती शिंदे यांचे यश : शेख

**मोहोळ, दि. ५ सप्टेंबर-**

सिद्धेश्वर एक्सप्रेसचा मोहोळ रेल्वे स्थानकावरील थांबा पुन्हा सुरू झाला असुन यासाठी रेल्वेमंत्री अश्वीनी वैष्णव यांच्याकडे खासदार प्रणिती शिंदे यांनी सातत्याने केलेला पाठपुरावाच कारणीभूत ठरला आहे, अशी माहीती मोहोळच्या माजी नगराध्यक्षा आणि काँग्रेसच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शाहीन शेख यांनी पत्रकार परिषदेत दिली. याबाबत मंगळवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेमध्ये बोलताना त्या म्हणाल्या की कोरोना काळा पासुन मोहोळ रेल्वे स्टेशनवर बंद असलेले रेल्वे थांबे पुनश्चः सुरु व्हावेत यासाठी शहरवासीयाकडुन आग्रही मागणी होती. शहरवासीयांच्या विनंतीनुसार खासदार प्रणिती शिंदे यांनी रेल्वेमंत्र्याकडे वारंवार पाठपुरावाही सुरु ठेवला होता. दरम्यान याबाबत दिल्ली येथेच रेल्वेमंत्र्यांची भेट घेऊन निवेदन देण्याचे ठरविण्यात आले त्यानुसार महिला कॉग्रेसच्या जिल्हाध्यक्षा आणि माजी नगराध्यक्षा शाहीन शेख यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना उबाठाच्या माजी सरपंच व माजी नगरसेविका सीमा पाटील, राष्ट्रवादी (शरद पवार गटाचे नेते विक्रांत दळवी, विधिज्ञ श्रीरंग लाळे पत्रकार तथा निवृत्त प्राध्यापक चंद्रकांत देवकते सर,काँग्रेसचे तालुका सरचिटणीस संतोष शिंदे, सुरज शेख या सर्वांचे शिष्टमंडळाने दिल्ली येथे रेल्वेमंत्री आश्वीनी वैष्णव यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले होते. यावेळी रेल्वेमंत्र्यानी सकारात्मकता दर्शविली होती.अखेर त्यानंतर फक्त सिद्धेश्वर एक्सप्रेसच्या थांब्याला मंजुरी मिळाली. आणि बुधवार दि .३ सप्टेबरपासून गाडी थांबण्या बाबत अधिकृत आदेश जारी करण्यात आला आहे. या निर्णयामुळे मोहोळ व तालुक्यातील विविध कामानिमित्त मुंबई येथे जाणारा वकील विद्यार्थी डॉक्टर व्यापारी, शेतकरी सर्व स्तरातील प्रवासी वर्गांना सोयीचे झाले आहे. त्यांना प्रवास अधिक सुलभ होणार असून वेळेची बचतही होणार आहे. याप्रसंगी मोहोळच्या माजी सरपंच व माजी नगरसेविका श्रीमती सीमा पाटील, माजी नगरसेवक सत्यवान देशमुख, पत्रकार तथा निवृत प्रा.चंद्रकांत देवकते, संतोष शिंदे उपस्थित होते.

## नवीनतम एसयूव्ही विक्टोरिस लॉन्च

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

भारतीय एसयूव्ही सेगमेंटला नव्याने परिभाषित करत मारुति सुझुकी इंडिया लिमिटेड (एमएसआयएल) ने आज आपली नवीनतम एसयूव्ही विक्टोरिस लॉन्च केली. नवीन बेंचमार्क्स स्थापित करण्याच्या उद्देशाने विकसित करण्यात आलेली विक्टोरिस हायपर-कनेक्टेड टेक्नॉलॉजी, ऑल-राऊंड सेफ्टी,भविष्यकालीन व स्लीक डिझाईन आणि रोमांचक परफॉर्मन्स यांचा अप्रतिम संगम आहे,जी खऱ्या अर्थाने एक अशी एसयूव्ही आहे ज्यात आहे 'गॉट इट ऑल'. पेट्रोल विथ स्ट्रॉन्ग हायब्रीड, ऑल ग्रिप सलेक्ट (४४) आणि सेगमेंट-फर्स्ट अंडरबॉडी टाकी डिझाईनसह पर्यावरणपूरक एस - सीएनजी तंत्रज्ञानासह उपलब्ध, विक्टोरिस आजच्या डायनॅमिक तरुणांसाठी विविध पॉवरट्रेन पर्याय देते. ग्राहक ऑल-न्यू विक्टोरिसची बुकिंग ११,००० रुपये मध्ये करू शकतात.यावेळी हिसाशी ताकेउची म्हणाले,विक्टोरिस हा लॅटिन शब्द आहे ज्याचा अर्थ आहे 'विजेता'.आम्हाला विश्वास आहे की विक्टोरिस आपल्या अत्याधुनिक तंत्रज्ञान, स्लीक डिझाईन, स्मार्ट आणि कनेक्टेड फीचर्स, ५-स्टार स्तरावरील सुरक्षा आणि विविध पर्यावरणपूरक पॉवरट्रेनसह भारतातील ग्राहकांची मने जिंकेल.

## रमेश जहागीरदार यांचे निधन

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**



विजापूर रस्त्यावरील चैतन्य नगर सोसायटीचे संस्थापक, माजी अध्यक्ष रमेश जहागिरदार यांचे पुणे येथे शुक्रवारी निधन झाले. मृत्यू समयी ते ८८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. जनता बँकेचे माजी अकाऊंटंट रविंद्र जहागिरदार व अनिल जहागिरदार यांचे ते बंधू होत.

# शिक्षकांना टीईटीची सक्ती; उतारवयात द्यावी लागतेय परीक्षा

### जिल्ह्यातील सुमारे दोन लाख शिक्षक चिंतेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

शालेय शिक्षण विभागाने १३ फेब्रुवारी २०१३ रोजी आदेश काढून प्राथमिक शिक्षकांसाठी 'टीईटी' (शिक्षक पात्रता परीक्षा) बंधनकारक केली. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने त्यापूर्वी नोकरीला लागलेल्या शिक्षकांसाठी देखील 'टीईटी'चे बंधन घातले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार प्राथमिक शाळांवरील ज्या शिक्षकांचे वय ५३ वर्षे आहे, त्यांना दोन वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण व्हावीच लागणार आहे. राज्यात ५३ वर्षांवरील अंदाजे एक लाख ४९ हजार शिक्षक आहेत.

प्राथमिक शाळांवरील ५३ वर्षांपर्यंतच्या सर्वच शिक्षकांना दोन वर्षात 'टीईटी' उत्तीर्ण करावी, अन्यथा त्यांच्यावर सक्तीच्या सेवानिवृत्तीची कारवाई करावी, असेही आदेश आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशामुळे महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगालसह बहुतेक राज्य सरकार. पुढे पेच निर्माण झाला आहे. शालेय शिक्षण विभागाने शासनाला सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे.

शिक्षकांमध्ये दुसरीकडे संभ्रम असून वयाची पन्नाशी पार केलेल्या शिक्षकांना आता त्यांच्या नातवंडासोबत 'टीईटी'ची परीक्षा द्यावी लागणार आहे. त्यासाठी अवघ्या दोन संधी देण्यात आल्या आहेत. राज्यात प्राथमिक शाळांची संख्या ६५ हजार ८० तर उच्च प्राथमिक शाळांची संख्या २२ हजार ३६० इतकी आहे. या शाळांवर सुमारे पावणेपाच लाख शिक्षक असून त्यातील २०१३ पूर्वीच्या सर्व शिक्षकांना (ज्यांचे वय ५३ वर्षांपर्यंत आहे असे) देखील 'टीईटी' उत्तीर्ण व्हावी लागणार आहे. परंतु, फेब्रुवारी २०१३ पूर्वीच्या शिक्षक सेवेत येताना त्यांना ही अट व शर्त लागू नव्हती. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर महाराष्ट्र शासन आपले म्हणणे सरकार करेल असे वरिष्ठ अधिकारी यांनी सांगितले.

### शिक्षकांची पदोन्नती आता 'टीईटी'वरच

शिक्षण सेवकांना तीन वर्षानंतर उपशिक्षक म्हणून संधी मिळते. त्यानंतर सहशिक्षक, पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक आणि पुढे देखील पदोन्नती मिळतात. पदोन्नतीच्या प्रत्येक टप्प्यावर 'टीईटी'ची अट घालण्यात आल्याने सेवाज्येष्ठ शिक्षकांऐवजी टीईटी उत्तीर्ण असलेला ज्युनिअर शिक्षक मुख्याध्यापक होणार आहे. त्याला शिक्षक व शिक्षक संघटनांनी विरोध केला आहे. या पार्श्वभूमीवर त्या नियमावलीसंदर्भात शासनाने धोरण निश्चित करावे, असा पत्रव्यवहार शालेय शिक्षण विभागाकडून करण्यात आला आहे.



### प्राथमिक शाळांची स्थिती

एकूण शाळा : ८७ हजार ४४०, शिक्षकांची एकूण संख्या : ४ लाख ७९ हजार, 'टीईटी' द्यावी लागणारे शिक्षक : सुमारे १ लाख ४९ हजार 'टीईटी' उत्तीर्णसाठी मुदत : २ वर्षे

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन करतांना राज्यातील सुमारे ७० ते ७५ टक्के शिक्षकांना टी.ई.टी परीक्षा द्यावी लागेल. परीक्षा, त्याकरीता करावी लागणारी तयारी, टी.ई.टी अभ्यासक्रमाबद्दलची अनभिज्ञता, केवळ पाठ्यपुस्तके तसेच संदर्भ ग्रंथाच्या अध्ययनाची सवय आणि अध्ययन, अध्यापन, मुल्यमापन आदी शैक्षणिक आणि अशैक्षणिक कार्याचा अधिभार यांचा विचार करता व्यवसाय पूर्व परीक्षेमध्ये यशापेक्षा अपयशाचीच अधिक शक्यता असल्याने शिक्षक व शासनापुढे पेच निर्माण झाला आहे.



## राजयोगी रंगनाथ स्वामी प्रतिष्ठानतर्फे नारी शक्तीचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि. ५ सप्टेंबर-**

राजयोगी रंगनाथ स्वामी प्रतिष्ठान नाझरे (ता.सांगोला) येथे गणेश उत्सव कार्यक्रमात नारी शक्तीचा सन्मान अंतर्गत विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या ५३ नारी शक्तीचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माता बालक प्रतिष्ठानच्या अध्यक्षा डॉ.संजीवनी केळकर तर प्रमुख पाहुणे म्हणून उमेशचंद्र कुलकर्णी, उल्हास धायगुडे पाटील, पोलीस उपनिरीक्षक रूपाली उबाळे, बंडूमामा आदाटे, शिवाजीराव बनसोडे, रविराज शेटे, जगदीश कुलकर्णी, अतुल फसाले, अमर तांबोळी उपस्थित होते. सुरुवातीस मंडळाने आजवर कर्तुत्वान माता तसेच अनेक सामाजिक उपक्रम राबविले व यावर्षी सन्मान नारी शक्तीचा आम्ही मंडळातर्फे साजरा करतोय व यामध्ये विविध क्षेत्रात आपल्या कामाचा ठसा उमटवणाऱ्या महिलांचा सत्कार करताना आम्हास आनंद होत आहे असे ओंकार देशपांडे यांनी सांगितले. तर अन्याय, अत्याचार प्रसंगी हाक द्या भाऊ म्हणून साथ देऊ असे उल्हास धायगुडे पाटील यांनी यावेळी सांगितले. तर उमेशचंद्र कुलकर्णी व डॉ.संजीवनी केळकर यांनी नारीशक्तीचा सन्मान हा उपक्रम मंडळाचा कौतुकास्पद असल्याचे सांगितले. यावेळी सत्कार मूर्तीच्या वतीने शिक्षिका नयना पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन स्वरा देशपांडे यांनी केले.

### यांचा झाला सन्मान-

रूपाली उबाळे, डॉ. नीता जोंधळे, डॉ. चंद्रकला बाबर, डॉ. ज्योती पाटील, डॉ. गौरी पाटील, डॉ.प्रियंका बनसोडे, यास्मिन मुल्ला, के.एन.दौंड, रूपाली कांबळे, मोनाली सरगर, मनीषा जावीर, नयना पाटील, भारती बनसोडे, योगिता शेटे, कस्तुरा जांभळे, सुनिता गोडसे, नंदादेवी बनसोडे, लता पाटील, नंदा गाडेकर, सुजाता बनसोडे, माधुरी जोंधळे, राजश्री कुळलोली, कविता बनसोडे, कल्याणी सुतार, सविता बनसोडे, जयश्री रायचुरे, निकिता सुतार, तुळसाबाई सरगर, कल्पना घोडके, प्रभावती वाघमारे, सुनिता जावीर, नंदा बनसोडे, मंगल हरिहर, राणी वाघमारे, रेखा सरगर, बाई वाघमारे, भारती दौंड, शारव्वा कुल्लोली, कस्तुरा पाटील, संगीता वाघमारे, पुनम दबडे, दिपाली स्वामी, सुनिता भिवरे, भारती भोसले, कविता शेटे, कोमल भंडारे, मीरा कोरे, प्रगती दंडवते, सुवर्णा चौगुले, मीनाक्षी रोकडे, कल्पना खंडागळे, धनश्री सरगर, बाळाबाई ढोबळे

## तलाठी व मंडल अधिकाऱ्यांच्या त्रासाने व्हॉट्सॲप स्टेटस ठेवत आत्महत्येचा मंगळवेढ्यात प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि.५ सप्टेंबर-**

जमिनीची नोंद धरण्यावरून महसूल यंत्रणेकडून झालेल्या त्रासाला वैतागून नंदेश्वरच्या शेतकऱ्यांने तलाठी व मंडल अधिकाऱ्याचे नाव व्हाट्सअप स्टेटसला ठेवत मंगळवेढ्यातील तहसील कार्यालयात अंगावर तेल ओतून पेटवून घेण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने महसूलच्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे ही घटना टळली. दरम्यान संजय गांधी प्रकरणातही अर्जावर सही करण्यास निंबोणी ग्रामसेवक, तलाठ्याने टाळाटाळ केल्याने महिला वर्गातुन संताप व्यक्त होत आहे. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी लक्ष घालून संबधितावर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

आंधळगाव महसूल मंडल मधील नंदेश्वर मधील समाधान मोटे या शेतकऱ्याच्या खरेदीची नोंद महसूल यंत्रणांकडून रद्द करण्यात आली. ज्या कारणास्तव रद्द करण्यात आली त्यातील दुरुस्ती शेतकऱ्याने करण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यासंदर्भातील नोंद घेण्यास तलाठी व मंडल अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केल्यावरून संबंधित शेतकऱ्याने गुरूवार दि.४ रोजी दु.३ दरम्यान मंगळवेढा तहसील कार्यालयात अंगावर तेल ओतून पेटवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला, परंतु महसूल मधल्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे ही दुर्दैवी घटना टळली. सध्या मंगळवेढा तहसीलमधील आठ महसूल मंडल असून त्या आठही मंडल मधील महसूल मंडल अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्याला प्रत्येक गोष्टीसाठी नाहक त्रासाला सामोरे जावे लागते.

कोणत्याही कारणास्तव नोंद करत असताना काहीतरी कारण सांगून नोंद प्रलंबित ठेवणे आणि त्यांच्या नेमलेल्या झिरो हस्तकामार्फत अर्थपूर्ण व्यवहार झाल्यानंतर ती नोंद प्रमाणित करण्याचे प्रकार सुरू आहेत. परंतु याकडे महसूलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सोयीस्कररित्या दुर्लक्ष केल्यामुळे यापूर्वी दोन वेळा मंडळ अधिकाऱ्याला लाच प्रकरणात अटक झाली आहे. तरीदेखील महसूल यंत्रणा याकडे गांभीर्याने पाहत नाही.

संतप्त झालेल्या शेतकऱ्याने आपल्या त्रासाला तलाठी व मंडल अधिकारी जबाबदार असून आपण त्यांच्या त्रासाला कंटाळून आत्म हत्या करत असल्याचा व्हाट्सअप स्टेटस ठेवून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. महसूल यंत्रणानी केलेले काम योग्य जरी सांगत असले तरी महसूलच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने वर्षभरात नोंदी प्रमाणित केलेल्या शेतकऱ्यांचे जबाब घेतले तरी त्यांना किती त्रास झाला हे समोर येऊ शकते.

दरम्यान या घटनेनंतर यामध्ये दोषी कोण आहेत याबाबत प्रांत अधिकारी यांनी सखोल चौकशी करून करुन कारवाई अशी मागणी या निमित्ताने पुढे येत आहे महसुल आधिकाऱ्यांनी नोंद धरण्यास नियमानुसार काही दिवसाचा कालावधील असतो असे सांगीतले.

## वेळापुरात डान्स स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**वेळापूर, दि. ५ सप्टेंबर-**

वेळापूर येथील श्री क्षेत्र महात्मा फुले गणेशोत्सव मंडळाच्या वतीने लहान गट (पहिली ते सातवी) रेकॉर्ड डान्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत तब्बल ५० विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.



कार्यक्रमाचे उद्घाटन वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, ग्राम पंचायत सदस्य अमृतराव माने देशमुख, गाव महसूल अधिकारी गणेश भानवसे यांच्या हस्ते संपन्न झाले.

मंडळाचे मार्गदर्शक व माजी उपसरपंच शंकरराव काकुळे, अध्यक्ष राजकुमार पोरे, खजिनदार तुकाराम राऊत, उपाध्यक्ष राजू तेली, कार्याध्यक्ष विलास राऊत, सचिव शंकर राऊत, ॲड. दत्तात्रय राऊत, राजकुमार शिंदे, प्रा. बलभीम काकुळे, दीपकआबा राऊत, सोमनाथ चांडोले, बापू भानवसे, उमेश भानवसे, नागेश क्षीरसागर, अजान शेख, जब्बार मुलानी, जयसिंग पांढरे, पार्थ करमाळकर आदी उपस्थित होते. या स्पर्धेत मुलींनी देशभक्तीपर गीते, शेतकरी गीते, लोक कला गीते, सांस्कृतिक कार्यक्रम यासह लावणी, सामूहिक तसेच विविध गाण्यांवर नृत्यकला सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली. स्पर्धेत रिक्तम सामंता ३ हजार रुपये बक्षिस प्रथम क्रमांक, कामिलरजा गुलाब नदाफ २ हजार दुसरे बक्षिस, मनरवी तुषार जवंजाळ १ हजार रुपये तीसरे बक्षिस, उत्तेजनार्थ स्वरांजली हिंम्मतराव माने देशमुख, व लोकविकास इंग्लिश इंग्लिश मीडियम वेळापूर तसेच शो डान्स सारा फारुख कोरबू यांनी बक्षिसे मिळवली. स्पर्धेचे परिक्षक म्हणून अपूर्वा पौडवाल प्रगती उरणे यांनी काम पाहिले.



## फुले शाहू आंबेडकर विचारमंचच्या वतीने गौतम विद्यालयास 'संविधान' प्रत भेट

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ सप्टेंबर-**

भारतीय संविधान अमृत महोत्सवा निमित्त फुले शाहू आंबेडकर विचारमंच पंढरपूरचे वतीने भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त पंढरपूर तालुक्यातील गौतम विद्यालयास 'संविधान' प्रत मुख्याध्यापक नंदकुमार वाघमारे यांना भेट देण्यात आली.

यावेळी विचारमंचाचे अध्यक्ष सुनील वाघमारे म्हणाले की, पंढरपूर शहर व तालूक्यातील सर्व माध्यमिक शाळेस आम्ही 'संविधान 'प्रत भेट देणार असून या उपक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीचे गौतम विद्यालय येथून आम्ही सुरुवात करत आहोत.

यावेळी गौतम विद्यालयाचे माजी मुख्यध्यापक व फुले शाहू आंबेडकर विचार मंचाचे खजिनदार दादासाहेब दोडके यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन एस.पी.रूपनर यांनी केले. तर आभार सेवागिरी गोसावी यांनी मानले.

यावेळी फुले शाहू आंबेडकर विचार मंचाचे सदस्य विवेक वर्धिनी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य राजेंद्र पारध्ये, उपाध्यक्ष ॲड. कीर्तीपाल सर्वगोड, सल्लागार श्रीकांत कसबे, सदस्य व्ही. एस.कांबळे, सेवागिरी गोसावी, सुखदेव माने उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. सामूहिक संविधान उद्देशिकेचे वाचन करण्यात आले.

## मोटार सायकलला चारचाकीची धडक; पाच वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू

**माळिशरस, दि. ५ सप्टेंबर-**



आपल्या आजीकडे गेलेल्या पाच वर्षाच्या चिमुकल्याचा आपल्या गावाकडे परतताना माळिशरस येथे आल्यानंतर मोटार सायकलला पाठीमागून चार चाकी टोयाटो गाडीने जोरदार धडक दिल्याने पाच वर्षाच्या चिमुकला जागीच मृत्यू झाला तर त्याची आजी गंभीर जखमी झाल्याची घटना आज दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास पुणे पंढरपूर मार्गावर हॉटेल पंचशील हॉटेल समोर घडली. अविष जाधव (वय ५ वर्ष ) राहणार मगराचे निमगाव तालुका माळिशरस तर उज्वला बाळासाहेब मगर (वय वर्ष ५५) वर्षे (राहणार मगराचे निमगाव) असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. दिलीप शरद माने, राहणार कुरवली तालुका इंदापूर हे मोटार सायकल क्रमांक एम एच ४५ एक्स ३२९० यावरून कुरवली कडुन निमगांवकडे निघाले होते त्या बाळाला तहान लागल्याने ते पाणी पिण्यासाठी रस्त्याच्या कडेला थांबले होते नंतर ते निघतांना काही अंतरावर आल्यानंतर नातेपुते कडे माळिशरस कडे येणाऱ्या चारचाकी कार नंबर एम एच १२ एफ पी ९४२९ या गाडीने भरधाव वेगाने मोटार सायकलला जोरदार धडक दिल्याने गाडीवर बसलेल्या अविष हा उंच उडून जागीच मयत झाला तर त्याची आजी गंभीर जखमी झाली. गंभीर जखमीला अकलूज येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. माळिशरस पोलीस ठाण्यात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू आहे.



## जनस्वराज्य फाउंडेशनच्या आदर्श शिक्षक पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.५ सप्टेंबर-**

येथील जनस्वराज्य फाउंडेशनच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल शिक्षकांचा पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी बार्शी व तालुक्यातील शिक्षक व शिक्षिकांचा शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल फाउंडेशनच्या वतीने बार्शीचे उपविभागीय अधिकारी अशोक सायकर यांच्या हस्ते सन्मानपत्र देवून सत्कार करण्यात आला. त्यामध्ये प्रा.डॉ. राहुल पालके (बार्शी), अपेक्षा निचळ (सौंदरे), प्रवीण कांदे (बाभूळगाव), वर्षा भांगे (चिखर्डे), रूपाली बिडवे (शेळगाव (आर)) यांचा समावेश आहे. ज्योती शाह कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी होत्या. यावेळी जनस्वराज्य फाउंडेशनचे संचालक दशरथ उकिरडे, प्रकाश पवार, शैलेश वखारिया, विनोद कबाडे, अमृता रंगदाळ, हनुमंत गोटे, सन्मानार्थीचे नातेवाईक उपस्थित होते. शिक्षक हा समाजाची घडी व्यवस्थित बसावी यासाठी अत्यंत महत्त्वाचे काम करतात. त्यांच्या कार्याचा गौरव समाजासाठी भूषणावह असल्याचे मत श्री. सायकर यांनी व्यक्त केले. श्री उकिरडे यांनी प्रास्ताविक केले. जनस्वराज्य फाउंडेशनमार्फतच्या कार्यक्रमांची त्यांनी माहीती दिली. अध्यक्षा शाह यांनी समाजातील शिक्षकांचे स्थान व भूमिका याबाबत आपले मत मांडले.

## प्रज्वल पवारचे अपघाती निधन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ५ सप्टेंबर-**



चोखामेळानगर शिक्षक कॉलनी येथील प्रज्वल उर्फ समर्थ जयंत पवार याचे गुरुवार दिनांक ४ सप्टेंबर रोजी सकाळी सात वाजता अपघाती निधन झाले. मृत्यूसमयी तो २३ वर्षांचा होता. त्याच्या पश्चात आई, वडील, आजी, एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. प्रज्वल पवार हा ३० जुलै रोजी रांजणगाव येथे झालेल्या दुचाकी अपघातात गंभीर जखमी झाला होता. तेंव्हा पासून त्याच्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचार दरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. सिद्धेश्वर प्रशाला माचणूरचे माजी मुख्याध्यापक यांचा तो चिरंजीव होत.




सोलापूर : पुर्व भागातील आप्पा गणपती मंडळाने साकारलेल्या कोल्हापूरच्या महालक्ष्मी मंदिराचा देखावा पाहताना भाविक.



सोलापूर : दै. तरुण भारतच्या गणरायाची पूजा कायदेशीर सल्लगार ॲड. बसवराज सलगर, ॲड. निखिल गोदेपूरे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी तरुण भारतचे संचालक ॲड. चैतन्य पेठे, सीईओ श्रीनिवास बिनगुंडी, व्यवस्थापक विनायक पुला, प्रकाश जाधव, उपसंपादक श्याम जोशी.

## महत्वाचे...



पुणे : माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त पुणे येथील त्यांच्या निवासस्थानी गणपती बाप्पांचे दर्शन घेऊन त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सातलिंग शटगार. यावेळी जहांगीर शेख, बाळ दळवी उपस्थित होते.



### चित्रकला स्पर्धेत चैतन्या पाटीलचे यश

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

चैतन्या श्रेयस पाटील हिने जिव्हेश्वर मंडळ चित्रकला स्पर्धेत यश मिळवले आहे. जिव्हेश्वर मंडळ आयोजित चित्रकला स्पर्धेमध्ये सिद्धेश्वर कन्या प्रशालेची विद्यार्थिनी चैतन्यापाटील या विद्यार्थिनीने द्वितीय क्रमांक मिळवला आहे. या यशामुळे शाळेचे मुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका तसेच कलाशिक्षकांनी चैतन्याचे अभिनंदन केले.

### दुभाजकाला दुचाकी धडकून एकजण बेशुध्द

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

करमाळा येथे जाताना देवीचा मळा समोरील रस्त्यातील दुभाकाला दुचाकी धडकून पडल्याने एकजण गंभीर जखमी झाला. या अपघातात त्याची शुध्द हरपली आहे. ही घटना गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. अण्णासाहेब चंद्रकांत भगत (वय ५०, रा. करमाळा) असे व्यक्तीचे नाव आहे. गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास अण्णासाहेब हे दुचाकीवरून राहते घर येथून करमाळा येथे जात होते. देवीचा माळ येथील रस्त्यावर अचानक ते चालवित असलेली दुचाकी दुभाजकाला धडकली. यात खाली पडल्याने त्यांच्या डोक्याला मार लागला. करमाळा येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून पुतण्या सिध्देश्वर याने शासकीय रुग्णालयात दाखल केले. रुग्ण अण्णासाहेब हा बेशुध्द असल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### पुलावरून पडल्याने व्यक्ती रुग्णालयात

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

मोहोळ येथील नागनाथ शाळेच्या समोरील पुलावर बसला असता अचानक तोल जाऊन पडल्याने हिवरेतील व्यक्ती कमरेला मार लागल्याने रुग्णालयात दाखल झाला आहे. ही घटना शुक्रवारी रात्री ७.३० च्या सुमारास घडली. भास्कर दिगंबर मोरे (वय ४५, रा. हिवरे ता मोहोळ) असे व्यक्तीचे नाव आहे. भास्कर हे गुरुवारी रात्री ७.३० च्या सुमारास मोहोळ येथील नागनाथ शाळेच्या समोरील पुलावर बसले होते. त्यावेळी ते अचानक तोल जाऊन खाली पडले. यात त्यांच्या कमरेला मुकामार लागल्याने मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून शुक्रवारी सकाळी ८.२० वाजता मुलगा विश्वजीत यांनी शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## साक्षात्कार गणपती मंडळातर्फे अथर्वशीर्ष पठण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

स्वातंत्र्य सैनिक नगर सांस्कृतिक बहुद्देशीय युवक मित्र मंडळ संचलित साक्षात्कार गणपती मंडळाकडून शिक्षण दिन अवच्छित साधून स्वातंत्र्य सैनिक गृह सोसायटीमध्ये गणपतीसमोर अथर्वशिष पठण करण्यात आले.

अथर्वशिष पठन हा लोककल्याणासाठी, प्रत्येकाचे जीवनातील दुःख जाऊन सुख प्राप्तीसाठी, आनंदित वातावरण निर्मिती साठी केला जातो. या पूजेला सोसायटीतील रचना कट्टा, प्रेमा स्वामी, गीता दंडी, सुमन कलशेट्टी, सौ मैसूर, नंदिनी स्वामी, श्रीदेवी चडचणकर, महादेवी तडलगी, सुतेजा बिराजदार, विमल क्षीरसागर, महिनावती बलते, सौ नलावडे, सौ. कटाप, वीणा यांनाम, संगीता पवार उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी लक्ष्मीकांत दंडी, स्वप्नील सातपुते, नरेंद्र दंतकाळे, अभिलाष स्वामी, शेखर बिराजदार, राजू कट्टा, दीपक ताडाळगी, जयप्रकाश नामाजी, क्रांती खटके यांनी परिश्रम घेतले.

## सरस्वती मंदिरच्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

रौप्य महोत्सवी श्री.सरस्वती मंदिरची श्री गणेश विसर्जन मिरवणूक आनंदी वातावरणात, उत्साहात, जल्लोषात व शिस्तीने संपन्न झाली. विसर्जन मिरवणूकीच्या प्रारंभी सिद्धेश्वर सहकारी बँकेचे अध्यक्ष नरेंद्र गंभीरे यांच्या हस्ते श्री गणेश विसर्जनाच्या मिरवणूक प्रस्थानपूर्व गणेश पूजन करण्यात आले. गणेश पूजनानंतर सरस्वती मंदिर संस्थेचे अध्यक्ष ॲड.पांडुरंग देशमुख हस्ते सरस्वतीची प्रतिमा आणि पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

या मिरवणुकीत संस्थेचे अध्यक्ष ॲड. पांडुरंग देशमुख, उपाध्यक्षा रेवती कुलकर्णी, सचिव रोहिणी तडवळकर, सहसचिव दत्तात्रय कुलकर्णी, खजिनदार सुधीर देव, कार्यकारी मंडळातील सदस्य ॲड. रघुनाथ दामले, प्रशांत बडवे, राहुल औरंगाबादकर, प्रीति चिलजवार, मंजिरी अंत्रोळीकर, स.हि.ने. मुख्याध्यापिका नीता येरमाळकर, पर्यवेक्षक मुकुंद गिरी, ल.कि. प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका जयश्री राठोड, ज.रा.चंडक बालक मंदिरच्या मुख्याध्यापिका सोनाली सोनाळे आदी मिरवणुकीत सहभागी होते.



**कला पथकांचे असे सादरीकरण**

- विविध आकर्षक डावांचे लेझीम पथक.
- आकाशाला गवसणी घालणारे ध्वजपथक.
- सामूहिक कलाविष्कारांने नटलेले झांज .
- जनजागृती करणारे घोषणा पथक.
- समाज प्रबोधन करणारे घोष फलक.
- मिरवणुकीचे आकर्षण ठरलेले ढोल पथक.

सरस्वतीची प्रतिमा आणि पुष्पगुच्छ देऊन पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

आनंदी वातावरणात सर्वांचा लाडक्या गणपती बाप्पाला पुढच्या वर्षी लवकर येण्याचे आवाहन करत निरोप देण्यात आला. संस्थेच्या उपाध्यक्ष रेवती कुलकर्णी यांच्याकडून प्रसाद दिला गेला. मिरवणुकी दरम्यान विद्यार्थ्यांच्या विविध पथकांनी कला गुणांचे सादरीकरण केले.



## शिवसेना उबाठा व मनेसेच्यावतीने सोन्या मारुती गणरायांचे पूजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

शहरातील मानाचा सोन्या मारुती गणरायांचे पुजन शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्यावतीने गुरुवारी करण्यात आले.

यावेळी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते पुरुषोत्तम बरडे यांनी सोन्या मारुती मंडळाच्या कार्याचे कौतुक करताना म्हणाले की, माझ्या लहानपणापासुन मंडळाचे कार्य जवळुन पाहत आलोय. हिंदू-मुस्लिम एकोप्याचं प्रतिक या मंडळात पहायला मिळतंय अशी भावना त्यांनी व्यक्त केली. गणरायांच्या पूजणानंतर मंडळाचे प्रमुख विनायक महिंद्रकर यांच्या हस्ते सर्व नेते पदाधिकाऱ्यांचा सोन्या मारुती गणरायांची प्रतिमा, महावस्त्र देऊन सत्कार करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय दासरी, अस्मिता गायकवाड, प्रताप चव्हाण, संतोष पाटील, महेश धाराशिवकर, विजय पुकाळे, सुरेश जगताप, संतोष केंगनाळकर, लहु गायकवाड, महेश गवळी, सत्तार सय्यद, प्रशांत इंगळे, महादेव कोगनुरे, जैनोद्दीन शेख, जितेंद्र टेंभुर्णीकर, अमर कुलकर्णी, अभिषेक रंपुरे, संतोषकुमार घोडके, प्रसाद कुमठेकर, सागर मळगे, अभिषेक इरकल यांची उपस्थिती होती.

## मुळेगाव तांड्यावरील ऑपरेशन परिवर्तन हॉल येथे गणपतीची पुजा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

सोलापूर ग्रामीण पोलीस यांनी सोलापूर ग्रामीण जिल्हयात चोरून अवैधरित्या गावंठी हातभट्टी दारू गाळणा-या इसम व त्यांना मदत करणा-या महिलांना अवैध गावंठी दारूच्या व्यवसायापासुन परावृत्त करून त्याचेकरीता इतर व्यवसाय सुरू करण्याच्या अनुषंगाने काही उपाय योजना राबवुन अवैध हातभट्टी दारू व्यवसायाकडे आकर्षित होऊ नये या करीता ''ऑपरेशन परिवर्तन'' मोहीम सुरू केली आहे. त्या मोहीमेअंतर्गत मौजे मुळेगाव तांडा (ता.दक्षिण सोलापूर) येथे चोरून अवैधरित्या गावंठी हातभट्टी/दारू गाळणाच्या व्यवसाय करणाऱ्या पुरूषांना मदत करणाऱ्या महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

मौजे मुळेगाव तांडा येथील ग्रामपंचायतीच्या बाजुस असलेल्या बहुउद्देशीय सभागृहच्या ठिकाणी ऑपरेशन परिवर्तन हॉल उभारले आहे. या हॉलच्या ठिकाणी महिलांनी शिलाईचा व्यवसाय सुरू केला असून त्या हॉलच्या ठिकाणी महिलांनी गणपतीची मुर्तीची बसविली आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी मौजे मुळेगाव तांडा येथील ऑपरेशन परिवर्तन हॉलच्या ठिकाणी भेट देऊन तेथे महिलांनी बसविलेल्या गणपतीची पुजा व आरती करून प्रकल्पाच्या अनुषंगाने महिलांच्या समस्या जावुन घेतल्या. त्या समस्या दुर करणे करीता प्रभारी अधिकारी, सोलापूर तालुका, पोलीस ठाणे व संबंधीतांना मार्गदर्शन करून त्यांना योग्य त्या सूचना दिल्या.

महिला करीत असलेल्या उद्योगाची वाढ करणे करीता प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले आहे. यावेळी तालुका, पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी राहुल देशपांडे, सहायक पोलीस निरीक्षक सोमनाथ कदम, सहायक पोलीस निरीक्षक स्वामी, श्रेणी उपनिरीक्षक फैयाज बागवान, पोलीस नाईक असिफ शेख, बोरामणी दुरक्षेत्रा कडील पोलीस अंमलदार, पाटील व मुळेगाव तांडा येथील महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

## आमदार कल्याणशेट्टी व आ.कोठे यांनी घेतले मुख्यमंत्र्यांच्या घरातील बाप्पांचे दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

आमदार देवेंद्र कोठे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय बंगल्यातील गणपती बाप्पांचे दर्शन घेतले.

गणेशोत्सवानिमित्त राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी व सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी भेट घेतली. आमदार देवेंद्र कोठे यांचे चिरंजीव श्रीविष्णुराजसोबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ कॉलद्वारे संवाद साधत शुभेच्छा दिल्या. अवघ्या आठ वर्षांच्या श्रीविष्णुराजसाठी खरोखरच हा अविस्मरणीय सुवर्णक्षण ठरला.

यावेळी गणपती बाप्पांचे दर्शन घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विविध विषयांवर चर्चा केली. याप्रसंगी वर्षा बंगल्यावर केंद्रीय नागरी विमान वाहतूक व



सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचीही भेट घेऊन सोलापूर - मुंबई तसेच सोलापूर - तिरुपती, सोलापूर - बंगलोर विमानसेवेबाबत सकारात्मक चर्चा केली. गणपती बाप्पांचे दर्शन घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत विविध विषयांवर चर्चा केली. ययावेळी माजी नगरसेवक गुरुशांत धुत्तरगांवकर, भाजपा सोशल मीडिया प्रमुख अभिषेक चिंता, अक्कलकोटचे अतुल कोकाटे, सिद्धू सुतार आदी उपस्थित होते.



## भक्तिमय वातावरणात जय श्रीराम मित्र मंडळाचा महाप्रसाद सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

जय श्रीराम मित्र मंडळ (श्रीराम प्रतिष्ठान), जुना दत्त मठ, घोंगडे वस्ती, भवानी पेठ सोलापूर यांच्या वतीने महाआरती व महाप्रसादाचा सोहळा भक्तिमय वातावरणात पार पडला.

यावेळी भाजपा शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, माजी सभागृह नेते सुरेश पाटील, जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरज मुलानी, पोलीस उपनिरीक्षक बामणे, अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेचे सोलापूर उपनगरिय शाखेचे अध्यक्ष विजय साळुंखे, कांचन फाउंडेशन संस्थापक सुदीप चाकोते, श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, डिजिटल मीडिया संघटनेचे अध्यक्ष विजयकुमार बाबर, तसेच भाजपा उत्तर मध्यवर्ती मंडळ अध्यक्ष दत्तात्रय बडगु, वैभव गंगणे उपस्थित होते.

## सुशीलामाता पवार यांचे निधन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. ५ सप्टेंबर-**

बाळे श्रीकृष्णश्रम येथील सद्गुरू सुशीलामाता कृष्णात पवार (वय ८९) यांचे शुक्रवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. हजारो भक्तांना नामस्मरणाने दीक्षा देणारे सद्गुरू अण्णा महाराज पवार यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात चार मुली, तीन मुले, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. श्री सद्गुरू अण्णा महाराज पवार आणि सद्गुरू सुशिलामाता पवार यांचे सोलापूर, पुणे, मुंबई या ठिकाणी मोठ्या प्रमाणात शिष्यगण आहेत. शनिवार ६ सप्टेंबर रोजी दुपारी एक वाजता बाळे येथील चंडक हायस्कूलच्या पाठीमागील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.










# 'ज्ञानप्रबोधिनी'च्या रिंग अन् बर्ची नृत्यासह संबळवादनाने वेधले लक्ष

- ढोल ताशांच्या निनादात गणरायाला भावपूर्ण निरोप; महापालिका आयुक्त डॉ. ओंबासेंच्या हस्ते विसर्जन पूजा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.५ सप्टेंबर-**

येथील ज्ञानप्रबोधिनीच्या गणरायाचे आज दि.५ सप्टेंबर रोजी ढोल-ताशांच्या निनादात, संबळवादनातील लेझीमच्या तालात, रिंगनृत्य, बर्चीनृत्याने सोलापूरकरांना खिळवून ठेवत, 'पुढच्या वर्षी लवकर या' च्या जयघोषात दिमाखदार मिरवणूकीने विसर्जन झाले. माहपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या हस्ते श्री गणेशाचे पूजन करण्यात आले. रुद्रमुनी चौक, अंत्रोळीकर नगर येथून सायंकाळी ५ वाजता मिरवणुकीस सुरुवात झाली. यावेळी सहकार्यवाह डॉ. अमोल गांगजी, विश्वस्त बसवराज बिराजदार, सीए श्रीरंग कुलकर्णी, मुख्याध्यापिका प्रवीणाताई काळे, जयेशभाई पटेल आदि मान्यवर उपस्थित होते.

मिरवणुकीला रुद्रमुनी चौक, अंत्रोळीकर नगर रस्ता येथून सुरूवात होऊन पुष्पस्नेह लॉन्स-गुरुद्वारा- सीएसबी बँक - वर्ल्ड ऑफ वंडर गेम मार्गे सायंकाळी ६.३० वाजता चैतन्य टेक्नो स्कूलच्या पुढील चौकात गणेशाची समारोपाची आरती करण्यात आली. त्यानंतर भावपूर्ण रीतीने 'पुढच्या वर्षी लवकर या'च्या गजरात श्री गणेशांचे विसर्जन झाले.

मिरवणूकीत आठवी व दहावीतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी लक्षवेधी बर्ची नृत्य केले. सातवी व नववीतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी संबळाच्या साथीने लेझमीचे डाव खेळले. सहावीच्या मुलींनी रिंगनृत्यातून आपली लवचिकता दाखवली तर मुलांनी काष्ठ संचलनातून तोल सावरण्याचे कसब दाखवले. शिशु अध्यापिका विद्यालयातील छात्र अध्यापिकांनी टाळ नृत्यातून श्रीगणेशाचे स्मरण केले. किशोर विकासातील विद्यार्थ्यांनी कराटेच्या तडाख्यातून आपली तडफ दाखवली. या सर्वांना युवक युवतींच्या ढोल, ताशा, झांज यांच्या दणदणीत तरीही सुश्राव्य निनादाची साथ होती. मिरवणुकीचे आयोजन व संचालन युवक-युवती विभागाने केले. मिरवणूक प्रमुख, युवक विभाग सदस्य आयुष चोरमोले यांनी नियोजन केले.

# रविवारी रात्री दहा ते दीडपर्यंत असणार खग्रास चंद्रग्रहण

## संपूर्ण भारतात दिसणार | दुपारी साडेबारापासून लागणार वेध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

यंदाच्या संवत्सरातील खग्रास चंद्रग्रहण भाद्रपद पौर्णिमेदिवशी दि. ७ सप्टेंबर रोजी रविवारी आहे. संपूर्ण भारतात दिसणारे हे ग्रहण रात्री ९ वाजून ५७ मिनिटांनी सुरु होऊन रात्री १ वाजून २७ मिनिटांनी संपणार असल्याची माहिती पंचांगकर्ते मोहन दाते यांनी दिली.

ते म्हणाले, 'रात्री ९ वाजून ५७ मिनिटांनी सुरू झालेल्या या ग्रहणाची रात्री ११ वाजता खग्रास अवस्था सुरु होईल. या वेळेस पूर्ण चंद्रबिंब झाकले जाईल आणि रात्री १२ वाजून २३ मिनिटांनी पुन्हा चंद्रकोर दिसू लागेल. १ तास २३ मिनिटे खग्रास अवस्था राहणार आहे. उत्तररात्री १ वाजून २७ मिनिटांनी ग्रहण संपेल व पूर्ण चंद्रबिंब दिसू लागेल. भारतासह संपूर्ण आशियाखंड, अफ्रिका खंड, संपूर्ण युरोप, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, नॉर्वे या प्रदेशात ग्रहण दिसेल.' हे ग्रहण रात्रीच्या दुसऱ्या प्रहरात सुरु होत असल्याने दुपारी १२ वा. ३७ मिनिटांपासून ग्रहण मोक्षापर्यंत ग्रहणाचे वेध पाळावेत. वेधकाळात स्नान, देवपूजा, नित्यकर्मे, जप, श्राद्ध ही कर्मे करता येतील. वेधकाळात भोजन निषेध आहे म्हणून अन्नपदार्थ खाऊ नयेत, मात्र वेधकाळात इतर आवश्यक असे पाणी पिणे, मलमूत्रोत्सर्ग, झोप घेणे हे करता येईल. लहान मुले, वृद्ध, आजारी, अशक्त व्यक्ती आणि गर्भवतींनी ७ सप्टेंबरच्या संध्याकाळी ५:१५ पासून ग्रहणाचे वेध पाळावेत. ग्रहण पर्वकाळ म्हणजे रात्री ९:५७ ते उत्तररात्री १:२७ या काळात पाणी पिणे, झोपणे, मलमूत्रोत्सर्ग ही कर्मे करु नयेत. आधी करून घ्यावीत किंवा ग्रहण मोक्षानंतर करावीत असे दाते यांनी सांगितले.

### खग्रास चंद्रग्रहणामुळे श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या नित्योपचारात बदल

**पंढरपूर :** खग्रास चंद्रग्रहण दि. ०७ सप्टेंबर रोजी २०२५ असल्याने श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या नित्योपचारामध्ये बदल करण्यात येणार आहे. यादिवशी रात्री ९.५७ वा. ते १.२७ वाजेपर्यंत ग्रहणाचा कालावधी आहे. ग्रहणाचे वेध दुपारी १२.३७ वाजले पासून सुरू होत असल्याने दुपारचा पोशाख व धुपारतीच्या वेळेत कोणताही बदल होणार नाही. दरम्यान रात्री



९.५७ वाजता ग्रहण स्पर्श झाल्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस व मंदिरातील इतर परिवार देवतेस चंद्रभागा नदीचे पाणी आणून स्नान घालण्यात येणार आहे. तसेच ग्रहण सुटेपर्यंत म्हणजे रात्री १.३७ वाजेपर्यंत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन सुरू राहणार आहे. ग्रहण सुटल्यानंतर ग्रहण सुटल्याचे स्नान चंद्रभागे नदीचे पाणी आणून घालण्यात येणार असून, मोक्ष झाल्यानंतर रात्री २.00 वाजेपर्यंत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन सुरू राहील व रात्री २.00 वाजेनंतर शेजारती करण्यात येणार आहे. शेजारतीनंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची विश्रांती पहाटे ५.00 वाजेपर्यंत राहणार आहे. त्यामुळे दिनांक ८ सप्टेंबर रोजी काकड आरती पहाटे ५.00 नंतर सुरू होईल व त्यानंतर नेहमीप्रमाणे नित्यपूजा होऊन दर्शन सकाळी ६.३० वाजेपर्यंत सुरू होईल याची भाविक भक्तांनी नोंद घ्यावी असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## ▶▶ महत्वाचे...

### चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील महिला जखमी

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर -**

चारचाकी वाहनाच्या धडकेने दुचाकीवरील महिला जखमी झाली. याबाबत पार्वती शिवकुमार संख (वय ५६, रा. अरिहंत अपार्टमेंट, भवानी पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन सोमशेखर बसवराज वाळीखंडी (रा. चडचण, जि. विजयपूर, कर्नाटक) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी पार्वती संख या त्यांच्या एमएच १३ ईएच १५३५ क्रमांकाच्या दुचाकीवरून बलिदान चौक येथून जात होत्या. त्यावेळी सोमशेखर वाळीखंडी यांनी त्यांच्या ताब्यातील चारचाकी वाहन क्र. केएस २९ एम ८०७० ने दुचाकीला समोरून जोरदार धडक दिली. यामध्ये पार्वती संख या खाली पडून जखमी झाल्या. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### गेंट्याल टॉकीजजवळून ५० हजारांची दुचाकी लंपास

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर -**

शहरातील गेंट्याल टॉकीज परिसरातील फुटपाथवर पार्क केलेली ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरट्याने चोरून नेली. याबाबत श्रीनिवास शिवशंकर कल्लुर (रा. लष्कर, उत्तर सदर बझार, मौलाली चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३१ ऑगस्ट रोजी सकाळी दहाच्या सुमारास त्यांची एमएच १३ सीडी १२११ क्रमांकाची दुचाकी ही गेंट्याल टॉकीजजवळील फुटपाथवर पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

### घरगुती कारणातून किटकनाशक औषध केले प्राशन

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

घरगुती कारणातून विषारी औषध प्राशन केल्याची घटना मंद्रुप परिसरात शुक्रवारी रात्री १२.३० वाजता उघडकीस आली. ५४ वर्षीय व्यकतीला उपचाराकरीता शासकीय रुग्णालयात



दाखल केले आहे. बनसिध्द मलकारी कुमठाळे (वय ५४, रा. मंद्रुप ता द सोलापूर) असे व्यक्तीचे नाव आहे. बनसिध्द हे शुक्रवारी रात्री त्यांच्या मंद्रुप येथील घरी होते. तेथे त्यांनी अज्ञात कारणातून पिकावर मारण्याचे किटकनाशक औषध प्राशन केले. त्यात त्यांना त्रास होऊ लागल्याने मध्यरात्री २.१५ वाजता पुतण्या महेश याने शासकीय रुगणालयात दाखल केले. मंद्रुप परिसरात शुक्रवारी रात्री १२.३० वाजता उघडकीस आली असून या घटनेच नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# विसर्जनासाठी अडीच हजार पोलिसांचा बंदोबस्त

▶ १२५ अधिकारी, १४०० अंमलदार; शनिवारी मार्गात बदल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

सोलापूर शहरात सुमारे १२०० मंडळांनी यंदा गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली असून, शनिवारी (ता. ६) मध्यवर्ती मंडळांच्या मिरवणुका निघणार आहेत. मिरवणुकांसाठी शहरात अडीच हजार पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. मिरवणुका डीजेमुक्त होण्यासाठी पोलिसांनी यापूर्वीच आदेश काढले आहेत. त्यामुळे यंदाची मिरवणूक डीजेमुक्त करण्यासाठी पोलिसांचे प्रयत्न असणार आहेत.



सोलापूर ग्रामीणमध्ये लहान-मोठ्या दोन हजार ७६७ गणेशोत्सव मंडळांनी यंदा गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली आहे. तर घरगुती दीड लाख मूर्तींची प्रतिष्ठापना झाली आहे. मिरवणुकांसाठी ग्रामीणमध्ये पोलिसांचा १२०० पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. त्यात ८१ अधिकारी व १०२१ अंमलदारांचा समावेश आहे. पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी देखील जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार मिरवणुका डीजेमुक्त काढण्याच्या सक्त सूचना केल्या आहेत. आवाजाची मर्यादा ओलांडल्यास पोलिसांकडून संबंधित मंडळाच्या पदाधिकाऱ्यांवर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे. तर डीजेवाल्यावरही कारवाई होऊन साहित्य जागेवरच जप्त केले जाणार आहे. मिरवणुकीच्या वेळी पोलिस आयुक्त शहरात तर पोलिस अधीक्षक ग्रामीणमध्ये विविध ठिकाणी भेटी देतील.

सोलापूर-तुळजापूर रोडवरील हगलूरजवळील दगड खाणीत गणेशमूर्तींचे विसर्जन केले जाणार आहे. शहरातून गणेशमूर्ती घेऊन जाताना तो मार्ग सर्वांसाठी खुला ठेवल्यास अपघाताची शक्यता आहे. त्यामुळे सोलापूर-तुळजापूर महामार्गावरील हगलूरपर्यंतचा मार्ग शनिवारी (ता. ६) सकाळी सहापासून अन्य वाहतुकीसाठी बंद ठेवला जाणार आहे.

पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या नेतृत्वाखालील पोलिस बंदोबस्त...

- एकूण अधिकारी - १६२
- पोलिस अंमलदार - १,३७६
- होमगार्ड - १,०००
- एसआरपीएफ - १ कंपनी.

# पंढरपुरात ओबीसी समाज आक्रमक

## हैदराबाद गॅजेट फाडून शासनाचा निषेध

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.५ सप्टेंबर -**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे तसेच इतर वेगवेगळ्या मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी नुकतेच मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरू केले होते. दरम्यान याची दखल घेऊन शासनाने जरांगे यांनी केलेल्या मागण्यांपैकी सहा मागण्या मान्य केल्या आहेत. यामध्ये हैद्राबाद गॅझेटचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे ओबीसी समाजातील नेते आक्रमक झाले असून त्यांनी पंढरपुरात बुधवारी हैदराबाद गॅझेटचा जीआर फाडून शासनाचा निषेध केला.



मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी गेल्या अनेक वर्षापासून मनोज जरांगे पाटील आंदोलन करत आहेत.मात्र याकडे शासन दुर्लक्ष करत असल्यामुळे मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर आमरण उपोषण सुरु केले. या उपोषणास पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून लाखो मराठा बांधव मुंबई येथे दाखल झाले होते. यामुळे मुंबई येथे मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. याचा परिणाम नागरिकांच्या जनजीनवनावर झाला होता.वाहतूक विस्कळीत झाली होती. अखेर शासनाने उपोषणाची दखल घेऊन मनोज जरांगे-पाटील यांच्या सहा मागण्या मान्य केल्या आहेत. यामध्ये हैदराबाद गॅझेटचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे ओबीसी नेते आक्रमक झाले असून त्यांनी बुधवारी पंढरपुरात बैठक घेतली. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत महायुतीला धडा शिकविण्याचा निर्णय घेऊन हैद्राबाद गॅझेटचा जीआर फाडून शासनाचा निषेध करण्यात आला.

### यांची होती उपस्थिती

बैठकीसाठी ओबीसी नेते माऊली हळणवर, आबासाहेब खरे, संभाजी शिंदे, शंकर वाघमारे, विश्रांती भुसनर, राजकुमार हिवरकर, हरिभाऊ गावंधरे, अमोल डोके, प्रशांत माळी, पंकज देवकते, संजय लवटे यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते

# विनायक नगरात तरूणास फरशीने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर -**

तू ॲक्सीडेंट केल्याने आमची आई व काका मयत झाले असे म्हणून तरूणास फरशीने मारहाण करणाऱ्या पाचजणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राघवेंद्र लक्ष्मीकांत अकोले (वय ३५, रा. न्यु सुनिल नगर, एमआयडीसी, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन भारत चव्हाण, सुनिल चव्हाण व दोन चुलत भाऊ (रा. राम मंदीरजवळ, विनायक नगर, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विनायक नगरातील वंदे मातरम् चौकातून राघवेंद्र अकोले व त्याचा मित्र बसवराज असे मिळून १ सप्टेंबर रोजी दुपारी गाडीवरून जात होते. त्यावेळी भारत चव्हाण व इतरांनी मिळन राघवेंद्र यांस तु ॲक्सीडेंट केल्यामुळे आमची आई व काका मयत झाले आहेत असे म्हणून राग मनात धरून हाताने व लाथाबुक्क्याने मारहाण केली. यावेळी सुनिल चव्हाण याने तेथेच पडलेली फरशी हातामध्ये घेऊन राघवेंद्र याच्या डोक्यात समोरील बाजूस जोरात मारून जखमी केले. तसेच राघवेंद्र यांची वहिणी भांडण सोडवासोडवी करीत असताना सुनिल चव्हाण याने त्यांना गालावर चापट मारून शिवीगाळ केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार मुजावर पुढील तपास करीत आहेत.



# 'आनंदाचा शिधा' थांबल्याने सर्वसामान्यांतून नाराजी

- शिवभोजन थाळीच्या नवीन केंद्रांनाही दिला ब्रेक
- दिवाळीपासून ही योजना पुन्हा कार्यान्वित करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

आनंदाचा शिक्षा योजनेच्या माध्यमातून राज्यातील १ कोटी ६३ लाख लोकांना एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो चना डाळ आणि एक लिटर पामतेल मिळत होता. दरम्यान, हे कीटच देणे आता बंद केल्याने सर्वसामान्य नागरिकांतून नाराजीचा सूर निघत आहे. दरम्यान, दिवाळीपासून ही योजना पुन्हा कार्यान्वित करावी, अशीही अपेक्षा काही नागरिकांनी दैनिक तरुण भारतशी संवाद साधताना (दि. ०५) दिली.

राज्य सरकारची लोकप्रिय झालेली आनंदाचा शिधा योजना आता बंद करण्यात आली आहे. एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री असताना आनंदाचा शिधा ही योजना सुरू करण्यात आली होती. त्या माध्यमातून सणाच्या दिवशी राज्यातील १ कोटी ६३ लाख लोकांना याचा लाभ मिळत होता. यामुळे सर्वसामान्य लोकांना चार घास गोडधोडाचे मिळत होते. राज्यातील तिजोरीमध्ये असलेल्या खडखडाटामुळे ही योजना बंद करण्यात आल्याची चर्चा सध्या सुरू आहे. इतकेच नाहीतर लाडकी बहीण योजना कार्यान्वित झाल्यापासून सरकार आर्थिक दृष्ट्या अडचणीत आल्याचीही चर्चा सध्या ग्रामीण भागात ऐकायला मिळत आहे. या आनंदाचा शिधाच्या माध्यमातून रेशनकार्ड धारकांना अवघ्या १०० रूपयांत एक किलो रवा, एक किलो साखर, एक किलो चना डाळ आणि एक लिटर पामतेल मिळत होतं.




ही योजना आता बंद करण्यात आली आहे. नवीन सरकारच्या पहिल्याच अर्थसंकल्पामध्ये आनंदाचा शिधा योजनेला काहीशी बगल दिल्याचं दिसून आलं होतं. यावर काही चॅनल, प्रिंट माध्यमांनी टिकाही केली होती. या योजनेच्या माध्यमातून गणेशोत्सव, दिवाळी, गुढीपाडवा, छत्रपती शिवाजी महाराज जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अशा विविध सणांच्या निमित्ताने फक्त १०० रुपयांमध्ये पाच वस्तू दिल्या जायच्या. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा वाटत होता. अचानक ही योजना बंद झाल्याने सर्वसामान्य नागरिकांतून नाराजीचा सूर निघत आहे. आता शिवभोजन योजनेचे नवीन केंद्र देणेही बंद झाल्याने शासनाच्या तिजोरीत सध्या खडखडाटच दिसून येत असल्याची टिकाही विरोधकांकडून होवू लागली आहे. आनंदाचा शिधा योजना बंद होण्यामागे निश्चित असं कारण समोर आलं नाही. लाडकी बहीण योजनेला देण्यात आलेल्या निधीमुळे राज्याच्या तिजोरीमध्ये खडखडाट असून भविष्यात इतरही काही योजनांना ब्रेक लागण्याची शक्यता सध्या वर्तवण्यात येत आहे. आनंदाचा शिधा ही योजना राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागाकडून सुरू करण्यात आली होती. त्यासंदर्भात अनेक तक्रारी आल्या होत्या. आता ही योजनाच बंद करण्यात आली आहे.

### अर्थसंकल्पात बगल

**बगल :** गेल्या निवडणुकीत महायुतीकडून अनेक योजनांच्या घोषणा करण्यात आल्या होत्या. नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात अनेक योजनांना निधीचं वाटप करण्यात आलं आहे. त्यामध्ये आनंदाचा शिधा या योजनेला कुठेतरी बगल दिल्याचं दिसून आलं. त्यामुळे आनंदाचा शिधा ही योजना आता बंद झाल्याचं स्पष्ट आहे. यामुळे आनंदाचा शिधा बंद करण्यात आल्यानंतर राज्य सरकारवर विरोधकांनी टीका सुरू केली आहे.



# दमाणी विद्या मंदिराची डॉल्बीमुक्त विसर्जन मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

दमाणी विद्या मंदिराची श्री गणेश विसर्जन मिरवणूक डॉल्बी, डीजेमुक्त असून ढोल, ताशा व सनई या पारंपारिक वाद्यांच्या निनादाने भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. मिरवणुकीची सुरुवात माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ पुणेचे प्रबंधकारिणी सदस्य सचिन भट्टड यांच्या हस्ते गणेश पूजन व श्रींच्या आरतीने झाली.

यावेळी विद्यार्थ्यांनी लेझीम पथकाने बहारदार सादरीकरण केले. सदर गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया' या जयघोषाने सारा परिसर दुमदुमून गेला व भक्तिमय वातावरण निर्माण झाले. श्री गणेश विसर्जन मिरवणूक दमाणी विद्या मंदिर, बाळीवेस, चाटीगल्ली, मंगळवार पेठ पोलीस चौकी मार्गे बलिदान चौक येथे विसर्जित झाली. गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या अशा घोषणा देऊन लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. यावेळी संस्थेचे अध्यक्ष कालिदास जाजू, सचिवा मंगल काबरा, सहसचिव उज्ज्वल तापडिया उपस्थित होते. मिरवणुकीच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निर्मला भोसले, पर्यवेक्षक राहुल इंगळे, शितल बंडगर मार्गदर्शन लाभले. मिरवणुकीतील लेझिम पथकाचे संचलन शितलकुमार शिंदे, जयकर ठोंबरे यांनी केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी - १२००

**फुलें पाने नेतो वेश्येसी उदंड ।**
**ब्राम्हणासी खांड देऊं नेदी ।।**

ज्याला स्वत:चा खरा परिचय झाला तो व्यक्ती संसारात राहूनही संसारापेक्षा वेगळा असतो. अर्थात त्याला संसार करताना संसारातील ईर्षा, द्वेष, मोह, मत्सर, काम, क्रोध, लोभ, अहंकार आदिची बाधा होत नाही. कारण तो स्वत:ला संसारापेक्षा वेगळा समजतो. याच्या उलट जो व्यक्ती स्वत:च्या खऱ्या परिचयापासून दूर राहतो, त्याला देह म्हणजे सर्वस्व वाटते.



देहाला मी म्हणणारा हा व्यक्ती संसाराला आपल्यापासून वेगळा करू शकत नाही. असा व्यक्ती सहजरित्या संसाराच्या जाळ्यात अडकतो. त्याचे हे अडकणे त्याला आपोआप ईर्षा, द्वेष, मत्सर, काम, क्रोध, आप-पर, अहंकार, आदीमध्ये अडकवते. मानवतेच्या या शत्रूंना आपले समजणारा माणूस चांगल्या, वाईटाची परीक्षा करण्यात अपयशी ठरतो. अर्थात त्याला चांगल्या वाईटातला फरक कळत नाही. स्वार्थापोटी तो वाईटाला चांगले आणि चांगल्यास वाईट समजण्यात मागे राहत नाही. काम हा मुळात चांगला असला तरी अनीतीच्या मार्गाने कामपूर्ती करणे वाईट असते. पण यालाही हा माणूस योग्यच समजतो. आणि वेश्येसाठी वाट्टेल ते खर्च करण्याची तयारी ठेवतो. तिच्यासाठी पान, फुल, हार किंवा आणखी इतर कांही देण्यात आनंद मानतो आणि जो समता, बंधुता, निस्वार्थ प्रेम, कर्तव्य आदिची जोपासणूक करतो अशा ब्राम्हणास (ज्याचे मन ब्रम्हस्वरुप झाले आहे, ज्याला सर्व समान वाटतात असा व्यक्ती) खांडही देत नाही. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, फुलें पानें नेतो वेश्येसी उदंड । ब्राम्हणसी खांड देऊ नेदीं ।।.

काम हा जीवनाचा अविभाज्य भाग असला तरी तो केवळ तेव्हाच योग्य आहे, जेव्हा तो नीतीच्या मार्गाने पूर्ण केला जातो. पण कामाला जेव्हा अनीतीच्या मार्गाची जोड मिळते तेव्हा तो भयंकर वाईट असतो. कामाची ही भयंकरता स्वत:चा व समोरच्याचा संसार उध्दवस्त करण्यास कमी पडत नाही. वेश्येअधीन झालेला व्यक्ती तिच्यासाठी वाट्टेल ते करतो. अशा व्यक्तीला चांगल्या गोष्टीचा विसर पडतो. आपली व आपल्या कूवर्तनामुळे कुटूंबाची समाजात बदनामी होत आहे, याचेही कामपिपासूला ध्यान राहत नाही. अशा वेश्यामग्न लोकांमुळेच समाजात एड्ससारख्या महाभयानक रोगाला पुष्टी मिळत आहे, अनेकांच संसार तुटत आहेत, असे म्हटले तर चुकीचे होणार नाही. पोटच्या लेकरांवरही याचा विपरीत परीणाम होतो, समाजावरही विपरीत परिणाम होत असतो, हे अशा लोकांनी लक्षात ठेवायला हवे. असो, महाराजांच्या अभंगांचे अर्थ हे आमच्या अल्पबुध्दीचे आहेत. त्यामुळे चूक भूल सुजाण वाचकांनी पदरात घ्यावी.

**जय जय राम कृष्ण हरी ।। जय जय राम कृष्ण हरी ।।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस, |
| दि. ६ सप्टेंबर २०२५ | अनंत चतुर्दशी |
| विक्रम संवत् २०८२ | सार्वजनिक गणेश विसर्जन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - भाद्रपद | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्दशी (२५.४१) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - वर्षा | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - धनिष्ठा (२२.५५) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - अतिगंड (११.५१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - गर (१४.३१) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

# प्रत्येकाला मनात शिक्षकांबद्दल आत्मीयता हवी

## डॉ. विजयकुमार उबाळे; बसवेश्वर विचार मंचच्यावतीने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

शिक्षक म्हणजे देश निर्माण करणारे व्यक्तिमत्व होय. शिक्षक हे देशाचे निर्माते असतात. प्रत्येकाच्या मनात शिक्षकांबद्दल आत्मीयता, श्रद्धा असावी. सध्याच्या शिक्षण पद्धतीत अमुलाग्र बदल झालेले असून शिक्षकांनी देखील शिकवण्याची पद्धत बदलणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन दयानंद शिक्षण संस्थेचे प्रशासक, माजी प्राचार्य डॉ. विजयकुमार उबाळे यांनी केले.



बसवेश्वर विचार मंचच्यावतीने आयोजित ३१व्या आदर्श शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व उपक्रमशील शाळा पुरस्कार वितरण समारंभाप्रसंगी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. बलिदान चौक येथील जैन स्थानकात आयोजित या पुरस्कार वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. उबाळे हे होते. यावेळी व्यासपीठावर सहस्त्रार्जुन शिक्षण संस्थेचे चेअरमन राजू भुमकर, जीएम ग्रुपचे संस्थापक बाळासाहेब वाघमारे, जैन स्थानकवासी संघाचे अध्यक्ष पदम राका, चंद्रकांत वानकर, कोल्हापूर खंडपीठाचे ॲड. आशुतोष पुरवंत, शैलजा पुरवंत, नागेश्वरी भागानगरे, कृषीकन्या आदिती पुरवंत उपस्थित होते. यावेळी महादेव वांगीकर, दशरथ गुरव, ज्योती मनीष बांगर, डॉ. मनीषा पाटणे, प्राचार्य अंबादास पांढरे, जय कबाडे, रिजवान शेख, चेतन महाजन, अण्णाराया तुप्पद, विनोद सावंत, भाग्यश्री करकमकर, रेणुका राजे, संजीवनी तगवाले, कावेरी द्यावरकोंडा, संतोष साळुंके, शिक्षकेतर कर्मचारी सुनीलकुमार चलवादी, रमेश रायचूरकर, धर्मण्णा सादूल यांचा फेटा, शाल, श्रीफळ, माळ, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी दैनिक तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे, आसावा प्रशालेचे मुख्याध्यापक संतोष हंपे, डॉ. अंजली शिरसी, प्रा.डॉ.आनंद चव्हाण, प्रमोद कुनगुलवार, बलिदान चौक तरुण मंडळाचे अध्यक्ष अरुण लातूरे यांचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी मंचचे अध्यक्ष मल्लेश पुरवंत यांनी स्वागत केले. सचिन मोरे यांनी प्रास्ताविक केले. अतिथींचा सत्कार शैलजा पुरवंत, नागेश्वरी भागानगरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी पदम राका, राजू भूमकर यांनीही विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन दत्तात्रय खंडेराव यांनी केले. प्रकाश आळंगे यांनी आभार मानले.

## उत्तम ब्रम्हचर्य

जैन धर्मातील दशलक्षण धर्म हा आत्मशुद्धीचा आणि जीवनशिस्तीचा महामार्ग मानला जातो. त्यामधील एक महत्त्वाचा धर्म म्हणजे उत्तम ब्रह्मचर्य धर्म. ब्रह्मचर्य म्हणजे इंद्रियनिग्रह, शुद्ध विचार, संयम आणि आत्मनियंत्रण. दशलक्षण धर्मामध्ये उत्तम ब्रह्मचर्य धर्म हा एक अत्यंत महत्त्वाचा आणि श्रेष्ठ धर्म सांगितला आहे. ब्रह्मचर्य म्हणजे मन, वचन आणि शरीर यांचे पावित्र्य राखणे. आजच्या वेगवान आणि




आकर्षणप्रधान जीवनशैलीमध्ये हा धर्म पाळणे कठीण असला तरी अत्यावश्यक आहे. 'ब्रह्मचर्य' या शब्दाचा अर्थ केवळ शारीरिक संयम एवढाच नसून मनाची, वाणीची आणि कृतीची शुद्धता आहे.

**ब्रह्मचर्यं हि ते सर्वं ब्रह्मणे दत्तमक्षयम्।**
**शीलं हि परमं दानं ब्रह्मचर्यं च साधनम।।**


याचा अर्थ असा की, ब्रह्मचर्य हेच सर्वोत्तम दान आहे आणि आत्मसाधनेसाठी तेच एक मुख्य साधन आहे.

**यः करोति निरासक्तं ब्रह्मचर्यं समाहितः।**
**तस्यात्मा विमलं तेजो दीपवत् प्रकाशते।।**

जो मनःपूर्वक ब्रह्मचर्याचे पालन करतो, त्याच्या आत्म्याचे तेज दिव्यासारखे प्रकट होते. उत्तम ब्रह्मचर्य धर्म म्हणजे केवळ देहाचा संयम नव्हे तर विचार, वाणी आणि कृती या तिन्ही पातळ्यांवर पवित्रता व शुद्धता जपणे. या धर्माचे पालन केल्यास जीवनात संतुलन, शांती आणि अध्यात्मिक प्रगती निश्चित होते. खरे तर, उत्तम ब्रह्मचर्य हेच जीवनाचे अलंकार आहे.

**- प्रा. अजित देवसाळे**
९८५००९२९७५

## माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा वाढदिवस वृक्ष लागवडीने साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, नेहरू नगर या महाविद्यालयात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा वाढदिवस महाविद्यालयात वृक्षारोपण करुन साजरा करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुभाष चंद्राम चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण, महाविद्यालयाच्या प्राचार्या कलाश्री देशपांडे, प्रा.नागनाथ पुदे, प्रा.विजय तरंगे, सुनील राठोड, अनिल राठोड इतर स्टाफ व सर्व विध्यार्थी यांनी सुशीलकुमार शिंदे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## सांगोल्यात जश्ने ईद-ए-मिलादुन्नबीचा उत्सव

**सांगोला, दि. ५ सप्टेंबर-**

सांगोल्यात हजरत मोहम्मद पैगंबर (स्वल.) यांच्या १५०० व्या जयंतीनिमित्त शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी लबैक या रसूलअल्लाह, नारे तकबीर अल्लाह हू अकबर, सरकार की आमद मरहबा या घोषणा मुस्लिम बांधवांनी दिल्या. शाही जामा मस्जिदेतून निघालेली ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गावरून पार पडली. या जुलुसात खा. धैर्यशील मोहिते-पाटील, आ.बाबासाहेब देशमुख, माजी आ. दिपकआबा साळुंखे-पाटील, डॉ. अनिकेत देशमुख यांची उपस्थिती लाभली. मस्जिदीत सलातो सलाम, फातीहाखानी पार पडली आणि पवित्र कुराण पठण पूर्ण केलेल्या मुला-मुलींचा सत्कार करून लंगरचे वाटप करण्यात आले. जुलुस यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष शौकतभाई खतीब, उपाध्यक्ष आयाजबाबा मणेरी, खजिनदार अ.कादिर इनामदार, सचिव समीर खाटीक यांनी परिश्रम घेतले.



## लोकमंगल बँकेत कर्ज योजनेचा प्रारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

लोकमंगल को-ऑपरेटिव्ह बँक, प्रधान कार्यालयात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना व प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना कर्ज योजनेचा शुभारंभ बँकेचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी श्री गणेश प्रतिष्ठापना लोकमंगल बँकेचे चेअरमन सुभाष देशमुख यांच्या हस्ते करण्यात आली.

CMEGP व PMEGP या शासनाच्या पोर्टलवर लोकमंगल बँकेचे नाव समाविष्ट झाले असून जिल्हा उद्योग केंद्राच्या माध्यमातून राज्य शासनाच्या भक्कम सहकार्याने समस्त जिल्ह्यातील तरुण /तरुणींनी या योजनेचा लाभ घेऊन उद्योजक बनावे, त्याकरिता लोकमंगल बँक सर्व प्रकारचे सहकार्य करेल, असे आवाहन आमदार देशमुख यांनी केले. या कर्ज योजनेचा लाभ देणारी राज्यातील पहिली सहकारी बँक म्हणून लोकमंगल बँक सध्या कार्यरत आहे.

याप्रसंगी बँकेचे संचालक देवानंद चिलवंत, प्रल्हाद कांबळे, नरेंद्र काटीकर, अभिजित टाकळीकर, सिद्धार्थ सर्जे, सतिश लामकाने, सौरभ अंबुरे, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेशसिंह बायस उपस्थित होते.

## वरद गणपती प्रतिष्ठानतर्फे आरोग्य तपासणी शिबीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

जुना विडी घरकुल येथील चाकोते विणकर नगरातील वरद गणपती प्रतिष्ठानच्या वतीने रक्तदान, मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आलेले आहे.



पिंडीपोल हॉस्पिटलच्यावतीने घेण्यात आलेल्याा मोफत आरोग्य तपासणी शिबीरात ७५ रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. व डॉ. किरण किर्तन यांचे आदित्य आय केअर ॲन्ड लेसर सेंटरच्यावतीने ५० रुग्णांचे मोफत नेत्र तपासणी करण्यात आले तर सिध्देश्वर ब्लड बैंकेच्यावतीने १२ जणांनी शिबीरात रक्तदान केले. या कार्यकमाची सुरूवात श्रींची आरतीने करण्यात आली. कार्यकमास अध्यक्ष बालाजी म्हंता, उपाध्यक्ष राम बोगा व राजू द्यावरकोंडा, सेक्रेटरी प्रथमेश माडा, खजिनदार: वेंकटेश बिंगी, सहखजिनदार सुधीर बोगा, पूजा प्रमूख भारत बोगा, सभासद बाळू नामा, व्यंकटेश मुटकिरी, अशोक मुटकिरी, बालाजी गाजूल, नवीन मुटकिरी, श्रीकांत मुटकिरी, विनायक गुडा, रोहित मादास, श्रेयश आडम, रजित लकापती उपस्थित होते.



## गुरु हीच खरी दिशा दाखवणारी शक्ती : डॉ. मल्लिकार्जुन महस्वामीजी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

गुरु हीच खरी दिशा दाखवणारी शक्ती आहे. विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचे महान कार्य तो करतो. तंत्रज्ञानाच्या प्रगती सोबतच विद्यार्थ्यांमध्ये मूल्य संस्कार रुजवण्याचे काम शिक्षकच करतात, प्रतिपादन काशी जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांनी केले.

शिक्षक दिनानिमित्त श्री बृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिक्षकांच्या सत्कार समारंभा प्रसंगी आशीर्वचन करताना ते बोलत होते. प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी श्री वीरतपस्वी गुणवंत पुरस्कार प्राप्त शिक्षक भानुदास राठोड, सुमंगला माशाळे, सच्चिदानंद लाळसंगी, स्वाती पोलके व गुणवंत शिक्षकेतर कर्मचारी सिद्धेश्वर कस्तुरे यांचा सपत्नीक सन्मानचिन्ह, स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन महास्वामीजींच्या हस्ते गौरव करण्यात आला. त्याचप्रमाणे विविध संस्था व संघटनेच्या वतीने मिळालेल्या आदर्श पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. सचिव शांतया स्वामी यांनी प्रास्ताविक केले तर मुख्याध्यापक नंदकुमार धाये यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. संस्थेच्या वतीने शिक्षकांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.



## सोशल मिडीयाला साधन बनवा : डॉ. दफेदार

### मौलाना आझाद पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत व पारितोषिक वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

डिप्लोमा इंजिनिअरिंगची तीन वर्षे म्हणजे फक्त अभ्यासक्रम पूर्ण करण्याची वेळ नाही, तर ही तुमच्या आयुष्याचा पाया रचण्याची सुवर्णसंधी आहे. अनेकदा आपण अभ्यास केवळ परीक्षेसाठी करतो, पण खरी गोष्ट अशी आहे की ज्ञान आणि कौशल्य हीच आपली खरी ताकद असते. ही तीन वर्षे योग्य रीतीने वापरली, तर ती तुमच्या करिअरची मजबूत शिडी ठरू शकतात. सोशल मिडीयाचा वापर करिअर घडवण्यासाठी करा, करिअर उद्ध्वस्त करण्यासाठी नाही. समाजासाठी चांगले विचार पसरवण्यासाठी करा, सोशल मिडीयाला गुलाम न होता, साधन बनवा, असे प्रतिपादन ऑर्किड कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. जे. बी. दफेदार यांनी व्यक्त केले.

होटगी येथील मौलाना आझाद पॉलिटेक्निक येथे महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ आणि पुरस्कार वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

कार्यक्रमास सोलापूर जिल्हा बार असोसिउशनचे उपाध्यक्ष ॲड. रियाज एन. शेख यांची उपस्थिती होती. मान्यवर व संस्थेचे अध्यक्ष अमिरोद्दिन शेख व उपाध्यक्ष नासिर अहमद खलिफा यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. यानंतर सर्व विभागांमधून प्रथम तीन क्रमांक पटकावणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य पाहुण्यांच्या हस्ते गौरवण्यात आले. यावेळी सचिव नुरुशा सय्यद उपस्थित होते.

## आता खेळाडूंनाही करिअर करता येईल

आपला मुलगा डॉक्टर व्हावा, इंजिनियर व्हावा, वकील व्हावा, सीए व्हावा असे अनेक पालकांना वाटते. परंतु नामवंत खेळाडू व्हावा, असे वाटत नाही. परंतु हा मुद्दा खोडून काढण्यासाठी महाराष्ट्र शासनाने बळ दिले आहे. महाराष्ट्र शासनाबरोबरच रेल्वे, पोलीस व महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ यांनीही थेट नोकरी देऊन खेळाडूंनाही करिअर आहे हे सिद्ध केले आहे.

विद्यार्थी खेळाकडे आकर्षित होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दहावी, बारावीतील विद्यार्थ्यांना ग्रेस गुणासह शासकीय नोकरीत पाच टक्के आरक्षणही या अगोदरच दिले आहे. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पदक विजेत्यांना शासकीय सेवेत थेट नोकरीही देऊन खेळाडूंना प्रोत्साहन दिले आहे. आंतरराष्ट्रीय पदक विजेत्यांना प्रथम श्रेणीची नोकरीही दिली आहे.

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त नुकत्याच पुण्यात झालेल्या एका समारंभात महाराष्ट्र शासनाने आंतरराष्ट्रीयसह राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील ३३१ पदकविजेत्यांना गौरवित राष्ट्रीय क्रीडा दिन जल्लोषात साजरा केला. विशेष म्हणजे या खेळाडूंवर रोख पारितोषिकांची बरसातही केली. यात सोलापूर शहर व जिल्ह्यातील सहा खेळाडूंचा समावेश आहे.

यातील गाथा खडके वगळता सर्व खेळाडूंना रेल्वेने नौकरी दिली आहे. खेलो इंडियासह इतर खेळाडूंच्या बक्षीसांसाठी ५८ कोटीचा अतिरिक्त निधी देण्याची क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांची मागणीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या भाषणात मंजूर केली. खेळाडूंच्या कष्टाला व योगदानाला दिलेली दाद असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री पवार यांनी या कार्यक्रमात केले होते आणि हे खरेच आहे. त्यांनी खेळाडूंना सतत प्रोत्साहन देण्याचे कार्य केले आहे व करीत आहेत. नुसती घोषणाच नाही तर त्याची अंमलबजावणीही करण्यास ते विसरत नाहीत.

२०२४-२५ या वर्षातील १३ आंतरराष्ट्रीय, ३१८ राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव राष्ट्रीय क्रीडा दिनी करण्यात आला. सलग दुसऱ्यांदा राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांचे द्विशतक झळकावून महाराष्ट्राच्या खेळाडूंनी अभिमानास्पद कामगिरी केली. उत्तराखंड येथे फेबुवारीत झालेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत महाराष्ट्राने ५५ सुवर्ण, ७० रौप्य व ७६ कांस्य अशी एकूण २०१ पदके पटकावून सहभागी राज्यांमध्ये प्रथम क्रमांक संपादन केला. या स्पर्धेतील ३१८ पदकविजेत्या खेळाडूंचा गौरविले. सुवर्ण, रौप्य व कांस्य पदकविजेत्यांना अनुकमे रू. ७, ५ व ३ लाख तर



**स्ट्रेट ड्राईव्ह**
**अजितकुमार संगवे**
**मो.9881133103**

मार्गदर्शकांना ५०, ३०, २० हजार रुपये अशी रोख बक्षिसे देण्यात आली. राज्याच्या क्रीडा धोरण-२०१२ नुसार,राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू व मार्गदर्शकांना रु.२८.७० कोटी रकमेची रोख पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

राष्ट्रीय क्रीडा दिनी महाराष्ट्र शासनाबरोबरच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने सोलापूर शहर व जिल्ह्यातील अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेतील पदक प्राप्त खेळाडूनाही रोख पारितोषिक देऊन गौरविले. सोलापूरच्या समृद्धी स्पोर्ट्स क्लबनेही खेळाडूंना क्रीडा सेवा पुरस्कार देऊन रोख पारितोषिकाने गौरविले. त्यामुळे खेळाडूंसह पालकानीही आता खेळाकडे करिअर म्हणून पाहिले पाहिजे आणि शासनमान्य खेळात आपल्या पाल्याला खेळाकडे आकर्षित होण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे.

**सोलापूरचे हे खेळाडू झाले लखपती**

डायव्हिंग : ऋतिका श्रीराम (७), ईशा वाघमोडे (८), ओम अवस्थी (३), वॉटरपोलो : ऋतुराज बिडकर (५, सर्व सोलापूर), खो खो : रामजी कश्यप (७, वेळापूर), धनुर्विद्या : गाथा खडके (१४, टेंभूर्णी).

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेत शिक्षक दिन साजरा

**अक्कलकोट, दि. ५ सप्टेंबर-**

गौडगाव बु!! येथील श्री गुरु सिद्ध मल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत शिक्षक दिन साजरा करण्यात आले. प्रारंभी भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न, प्राध्यापक डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे प्राध्यापक श्रीशैल सावळतोट यांच्या हस्ते पूजन पुष्पमाला अर्पण करूनअभिवादन करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी, मृत्युंजयया सालीमठ, गजानन उडचण, विश्वराध्य स्वामी उपस्थित होते.



### सिद्धेश्वर शाळेत शिक्षक दिन साजरा

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

श्री सिद्धेश्वर प्राथमिक व श्री सिद्धेश्वर पूर्व प्राथमिक शाळा यांच्या संयुक्त विद्यमानाने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून ॲड. नंदिनी किणीकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका शिल्पा वाले उपस्थित होत्या. शिक्षकांमधून सहशिक्षिका पल्लवी गंगनळी यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष विशाल कामूर्ती यांनी केले तर पालकांच्या मनोगत मधून अश्विनी वलेकर यांनी शिक्षकांबद्दलचे विचार व्यक्त केले. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते सर्व शिक्षकांचा भेटवस्तू व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. पालक शिक्षक संघाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सूत्रसंचालन पालक सदस्य शारदा खरात यांनी तर आभार अश्विनी उपासे यांनी मानले.



### कुचन प्रशालेत शिक्षक दिन साजरा

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

कुचन प्रशाला, कनिष्ठ महाविद्यालय व व्यवसाय शिक्षण विभागात शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रास्ताविक प्राचार्य युवराज मेटे यांनी केले. वर्ग प्रतिनिधींच्या हस्ते सर्व शिक्षकांचा पेन व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर इयत्ता १० वी अ चा विद्यार्थी हर्षवर्धन भोसले याने मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन विद्यार्थीनी स्वरांजली मंजुळे व गीतांजली वाकोडे यांनी केले. याप्रसंगी उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक मधुकर धर्मसाले,पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगु ,प्रणिता सामल, मल्लिकार्जुन जोकारे उपस्थित होते.



### वेळापूर जि.प. मुलींच्या शाळेस शिक्षणाधिकाऱ्यांनी दिली भेट

**वेळापूर, दि. ५ सप्टेंबर-**

वेळापूर येथील जि.प. मुलींच्या शाळेस शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी भेट देऊन विविध शैक्षणिक कामकाजाचा आढावा घेतला. प्रारंभी मुख्याध्यापक युन्नूस तांबोळी यांनी शिक्षणाधिकाऱ्यांचे स्वागत केले. शाळेतील विविध शैक्षणिक बाबीचा आढावा घेत असताना प्रामुख्याने निपुण भारत, शालेय पोषण आहार, सायकल बँक, गणवेश वाटप, तक्रार पेटी, सीसीटीव्ही, यासंदर्भात माहिती घेतली. शाळेतील संगणक कक्षास भेट दिली. यावेळी शिक्षिका किरण घाडगे यांनी सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. शिक्षक नितीन चव्हाण यांनी शाळेसंदर्भात माहिती दिली. यावेळी केंद्रप्रमुख बापूसाहेब नाईकनवरे उपस्थित होते. यावेळी महादेव घोगरे, प्रज्ञा इंगोले, आसरा जैन, कष्णदेव तुपे, प्रविणकुमार पांगे, कविता आवटे उपस्थित होते.

### वडवळ नागनाथ मंदिरात डॉ. प्रदिपसिंग राजपूत यांच्या हस्ते आरती

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

श्री क्षेत्र वडवळ श्री नागनाथ महाराज मंदिर येथे डॉक्टर प्रदीपसिंग राजपूत सोलापुर जिल्हा सरकारी वकील यांच्या हस्ते श्री नागनाथ



महाराजांची आरती करण्यात आली. श्रीकृष्ण मित्र मंडळ वडवळ याच्या श्रीगणेशाची आरती व दर्शन यावेळी सर्वमान्यवरांचा श्री नागनाथ महाराज मंदिर तसेच श्री कृष्ण मित्र मंडळ यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. याप्रसंगी विठ्ठल नारायनपेटकर, शाहू धनवे, शिवकुमार शिवपूजे, राहुल शिवपूजे, लखन लेंगरे, नेमिनाथ पडवलकर, रमेश गवळी, राजू हौशेट्टी मित्र परिवार उपस्थित होते.

# मराठा आरक्षणाचा जिल्ह्यातील ५८ गावांना फायदा

**स्वातंत्र्यानंतरही सुमारे एक वर्ष भोगलेय पारतंत्र्य**

**तभा वृत्तसेवा,**
**वाळूज, दि. ५ सप्टेंबर-**

१५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला, तरीही १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत तत्कालीन मराठवाड्यातील व आताच्या सोलापूर जिल्ह्यातील ५८ गावे पारतंत्र्यात होती. २३ जानेवारी १९५० रोजी ही ५८ गावे सोलापूर जिल्ह्यात समाविष्ट झाली. पूर्वी निजामशाहीत असलेल्या व नंतर प्रशासकीयदृष्ट्या सोलापूर जिल्ह्यात समावेश केलेल्या या ५८ गावातील मराठा समाजाला आता कुणबी प्रमाणपत्र मिळण्याबाबत आशा पल्लवीत झाल्या आहेत.

कुणबी प्रमाणपत्र काढण्यासाठी मराठा समाजातील अर्जदारासंबंधी, स्थानिक समिती आवश्यक ती चौकशी करून अहवाल सादर करणार आहे. त्यावर सक्षम प्राधिकारी या चौकशीच्या आधारे अर्जदारास कुणबी जातीचा दाखला देण्याचा निर्णय घेतील. हैदराबाद गॅझेटियरचा जीआर काढण्यात आल्याने त्याची तातडीने अंमलबजावणी होणार आहे. त्यासाठी सरकारने गावपातळीवर त्रिसदस्यीय समितीही गठीत केली जाणार आहे. ती समिती कुणबी प्रमाणपत्रासंबंधी निर्णय घेणार आहे. यासंबंधी नेमकी कार्यपद्धती काय असेल याची माहिती शासनाच्या जीआरमध्ये सविस्तरपणे दिली आहे.



गरजवंत आणि गोरगरीब मराठ्यांसाठी आरक्षणाचा लढा उभारणारे मनोज जरांगे यांनी उभारलेला लढा हा समाजासाठी महत्त्वाचा आहे आंदोलनामध्ये शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही मनोज जरांगे यांच्या सोबत ठामपणे उभे राहू. हैद्राबाद गॅझेटिअर मधील नोंदी विचारात घेऊन प्रमाणपत्र देण्यासाठी कार्यपध्दती विहित करण्याबाबत तसेच सातारा गॅझेट याचाही निर्णय लवकर घ्यावा इतिहास, दस्तऐवज आणि समाजातील वास्तव या तिन्ही गोष्टी सरकारने पाहायला हव्यात. मराठा व कुणबी वेगळे आहेत असा केवळ कायदेशीर कागदोपत्री विचार करून समाजाच्या पिढ्यानपिढ्यांच्या संघर्षाकडे दुर्लक्ष करणे म्हणजे अन्याय आहे. जर एखाद्या गावात गॅझेटियरमध्ये कुणबी नोंद सापडली, तरी त्या नोंदीच्या आधारे गावातील मराठा कुटुंबांना कुणबी प्रमाणपत्र मिळू शकते. यामुळे गावातील अनेक मराठा कुटुंबांना ओबीसी आरक्षणाचा लाभ मिळण्याची शक्यता आहे

**-सुधीर मोटे, मराठा आंदोलनकर्ते, वाळूज**

**कुणाला कुणबी सर्टिफिकेट मिळणार?**

मराठा समाजातील भूधारक तसेच भूमिहीन, शेतमजूर किंवा एखाद्याची शेती कसणाऱ्या व्यक्तींकडे शेत जमिनीची मालकी असल्याचा, ती कसत असल्याचा पुरावा असावा. तो नसल्यास त्यांना दिनांक १३ ऑक्टोबर १९६७ पूर्वीचे वास्तव्य दाखवणारे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागणार आहे. कुळातील किंवा नातेसंबंधातील एखाद्या व्यक्तीला कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास आणि त्याने अर्जदारासंबंधी प्रतिज्ञापत्र दिल्यास, स्थानिक समिती आवश्यक चौकशी करून अहवाल सादर करेल. त्यावर सक्षम प्राधिकारी या चौकशीच्या आधारे अर्जदारास कुणबी जातीचा दाखला देण्याचा निर्णय घेतील.

**हैदराबाद गॅझेट म्हणजे नेमकं काय?**

हैदराबाद गॅझेट म्हणजे १९१८ साली तत्कालीन हैदराबाद निजामशाही सरकारने जारी केलेला आदेश होय. त्याकाळी हैदराबाद संस्थानामध्ये मराठा समाज बहुसंख्य होता आणि त्यांची सत्ता व नोकऱ्यांमध्ये उपेक्षा होत असल्याची नोंद होती. म्हणून निजाम सरकारने मराठा समाजाला हिंदू मराठा या नावाने शैक्षणिक आणि नोकरीत आरक्षण (काही प्रमाणात राखीव जागा) देणारा आदेश काढला. हैदराबाद निजामशाहीने १९१८ मध्ये काढलेल्या आदेशात मराठा समाजाला शैक्षणिक आणि नोकरीतील आरक्षण दिले होते. आजही मराठा समाजाच्या आरक्षण लढ्यात याचाच ऐतिहासिक पुरावा म्हणून हवाला दिला जातो. त्यावेळी हैद्राबाद स्टेट होतं. यात मराठवाड्यातील पाच जिल्ह्यांचा समावेश होता. औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी आणि उस्मानाबाद हे जिल्हे होते. यांच्या जनगणनेत जातींची नावे आणि त्यांची लोकसंख्या नमूद केलेली आहे. यात मराठा कुणबी या जातींचा उल्लेख स्वतंत्र नसून एकत्रित केला गेला आहे. म्हणून हैंद्रबाद गॅझेटचा आधार घेत आहोत. १९०९ चे हैदराबाद स्टेटचे गॅझेटियर बनवले गेले. त्याचे संपादन मिर्झा मेहदी खान आणि हैद्राबादचे माजी अर्थ सचिव सी.विलमोट यांनी केले. तत्कालीन ब्रिटिश सरकार आणि हैदराबाद संस्थानाने १९३१मध्ये जातनिहाय जनगणना केली होती. सध्याच्या महाराष्ट्राच्या भौगोलिक क्षेत्रातील मराठा आणि कुणबी समाजाची लोकसंख्या अनुक्रमे १६.२९ टक्के आणि ७.३४ टक्के होते. १९३१ ते १९४५ या कालावधीत बहुतांश कुणबी समाजाने स्वतःला कुणबी म्हणणे बंद करून मराठा असे संबोधण्यास सुरुवात केली.

**निजामशाहीतील सोलापूर जिल्ह्यातील तालुकानिहाय ५८ गावे**

**मोहोळ** - आष्टे, पोफळी, विरवडे (खु), चिखली, यल्लमवाडी, पवारवाडी, बोपले, एकुरके, मनगोळी, भैरववाडी, वाळूज, देगाव, घोरपडी, डिकसळ, खुनेश्वर, भोयरे, मसलेचौधरी.

**उत्तर सोलापूर** - भागाईवाडी, कौठाळी, साखरेवाडी, कळमण,पडसाळी, वांगी, इंचगाव, रानमसले, बीबीदारफळ, शिवणी, नान्नज, मोहितेवाडी, गरलाचीवाडी (या गावाचा उल्लेख अद्याप स्पष्ट झाला नाही)

**बार्शी तालुका**- शेलगाव, श्रीपतपिंपरी, मानेगाव (थो.), भोईजे, शेंद्री,वांगरवाडी, इर्ले, राऊळगाव, मुंगशी (वा.) सासुरे, तावरवाडी, बोरगाव.

**माढा**- अंजनगाव, जामगाव, केवड, चव्हाणवाडी, हटकरवाडी, कापसेवाडी, धानोरा, बुद्रुकवाडी, पंचफुलवाडी, खैराव, रिधोरे, उपळाई, सुलतानपूर.

**दक्षिण सोलापूर तालुका** -वरळेगाव

## यशस्वीतेसाठी शिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे : ॲड. भाकरे



**लोकमंगल पतंसंस्थेच्या सांगोला शाखेत कार्यक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.५ सप्टेंबर-**

मानवी जिवनातील निश्चित ध्येय साध्य करणेसाठी व यशप्राप्तीसाठी शिक्षकांचे मार्गदर्शन अतिशय मोलाचे असून या माध्यमातूनच विकसित भारताचे स्वप्न साकार होणार असल्याचे प्रतिपादन माजी नगरसेवक ॲड.गजानन भाकरे यांनी केले.

येथील लोकमंगल नागरी सह.पतसंस्था शाखेतर्फे शिक्षकदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. शिक्षकदिनाचे औचित्य साधून पतसंस्थेच्या वतीने संजय पैलवान, चंद्रशेखर लिगाडे, संजय काळे, सुवर्णा सपताळ, निशा बनसोडे या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित शिक्षकांनी पतसंस्थेचे कौतुक करून आभार मानले.

शाखाधिकारी दत्तात्रय दिवसे यांनी सुत्रसंचालन केले. विभागीय अधिकारी वैभव लांबोरे यांनी आभार मानले.

## पंढरपुरात संत कान्होपात्रा नाटक; रविवारी प्रेक्षकांना विनामूल्य प्रवेश

**पंढरपूर, दि. ५ सप्टेंबर-**

नटसम्राट बालगंधर्वांनी लोकप्रिय केलेल्या व विठ्ठल भक्तीवर आधारित संत कान्होपात्रा या संगीत नाटकाचा प्रयोग पंढरपूर शहरात रविवार दि. ७ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. पुण्याच्या बालगंधर्व संगीत रसिक मंडळातर्फे आरती मंडप प्रांगणात सायंकाळी ५ वाजता सादर केला जाणारा हा प्रयोग रसिक प्रेक्षकांसाठी विनामूल्य खुला आहे.

संत ज्ञानेश्वर, चोखामेळा, कान्होपात्रा यांच्या अभंगाची यात रेलचेल असून शहरी व ग्रामीण अशा दोन्ही विभागांमध्ये पसंतीस उतरलेले नाटक असा याचा परिचय आहे. या नाटकात चोखोबाची भूमिका सूरगंधर्व सुरेश साखवळकर हे साकारणार असून अस्मिता चिंचाळकर या कान्होपात्रेची भूमिका करणार आहेत. त्या शिवाय बालगंधर्वांच्या नातसून अनुराधा राजहंस, रवींद्र कुलकर्णी, श्रद्धा सबनीस मालिकाफेम चिन्मय पाटसकर, अवंती बायस, निरंजन कुलकर्णी, विवेक काटकर व अजित भालेराव हे अन्य भूमिका साकारणार आहेत. या कलाकारांना ऑर्गनवर हर्षल काटदरे, तबल्यावर प्रशांत पांडव व्हायोलिनवर प्रमोद जांभेकर तर पखवाजवर प्रसाद भांडवलकर साथ संगत करणार आहेत. नाट्यप्रयोगाचा लाभ रसिकांनी घ्यावा, असे आवाहन माजी आमदार प्रशांत परिचारक, पंढरपूर अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेचे मुख्याधिकारी उमेश विरधे व मराठी पत्रकार संघ महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष किरण जोशी यांनी केले आहे.

## रमेश मोरे दिग्दर्शित 'आदिशेष' चित्रपटाचे शूटिंग पूर्ण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

राष्ट्रीय पुरस्कार विजेते दिग्दर्शक रमेश मोरे हे 'आदिशेष' या आगामी मराठी चित्रपटावर काम करीत आहेत. 'आदिशेष' हे चित्रपटाचे शीर्षक उत्कंठावर्धक असून, त्यात मांडलेला विषय आजवर कधीही समोर आलेला नाही.या चित्रपटाचे शूटिंग नुकतेच पूर्ण झाले आहे. अष्टमी एन्टरटेन्मेंटच्या बॅनरखाली निर्माते प्राध्यापक दत्तात्रय सांगोरे यांनी 'आदिशेष' ची निर्मिती केली आहे. पहिलीच निर्मिती असलेल्या प्राध्यापक दत्तात्रय सांगोरे यांनी 'आदिशेष'द्वारे निर्मितीक्षेत्रात पदार्पण केले आहे. दिग्दर्शनासोबतच कथा, पटकथा, संवाद व गीतलेखन रमेश मोरे यांनीच केले आहे. दिग्दर्शक रमेश मोरे यांनी आजवर लेखक-दिग्दर्शकाच्या रूपात १९ चित्रपट बनवले असून, तीन चित्रपटांची निर्मितीही केली आहे. 'आदिशेष'मध्ये त्यांनी पुन्हा एकदा एक वेगळा विषय मांडण्याचे आव्हान स्वीकारले असून, दिग्गज कलाकारांच्या साथीने हा चित्रपट पूर्णही केला आहे.या चित्रपटात अरुण नलावडे, प्रणव रावराणे, आराधना देशपांडे, वैशाली भोसले, सुचित जाधव, सुरेश वाडिले आदी कलाकार आहेत. सिनेमॅटोग्राफी राजा फडतरे यांनी केली असून, संगीत आणि पार्श्वसंगीत अमेय नरे आणि साजन पटेल यांनी दिले आहे. संकलन अभिषेक म्हसकर यांचे असून वेशभूषा यशश्री मोरे, तर रंगभूषा सतिश भावसार यांनी केली आहे. ध्वनी अरुण चेन्नवार यांची असून, केशभूषा रसिका गुरव यांची आहे. धीरज सांगोरे या चित्रपटाचे निर्मिती प्रबंधक असून यशश्री मोरे कार्यकारी निर्मात्या आहेत.

## गुरुवर्य बापूसाहेब झपके स्मृती समारोहानिमित्त वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

**सांगोला, दि.५ सप्टेंबर-**

सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष कै. गुरुवर्य चं.वि.तथा बापूसाहेब झपके यांच्या ४४ व्या स्मृतीसमारोहानिमित्त सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेज येथे मंगळवार दि. ९ सप्टेंबर रोजी स.११ वा. इ.८ वी ते १० वी, इ.११ वी व १२ वी या गटासाठी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे व बुधवार दि.१० सप्टेंबर रोजी इ.५ वी ते ७ वी गटासाठी तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर वक्तृत्व स्पर्धेचे विषय, बक्षीसे व इतर नियमावली संदर्भात संपूर्ण माहिती संस्थेच्या www.stspm.org या वेबसाईटवरती दिली आहे. तसेच वक्तृत्व स्पर्धा नाव नोंदणीसाठी https://docs.google.com/forms/d/e/1FIpQLSe0IVrTCWHškwXTšmh5cov-TazCR27C2USEtnMfudGQ6ZQ9w/viewform?usp=header या गुगल लिंगचा वापर करून जिल्ह्यातील जास्तीत जास्त माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्यु.कॉलेजचे प्राचार्य अमोल गायकवाड यांनी केले आहे.




## कोळगाव धरण १०० टक्के भरले; धरणग्रस्त संघटनेतर्फे जलपूजन

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. ५ सप्टेंबर-**

करमाळा तालुक्यातील पूर्व भागातील शेतकऱ्यांची जल वरदायिनी सीना कोळगाव धरण १०० टक्के भरले आहे. त्याबद्दल सीना कोळगाव धरणग्रस्त संघटनेचे वतीने हभप बाळासाहेब पाटील व श्री क्षेत्र मडी येथील श्री.सीताराम महाराज यांच्या हस्ते विधिवत पूजा अर्चा करून जल पूजन करण्यात आले.



यावेळी सीना कोळगाव धरणग्रस्त संघटनेचे अध्यक्ष व श्री.मकाई सह साखर कारखान्याचे संचालक सतीश नीळ, अंबऋषी भील, विठ्ठल लोहार, केरा वायकुळे, दत्ता साळुंके, गणेश नीळ, अविनाश जगताप, पद्मसिंह शिंदे,आबा रोकडे, आजिनाथ जगताप, उमराव रोकडे, दिपक जगताप, कालिदास नीळ, विजय ननवरे,राजेंद्र भील, राजेंद्र ननवरे, दत्ता गाडे, लालू भील, विशाल जाधव, दादा जागते, शिवाजी कांबळे, भगवंतराजे नीळ, शंभूराजे रोकडे, कृष्णा शिंदे आदी जण उपस्थित होते.

## मंद्रूपमध्ये गणेशोत्सवाची नवी ओळख : रक्तदान शिबिरांनी निर्माण केला आदर्श

**तभा वृत्तसेवा । प्रमोद जवळकोटे**
**मंद्रुप, दि. ५ सप्टेंबर-**

गणेशोत्सव सण म्हणजे पारंपरिक सजावट, मिरवणुका आणि धार्मिक कार्यक्रम यांचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळतो. मात्र यंदाच्या गणेशोत्सवात मंद्रूप मधील गणेशोत्सव मंडळांनी समाजासाठी एक नवा आदर्श घालून दिला आहे. गावातील अनेक मंडळांनी रक्तदान शिबिरांचे आयोजन करून गणेशोत्सवाची वेगळीच ओळख निर्माण केली आहे.



श्री सेवालाल गणेशोत्सव क्रीडा व सांस्कृतिक मंडळ सेवालाल नगर - ५५ रक्तदाते, श्री महात्मा बसवेश्वर गणेशोत्सव मंडळ - १०३ रक्तदाते, छत्रपती धर्मवीर संभाजी गणेशोत्सव मंडळ - ६३ रक्तदाते, न्यू बंजारा मध्यवर्ती क्रीडा व गणेशोत्सव तरुण मंडळ - ६० रक्तदाते, श्री गणेश तरुण व बाल मंडळ साठे गल्ली - एकूण १०६ रक्तदाते ( २६ महिला ) अशा प्रकारे एकट्या मंद्रूपमध्ये शेकडो नागरिकांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने रक्तदान करून समाजकारणाशी घट्ट नाळ जोडली.

रक्तदान शिबिरांत केवळ पुरुषच नव्हे तर महिलांनीही मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. अनेक महिलांनी घरगुती जबाबदाऱ्या सांभाळून शिबिरात येऊन रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्या महिलांनी सांगितले की, आमच्यामुळे कुणाचा जीव वाचणार असेल तर यापेक्षा मोठं समाधान दुसरं नाही. मंद्रूपमध्ये सामाजिक जाणिवेतून रक्तदान शिबिरांची परंपरा आधीपासूनच दिसून येते. जयंती, वाढदिवस तसेच नुकतेच मंद्रूप पोलीस ठाण्याच्या वतीने झालेल्या शिबिरातही तब्बल साडेतीनशेहून अधिक रक्तदात्यांनी रक्तदान केले होते. या सातत्यामुळे गाव रक्तदान उपक्रमांचे केंद्रबिंदू बनत आहे. गणेशोत्सवाच्या उत्साहासोबत सामाजिक जाणिवा जोपासण्याचा आदर्श मंद्रूपातील गणेशोत्सव मंडळांनी यंदा घालून दिला आहे. गावातील तरुणाईचा सहभाग, नागरिकांचा प्रतिसाद आणि मंडळांची पुढाकार वृत्ती यामुळे गणेशोत्सवाची नवी ओळख अशी नोंद मंद्रूपच्या नावावर झाली आहे.

शंभरहून अधिक नागरिकांनी दिलेला प्रतिसाद आमच्यासाठी प्रेरणादायी ठरला. यात महिलांचाही उल्लेखनीय सहभाग होता. ही परंपरा पुढेही कायम ठेवण्याचा आमचा संकल्प आहे. विशेष म्हणजे, मंडळातील सदस्यांनी जोडीने रक्तदान करून आदर्श घालून दिला.

**नितीन खराडे, अध्यक्ष,**
**श्री गणेश तरुण व बाल मंडळ, साठे गल्ली**

गणपती बाप्पाची आराधना ही फक्त उत्सवापुरती मर्यादित न ठेवता, समाजहिताशी जोडावी हा आमचा उद्देश आहे. १०३ रक्तदाते पुढे आले हे पाहून आम्हाला समाधान मिळाले. रक्तदानातून जीव वाचवता येतो. या पेक्षा मोठं पुण्य दुसरं नाही.

**- म्हाळप्पा घाले, अध्यक्ष,**
**श्री महात्मा बसवेश्वर गणेशोत्सव मंडळ**

## प्राचीन भारतीय संस्कृती विद्या केंद्रातर्फे १५ दिवसीय शिबीर

**सोलापूर, दि. ५ सप्टेंबर-**

प्राचीन भारतीय संस्कृती विद्या केंद्र कोल्हापूर, जैन श्वेतांबर स्थानकवासी सं. र. संघ, लायन्स क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ८ सप्टेंबरपासून १५ दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्राचीन भारतीय संस्कृती विद्या केंद्राचे सचिव योगशिक्षक नवीन साळुंखे यांनी पत्रकार परिषदेत दिली. तुळजापूर वेस येथील जैन स्थानकात हे शिबीर होणार आहे. शिबिरात आचार्य नारायण गुरुजी यांचे मार्गदर्शन होणार आहे. या शिबिरात संपूर्ण शरिराचे शुध्दीकरण तसेच वात-पित्त-कफ यापासून मुक्ती, प्राणायाम, ध्यान-आहार, मुतखडा आदी व्याधींपासून मुक्ती याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. अधिक माहितीसाठी नवीन साळुंखे (७०२०४६७६९५), गौतम संचेती (९८२३११००४४) यांच्याशी संपर्क साधावा. या पत्रकार परिषदेस गौतम संचेती, सुकुमार सोनीग्रा, पुरुषोत्तम धूत, राजेंद्रकुमार रघोजी, नवीन सोनीमिंडे, अशोक छाजेड, पदमराज बंब उपस्थित होते.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



अकलूज : येथील गणेशनगर मधील वंदेमातरम गणेश उत्सव मंडळाने यावर्षी पंढरीची वारी हा तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचा देखावा केला आहे. (छाया: केदार लोहकरे, अकलूज)



## महत्त्वाचे



बार्शी येथील गणेशोत्सवातील देखावा...



### बार्शीत जिव्हाळा संस्थेतर्फे शिक्षकदिन

**बार्शी, दि.५ सप्टेंबर-**

बार्शी टेक्निकल हायस्कूल या ठिकाणी जिव्हाळा मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी त्या शाळेचे प्राचार्य टकले सर व त्यांचे सर्व शिक्षक सहकारी यांचा सत्कार जिव्हाळामागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले तसेच श्री जी.टी जाधव सर व नागेश जाधवर यांचा देखील जिव्हाळा मागासवर्गीय बहुउद्देशीय संस्थेचे ऑफिसमध्ये साजरा करण्यात आला यावेळी आबा धावारे निलेश खुडे राजू थोरात युवराज वाघमारे राहुल कांबळे श्याम शिंदे श्यामलाल कसबे हे मान्यवर उपस्थित होते



### ईद-ए-मिलाद निमित्त वेळापुरात मिरवणूक

**वेळापूर, दि. ५ सप्टेंबर-**

संपूर्ण जगाला शांती व समतेचा संदेश देणारे प्रेषित पैगंबर हजरत मोहम्मद सल्लाहो अलय हो वसलम यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने वेळापूर जुलूर कमिटीतर्फे मुस्लिम बांधवांच्या वतीने पारंपारिक पद्धतीने वेळापूर शहरातून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीस शाही मस्जिद येथून प्रारंभ झाला. सदर मिरवणुकीत घोडेस्वार, बगीचा उंट यांचा समावेश होता, बगीचा सुंदररित्या सजवण्यात आले होते. वेळापुरात मिरवणूक मार्गावर अनेक ठिकाणी मिठाई, पाणी, फळे आदींचे वाटप करण्यात आले. सदर मिरवणूक व्यापार पेठ, वटेश्वर मंदिर, अर्धनारी नटेश्वर मंदिर या म ार्गावरून येताच वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे तसेच प्रदीप सरवदे यांनी स्वागत केले. मिरवणूक पालखी चौक येथे येताच मिरवणुकीचे स्वागत अकलूज मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, संदीप माने देशमुख, कमलाकर माने देशमुख, भैया कोडग, विनायक चंदनशिव यांच्या वतीने करून मिरवणुकीमधील लहान मुलांना मुस्लिम बांधवांना ५० डझन केळीचे वाटप करण्यात आले. यावेळी मुस्लिम बांधव यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर मिरवणूक पेट्रोलपंप मार्गे अण्णाभाऊ साठे चौक येथे मुस्लिम बांधवांनी अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला.



### वखारिया विद्यालयात शिक्षक दिन साजरा

**बार्शी, दि. ५ ऑगस्ट-**

उपळे-दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांचा जन्म दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला. प्रारंभी कर्मवीर मामासाहेब जगदाळे आणि डॉ.सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. याप्रसंगी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांचा गुलाबपुष्प देवून सत्कार केला. अध्यक्षीय भाषण शंकर शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख रमेश लंकेश्वर यांनी केले. सूत्रसंचालन समृद्धी ठोंगे, प्रियदर्शनी पाटील यांनी केले. आभार सहशिक्षक आर. एस. दुलंगे यांनी मानले. कार्यक्रमासाठी एन.एन महाले, अनिल वैद्य, शिरीष साळुंके, पी.बी. काशीद, मकरंद जगदाळे, रोहिणी डोईफोडे, क्लर्क दादासाहेब धनके, सेवक वाघ, सुरवसे उपस्थित होते.

# निमगावच्या शंभू बैलाच्या अंत्यविधीला जमले हजारो चाहते

## बैलगाडा शर्यतीतील हिंदकेसरी होता शंभू

**तभा वृत्तसेवा । चंद्रकांत कुंभार**
**अकलूज, दि. ५ सप्टेंबर-**

बैलगाडी शर्यत विश्वातील हिंद केसरी असणारा, आपल्या विद्युत चपळाईने हौशी लोकांना वेड लावणारा निमगावचा शंभू ६५६५ याचे बुधवारी अचानक निधन झाले. त्याच्या अंत्यविधीसाठी माळिशरस तालुक्यातील हजारो प्रेमींनी हजेरी लावली. आज त्याचा तिसरा दिवसाच्या विधीलाही अनेक चाहते हजर होते.

निमगाव (ता.माळिशरस) येथील अण्णा मंडले यांच्या मालकीचा हा बैल अचानक मयत झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. अण्णा मंडले यांची आर्थिक परिस्थिती नसताना म्हणजे अगदी रहायला स्वतःच्या मालकीची जागा नाही, निमगाव गावठाणात राहूनही त्यांनी घरच्या गायीला जन्मलेल्या शंभुला जीवापाड जपले होते. केवळ ३७ महिन्यांचेच वय असलेल्या शंभूनेही २५ ते ३० मैदानातच मालकाचे





नाव महाराष्ट्रात केले. त्याने या क्षेत्रातील म हाराष्ट्र केसरी नंतर नुकताच दि.१७ ऑगस्ट रोजी माण तालुक्यातील विरकरवाडी येथे झालेल्या बैलगाडी शर्यतीत हिंद केसरी हा मानाचा किताब मिळवला होता. बैलगाडी शर्यतीतील नामवंत बैल सावकार, बकासुर, सोन्या यांच्या बरोबरच शंभू ६५ ६५ या बैलाचे नाव या बैलगाडा शर्यत विश्वात झाले होते. निमगाव येथीलच भारत वळकुंडे यांचा सावकार व मंडले यांचा शंभू ६५६५ ही जोड असेल त्या मैदानात इतर स्पर्धक क्रमांकाची अपेक्षा ठेवत नसत.

### जीवापाड प्रेम केले...

शंभू वर आमचे कुटुंबीयांनी जीवापाड प्रेम केले. त्यानेही कुठल्याही मैदानावर आमची मान खाली जाऊ दिली नाही. त्याचे जाण्याने आमचे कुटुंबाचेच नव्हे तर बैलगाडी क्षेत्राचे फार मोठे नुकसान झाले आहे. त्याने मिळवून दिलेले बक्षिसे, ट्रॉफी पाहूनच त्याची आठवण येत राहणार तुमचा घरातीलच सदस्य होता आम्ही त्याला नाही तर त्यांनी आम्हाला जगवले.

**- अण्णा मंडले, निमगाव**

शंभूची यशस्वी कारकीर्द पाहून या क्षेत्रातील अनेकांनी त्याची ४५ लाख रुपयांपर्यंत ची मागणी केली होती, मात्र मालक त्यास विकण्यास तयार नव्हते. शंभू ही पाय खुतून बसायचा, तो ही जायला तयार नसायचा. शर्यतीला जाण्याआधी घरापुढील देवाला गुडघे टेकून नमस्कार करायचा.

शंभूने दि. ३१ ऑगस्ट रोजी पेडगाव येथील मैदान गाजवून आल्यानंतर सायंकाळी व त्यानंतर २ दिवस मजेत घालवले. मात्र बुधवार दि. ३ सप्टेंबर रोजी त्यास अचानक रक्ताच्या उलट्या झाल्या. मंडले यांनी त्यासाठी पशू वैद्यकीय क्षेत्रातील नामांकित डॉक्टर आणले परंतू कुणाला त्याच्या आजाराचे निदान झाले नाही. अखेर सायंकाळी ५ च्या सुमारास त्याने आपल्या मालकाच्या घरी जीव सोडला.

शंभू च्या निधनाची बातमी या क्षेत्रातील हौशी लोकांत वाऱ्यासारखी पसरली. त्याच्या अंत्यविधीसाठी सुमारे ४ हजार लोक उपस्थित होते. बुधवारी रात्री ९.३० वा.मालकाच्या घरासमोरच त्याचा दफनविधी अत्यंत शोकाकुल वातावरणात करण्यात आला. आज शुक्रवारी शंभूचा तिसरा दिवस असल्याने मालक मंडले यांनी कालच आपल्या दारात या शंभूचे स्मारक उभारले आहे.



## भगवंत मंडळ जपतेय सामाजिक बांधिलकी दररोज एका समाजाकडून आरतीची परंपरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.५ सप्टेबर-**

येथील भगवंत गणेश तरूण मंडळाच्यावतीने सामाजीक बांधिलकी जपत दररोज सायंकाळी १८ पगड जातीतील बंधूंच्या हस्ते आरती करण्याची परंपरा जोपासली जात आहे.

आत्तापर्यंत दररोज माहेश्वरी, जैन, माळी, मराठा, मातंग, गुजराती, राजपूत आदी समाजातर्फे आरती करण्यात आली आहे. आज सर्व पत्रकार बांधवांच्या हस्ते श्री ची आरती संपन्न झाली. उद्या तृतीयपंथीयांच्या हस्ते संपन्न होणार आहे.

यावेळी मंडळाचे आधारस्तंभ सूर्यकांतजी देशमुख, अध्यक्ष सार्थक डुमने, उपाध्यक्ष कार्तिक गुरव, खजिनदार केदार भोसले, मार्गदर्शक उदय कुलकर्णी, मनोज बडवे, विशाल बुडूख, सुशील बडवे, अस्मित कुलकर्णी, प्रदीप सपनाईकर, उमेश ठोंबरे, प्रतिक कुलकर्णी, निखिल देव आदि उपस्थित होते.

## मराठा आरक्षणाचा मोहोळ शहरासह तालुक्यांत आनंदोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.५ सप्टेंबर-**

मराठा समाजाला आरक्षण देण्याचे मान्यता झाल्यानंतर मोहोळ शहरातील शिवाजी चौकासह तालुक्यातील अनेक गावांमध्ये फटाके फोडून पेढे वाटून आणि भगव्या अष्टगंधाची उधळण करून जल्लोष साजरा करण्यात आला .

मराठा आरक्षण योद्धा मनोज जरांगे-पाटील यांच्या मुंबईतील आझाद मैदानावरील उपोषणामुळे सरकारने आरक्षणाबाबत निर्णय घेतला. पाचव्या दिवशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने हैदराबाद गॅझेट लागू करण्यास तात्काळ सुरुवात तर मागण्यांसाठी वेळ घेत पूर्ण करण्याचे आश्वासन दिल्याचे भाजपा मोहोळ उत्तर मंडलाचे अध्यक्ष सतीश काळे यांनी सांगितले. सकल मराठा बांधवांनी पारंपारिक वाद्याच्या तालावर भगव्याची उधळण करत जल्लोष केला. मोहोळ शहरात श्री.



काळे, संतोष गायकवाड, शिवसेना उबाठाचे युवा नेते शिवरत्न गायकवाड, दत्तात्रय पासले, दिनकर डोंगरे, बंडू मुळे, गणेश भोसले, प्रवीण शिंदे, संजय काकडे, मनोज मांडवे, गणेश काळे, लक्ष्मण जाधव यांच्यासह अनेकजण सहभागी झाले होते.

तालुक्यातील गावागावत चौकाचौकांमध्ये सकल मराठा बांधवांनी पारंपारिक वाद्याच्या तालावर नाचत भगवी उधळण करत जय भवानी जय शिवराय, जरांगे दादा तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है, एक मराठा लाख मराठा, लढेंगे जितेंगे हम सब जरांगे, एकमेकास पेढा भरवत, आलिंगन देत जल्लोषासह घोषणाबाजी करत आनंद उत्सव साजरा केला. अनेकांनी आरक्षण योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्यासारखा समाजाला भक्कम नेतृत्व मिळाल्याच्या भावना व यक्त केल्या.

## रायगड भूषण श्रृती पाटील यांची विठूराया चरणी गायन सेवा समर्पित

**श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती आयोजित श्री गणेशोत्सव संगीत महोत्सवाला रसिकांचा प्रतिसाद**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ५ सप्टेंबर-**

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त प्रतिवर्षाप्रमाणे याही संगीत महोत्सव आयोजित करण्यात आलेला आहे. या श्री गणेशोत्सव संगीत महोत्सवामध्ये पाचवे पुष्प उदयोन्मुख गायिका आणि रायगड भुषण श्रृती पाटील यांनी गुंफले.

सुरुवातीला सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, मुकेश आणेचा आणि कलाकार यांचे हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. सुरुवातीलाच अभिजात शास्त्रीय संगीतामध्ये राग पूर्वा कल्याण





गायला त्यानंतर वारकरी संप्रदायाचा बीजमंत्र जय जय राम कृष्ण हरी ने सुरुवात करत उभा चंद्रभागे तिरी, अबीर गुलाल उधळीत रंग, देव देखिला देखिला, माझे माहेर पंढरी, पांडुरंगी नामी लागलिसी ध्यास आदी अभंगांची भक्तीमय बरसात करत अवघे गर्जे पंढरपूर या अभंगांनी कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रमामध्ये तितकीच सुंदर साथसंगत तबला अजीत लोहोर, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, हार्मोनियम भरत हेगडे तर टाळ माऊली पिसे आणि स्वरसाथ उषा पाटील, स्नेहा पाटील यांनी केली. सूत्रसंचालन विक्रम बिस्किटे यांनी केले. यावेळी पंढरपूर शहर, उपनगर तसेच पंचक्रोशीतील कलारसिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. संगीत महोत्सव यशस्वी करण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे कर्मचारी यांनी अधिक परिश्रम घेत आहेत. येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे सर्व सदस्य यांचे मार्गदर्शनाखाली आणि प्रभारी कार्यकारी अधिकारी सचिन इथापे, प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत आणि लेखाधिकारी मुकेश आणेचा यांच्या उपस्थितीत हा संगीत महोत्सव कार्यक्रम संपन्न होत आहे.

## निपुण अभियानांतर्गत वाफेगाव शाळेची तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**श्रीपूर, दि. ५ सप्टेंबर-**

वाफेगांव (ता.माळिशरस) येथील जि. प. शाळेस शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी निपुण महाराष्ट्र अभियानांतर्गत वाफेगाव जि. प. शाळेस भेट दिली.

याप्रसंगी मुख्यालय विस्तार अधिकारी राऊत, गटशिक्षणाधिकारी सुषमा महामुनी, नातेपुते केंद्र प्रमुख भरते, दिलिप ताटे मुख्याध्यापक दत्तात्रय पराडे व ग्रामस्थ उपस्थित होते. याप्रसंगी शिक्षणाधिकाऱ्यांच्या हस्ते संगणक कक्षाचे उद्घाटन करण्यात आले. यानंतर श्रवणी नवनाथ गोडसे (इ. ५ वी ) हिने स्त्री शिक्षणाचे महत्व दुर्गेश सखाराम गोडसे (इ. ३ री) याने स्वातंत्र्य या विषयावरील वक्तृत्वाने सर्वांची मने जिंकली. याबरोबरच तपासणी आलेल्या टीमने प्रत्येक वर्गा मध्ये जावून विद्यार्थ्यांनी केलेली वर्ग सजावट , लेखन हस्ताक्षर, संख्याज्ञान, इंग्रजी वाचन, विद्यार्थ्यांची शिस्त, प्रगती तसेच शाळेची गुणवत्ता पाहून सर्वांनी समाधान व्यक्त केले. यानंतर आदर्श शाळा वाघोली या शाळेस भेट देवून विविध उपक्रमाची परिसर स्वच्छता व विद्यार्थ्यींचे शिष्यवृत्ती परिक्षेतील यशाबद्दल विद्यार्थी शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय पराडे, शिक्षक कैलास ठोंबरे, श्रीकांत मिसळ यांचा शिक्षणाधिकारी शेख यांनी सत्कार केला.

# मॉन्टेग्युचा भोवत्या सांगोल्यात दाखल

## हिवाळी परदेशी पाहुण्यांचे स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ५ सप्टेंबर-**

मॉन्टेग्युज हॅरियर म्हणजेच मॉन्टेग्युचा भोवत्या या हिवाळी परदेशी पाहुण्या पक्षाचे सांगोल्यात नुकतेच आगमन झाल्याची माहिती सांगोला येथील वन्यजीव व पक्षी अभ्यासक प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे यांनी दिली.

मॉन्टॅग्यूज हॅरियर्स हे पक्षी जुलै म हिन्याच्या अखेरीपासून ते नोव्हेंबर पर्यंत हिवाळ्यासाठी भारतात येण्यास सुरुवात करतात. ते मध्य आशियातील त्यांच्या प्रजनन स्थळांपासून भारतामध्ये स्थलांतर करतात. हे पक्षी मध्य आशियाई उड्डाणम ार्गावरून प्रवास करतात व भारतातील मोकळ्या गवताळ प्रदेशांचा आणि शेती क्षेत्रांचा वापर विश्रांती व अन्न मि ळवण्यासाठी करतात.

गुजरातमधील वेलावदर या विशिष्ट ठिकाणी सप्टेंबर ते ऑक्टोबर दरम्यान हजारो हॅरियर्स येतात आणि नंतर ते हिवाळ्यात गवताळ मैदानांमध्ये जातात. अलीकडील या पक्षाच्या स्थलांतर मार्ग व अधिवास या विषयावर झालेल्या एका संशोधनातून असे स्पष्ट झाले आहे की हे हॅरियर्स हिमालयापासून दूर जाण्यासाठी लांब, पश्चिमेकडील मार्गाचा वापर करतात, ज्यामुळे अंतर लक्षणीय वाढते. परंतु





चांगली उड्डाण परिस्थिती, थार वाळवंट आणि गवताळ मैदाने यांसारखी महत्त्वाची थांबण्याची ठिकाणे उपलब्ध होतात.

ते खुले, कोरडे, अर्ध-शुष्क आणि कृषी क्षेत्र पसंत करतात, ज्यामध्ये गवताळ प्रदेश, झुडुपे आणि उघड्या डोंगराळ प्रदेशांचा समावेश आहे. सांगोला तालुक्यामध्ये आंधळगाव, अचकदानी अशा अनेक गावांमध्ये या पक्षांसाठी असे अनुकूल अधिवास उपलब्ध आहेत. तसेच हे पक्षी नाकतोडे, टोळ असे कीटक, काही लहान पक्षी व सरपटणारे प्राणी देखील खातात. सांगोला तालुक्यातील गवताळ प्रदेश व शेती भागामध्ये त्यांना सहजपणे अन्न उपलब्ध होते. भारतातील झपाट्याने वाढणाऱ्या विकास प्रकल्पांमुळे नैसर्गिक गवताळ प्रदेश आणि खुल्या परिसंस्था यांचे नुकसान होत असून अधिवास नष्ट होऊन या पक्षांच्या दीर्घकालीन अस्तित्वासाठी मोठा धोका निर्माण झाला आहे असे मत प्रा.डॉ.प्रकाश बनसोडे यांनी व्यक्त केले. ते आंधळगाव येथील गवताळ मैदानांमध्ये पक्षी निरीक्षणासाठी गेले असता त्यांना म ॉन्टेग्युचा भोवत्या हा पक्षी आढळून आला. या सुंदर, आकर्षक व महत्त्वाच्या परदेशी पाहुण्या पक्षाचे आगमन सांगोल्यात झाल्याम ुळे वन्यजीव अभ्यासक व फोटोग्राफर्स मध्ये आनंदाचे वातावरण आहे.